# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, ■ बुधवार १ जुलै २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०




## स्कूल व्हॅनवर झाड कोसळून विद्यार्थ्याचा मृत्यू



### ४ जण गंभीर जखमी

**मुंबई/प्रतिनिधी** :: चेंबूरच्या दयानंद सरस्वती मार्गावरील रोड क्रमांक ११ वरील हेरिटेज प्राईड इमारतीजवळ मंगळवारी दुपारी सुमारे २.५८ वाजता रस्त्यालगत उभे असलेले एक मोठे पिंपळाचे झाड उन्मळून युनिव्हर्सल हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या मेक फोर्स कंपनीच्या स्कूल बसवर कोसळल्याने भीषण दुर्घटना घडली. या दुर्घटनेत ११ वर्षीय विहान श्रीवास्तव या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला असून चार विद्यार्थी जखमी झाले आहेत.

घटनेची माहिती मिळताच मुंबई महापालिकेचे अग्निशमन दल, पोलीस आणि अन्य आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या. बसमधील १२ विद्यार्थ्यांना बसच्या कंडक्टरने तसेच स्थानिक नागरिकांच्या मदतीने सुरक्षित बाहेर काढले. त्यानंतर अग्निशमन दलाने बचावकार्य पूर्ण करून परिसर सुरक्षित केला. या दुर्घटनेत पाच विद्यार्थी जखमी झाले. त्यापैकी चार विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाली, तर एका विद्यार्थ्याची प्रकृती गंभीर होती.

सर्व जखमी विद्यार्थ्यांना तातडीने झेन रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. झेन रुग्णालयातील कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, उपचारादरम्यान गंभीर जखमी असलेल्या विहान श्रीवास्तव (वय ११) याला सायंकाळी ४.२३ वाजता मृत घोषित करण्यात आले.

उर्वरित चार विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.दरम्यान, झाड उन्मळून ☞(पान २ वर)

# जून ठरला १२६ वर्षातील सर्वात कोरडा महिना

## पावसाची तूट ४० टक्क्यांवर, महाराष्ट्रातील स्थिती चिंताजनक

**मुंबई/प्रतिनिधी** : देशात यंदा या शतकातील म्हणजे शंभर वर्षातील सर्वात कोरड्या जून महिन्यांपैकी एका महिन्याची नोंद झाली. मंदावलेल्या मोसमी पावसामुळे भारतातील बहुतांश भागांना महिनाभर तीव्र पावसाच्या तुटीचा सामना करावा लागला आहे. जून २०२६ हा १९०१ नंतरचा पाचवा सर्वात कमी पावसाचा महिना ठरला आहे.

भारतीय हवामान विभागाने मंगळवारी घेतलेल्या एका पत्रकार परिषदेत सांगितले की, १ जून ते ३० जून या कालावधीत देशात सरासरी १६५.३ मिमी पावसाच्या तुलनेत केवळ ९९.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. यामुळे एकूण पावसाची तूट ४० टक्क्यांवर पोहोचली आहे.

'आयएमडी' दिलेल्या आकडेवारीनुसार, यापूर्वी केवळ चार वेळा म्हणजे १९०५ (९१.९ मिमी), २००९ (८७.६ मिमी), २०१४ (९२.८ मिमी) आणि १९२६ (९६.७ मिमी) यंदाच्या वर्षापेक्षा कमी पावसाची नोंद झाली होती. यावरून मान्सूनच्या विलंबाची भीषणता स्पष्ट होते.

**शेती आणि तापमानावर परिणाम-** प्रदीर्घ कोरड्या कालखंडामुळे शेती क्षेत्राला मोठा फटका बसू लागला आहे.



### मान्सून पुन्हा सक्रिय होण्याचे अंदाज

जून महिन्यातील निराशाजनक परिस्थितीनंतर मान्सूनने आता पुन्हा वेग पकडण्यास सुरुवात केल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे. ३० जून रोजी नैऋत्य मोसमी वारे मध्य प्रदेशच्या आणखी काही भागांत, छत्तीसगड, झारखंड आणि बिहारच्या उर्वरित भागांत, उत्तर प्रदेशच्या काही भागांत, उत्तराखंडच्या बहुतांश भागांत, आणि हिमाचल प्रदेश व लडाखच्या काही भागांत पुढे सरकले आहेत.

पावसातील तुटीमुळे मातीत पुरेसा ओलावा नसल्यामुळे अनेक राज्यांमध्ये खरीप पेरण्यांचा वेग कमालीचा मंदावला आहे.

दुसरीकडे, सुरुवातीलाच मान्सून वाऱ्यांना देशाच्या अंतर्गत भागात सरकण्यासाठी संघर्ष करावा लागल्याने, जून महिन्याच्या बहुतांश काळात उत्तर आणि मध्य भारतात उष्णतेच्या लाटेची स्थिती कायम होती.


पावसाच्या विलंबाचा सर्वाधिक फटका मध्य भारताला बसला असून, ☞(पान २ वर)

## शिक्षेला स्थगिती नाहीच, जामीनही नाही...

# आसाराम बापूला सर्वोच्च न्यायालयाचा झटका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या स्वयंघोषित अध्यात्मिक गुरु आसाराम बापूला सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळालेला नाही. राजस्थान उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या त्याच्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने जामीन देण्यास नकार दिला. केवळ आसारामची प्रकृती गंभीर झाल्यास किंवा त्याच्या जीवाला धोका निर्माण झाल्यासच जामिनाबाबत विचार केला जाईल, असेही न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

**आवश्यक वैद्यकीय सुविधा पुरवण्याचे निर्देश-** मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान, न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, या टप्प्यावर शिक्षेला स्थगिती दिली जाणार नाही. न्यायालयाने कारागृह प्रशासनाला आसारामला



आवश्यक वैद्यकीय सुविधा पुरवण्याची खात्री करण्याचे निर्देश दिले. पुढील निर्णय राज्य सरकारची बाजू ऐकून घेतल्यानंतरच घेतला जाईल. न्यायालयाने राजस्थान सरकारला दोन आठवड्यांच्या आत आपले उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे. आसारामच्या वतीने बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील डी.एस. नायडू यांनी सांगितले की, आसाराम ८० वर्षांहून अधिक वयाचे आहेत आणि त्यांना अनेक आजार आहेत. यावर न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, केवळ वय किंवा आजारपणाच्या आधारावर या टप्प्यावर जामीन मंजूर केला जाऊ शकत नाही. खंडपीठाने तोंडी टिप्पणी केली की, भविष्यात अशी परिस्थिती उद्भवली जिथे आसारामच्या जीवाला धोका असेल, तरच जामिनाबाबत विचार केला जाईल. न्यायालयाची ही भूमिका ☞(पान २ वर)

## जुलैमध्ये राज्यात कमी पाऊस, अल-निनो कमी होताच सप्टेंबरमध्ये पाऊस वाढणार

**पुणे/प्रतिनिधी** : अल-निनोच्या प्रभावामुळे जूनपाठोपाठ जुलैमध्येही देशात आणि महाराष्ट्रात सरासरीपेक्षा कमी (९० ते ९४ टक्के ) पाऊस होईल. प्रामुख्याने विदर्भात सरासरीपेक्षा जास्त, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात कमी पाऊस पडेल, असा अंदाज मंगळवारी दिल्ली येथील भारतीय हवामान शास्त्र विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी पत्रकार परिषदेत



दिला. डॉ. महापात्रा यांनी सांगितले, की जून ते ऑगस्ट या कालवधीत देशात सर्वत्र सरासरीपेक्षा कमी पाऊस राहील. कारण अल -निनोचा प्रभाव आहे. ऑगस्टअखेर आणि सप्टेंबरच्या सुरुवातीला अल-निनोचा प्रभाव कमी होण्याची शक्यता आहे. त्यानंतर पाऊस जास्त होऊ शकतो. मात्र, जुलैमध्ये सरासरीपेक्षा ९० ते ९४ टक्के पाऊस होईल. जुलैमध्ये सरासरी २८० मि.मी.पाऊस पडतो. मात्र, याच्या ९० ते ९४ टक्के इतका कमी पाऊस होईल, तसेच किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. देशाच्या बहुतांश भागांतील तापमान हे सरासरीपेक्षा जास्त राहील. महाराष्ट्रात संपूर्ण जुलैमध्ये ☞(पान २ वर)

## विद्यार्थ्यांनी टाकला शाळेवर बहिष्कार

### जमीन अधिग्रहणाच्या मुद्द्यावर चिमुकल्यांची नाराजी

**गडचिरोली वृत्तसेवा** :: जिल्हाभरातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा होत असताना आज हिरापूर येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शाळेवरच बहिष्कार टाकला. पालकांचा प्रचंड विरोध असतानाही सरकार शेतजमीन अधिग्रहीत करण्याची प्रक्रिया करीत असल्याने विद्यार्थ्यांनी शाळेकडे पाठ फिरवल्याने शाळा ओस पडल्याचे दिसून आले.

#### पहिल्याच दिवशी शाळा पडली ओस



आज विद्यार्थी शाळेच्या वेळेपूर्वीच शाळेच्या प्रवेशद्वारासमोर गणवेशातच एकत्र आले. त्यांनी शाळेसमोर ठिय्या दिला. सोबत अनेक पालकही होते. शिक्षकांनी रांगोळ्या घालून, बँडवाजा, गुलाबपुष्प आणून प्रभातफेरी ☞(पान २ वर)

## टीसी काढायला आलेल्या विद्यार्थ्याचा शिक्षकावर चाकू हल्ला

**छत्रपती संभाजीनगर, वृत्तसेवा** : छत्रपती संभाजीनगरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. शाळेतून टीसी (दाखला) काढण्यासाठी आलेल्या एका अल्पवयीन विद्यार्थ्याने चक्क आपल्या वर्गशिक्षकावर चाकूने हल्ला केला. जखमी शिक्षकांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

यापूर्वीही शिक्षकाबरोबर झाला होता वाद- प्राथमिक माहितीनुसार, हल्ला करणारा विद्यार्थी अल्पवयीन असून तो शाळेतून आपला टीसी (शाळा सोडल्याचा दाखला) घेण्यासाठी आला होता. हा विद्यार्थी पूर्वी



याच शाळेत शिकत असताना, त्याचे वर्गशिक्षकांसोबत काही कारणावरून वाद झाले होते. आज तो टीसी घेण्यासाठी शाळेत आला, तेव्हा पुन्हा एकदा त्याचा आणि संबंधित शिक्षकाचा वाद झाला. विद्यार्थ्याने आपल्याजवळील चाकू काढून शिक्षकांवर सपासप वार केले. अचानक घडलेल्या घटनेने शाळा परिसरात एकच खळबळ माजली. ☞(पान २ वर)








## पहिल्या लग्नाची माहिती लपवून

# दुस-या पतीकडे पोटगी मागणे म्हणजे 'खंडणी' वसुलीचः हायकोर्ट

**पुणे/प्रतिनिधी** : पहिला विवाह कायदेशीररीत्या अस्तित्वात असतानाही कायद्याचा गैरवापर करून दुसऱ्या पतीकडे पोटगी मागणे 'खंडणी' वसूल करण्यासारखेच आहे, असे स्पष्ट करत मुंबई उच्च न्यायालयाने पुणे येथील संबंधित महिलेवरील खंडणीचा गुन्हा रद्द करण्यास नकार दिला आहे. न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या एकलपीठाने १० जून रोजी दिलेल्या आदेशात नमूद केले की, याचिकाकर्तीने सप्टेंबर २०१५ मध्ये दुसरा विवाह केला, त्यावेळी तिचा पहिला विवाह कायदेशीररीत्या अस्तित्वात होता.



**पहिले लग्न अस्तित्वात असताना दुसरे लग्न -** पुण्यातील एका महिलेने सप्टेंबर २०१५ मध्ये पहिले लग्न अस्तित्वात असतानाच दुसरे लग्न केले होते. तिचा दुसरा पती ऑस्ट्रेलियात नोकरी करत होता. तो दरमहा तिच्या बँक खात्यात पैसे पाठवत असे. तसेच पुण्यात राहणारी त्याची आई देखील तिला पैसे आणि भेटवस्तू देत होती. मात्र, काही कारणांवरून वाद झाला, तेव्हा या महिलेने आणि तिच्या कुटुंबीयांनी दुसऱ्या पतीकडे २५ लाख रुपयांची मागणी केली.

**पैसे न दिल्यास गुन्हा दाखल करण्याची धमकी-** पैसे न दिल्यास भादंवि कलम ४९८-अ (घरगुती छळ) अंतर्गत खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी तिच्या मामा ☞(पान २ वर)

# ४८ कोटींचा दंड... तरीही गाजीपूरात 'ऑपरेशन क्रशर'

## चिमोटे पॅटर्नची पुनरावृत्ती की प्रशासनाच्या नाकावर टिच्चून नवा उद्योग?

### आदिवासी जमिनीवरील स्टोन क्रशर, महावितरणची वीज जोडणी आणि परवानग्यांवर प्रश्नांचा भडीमार

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर येथील गट क्रमांक २७ आणि ३८ मधील कथित अतिरिक्त गौण खनिज उत्खनन प्रकरणात शासनाने तब्बल ४८ कोटी रुपयांचा दंड ठोठावला. महसूल विभागाने समपहरणाची नोटीस बजावली. बेकायदेशीर उत्खननाविरोधात कठोर संदेश जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत असतानाच त्याच परिसरातील गट क्रमांक ३७ मध्ये नव्याने 'बालाजी स्टोन क्रशर' उभारण्यात आला असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे 'दंड फक्त कागदावर आणि जमिनीवर पुन्हा तोच खेळ?' असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.




या घडामोडींमुळे गाजीपूरमध्ये पुन्हा एकदा 'चिमोटे प्रकरण' चर्चेत आले आहे. कारण, यापूर्वीही आदिवासी जमिनीवर कथितरीत्या शासनाची आवश्यक मंजुरी न घेता दीर्घ मुदतीचा भाडेपट्टा करून स्टोन क्रशर व डांबर हॉटमिक्स प्लांट उभारण्यात आल्याचा वाद निर्माण होत थेट विधिमंडळाच्या सभागृहात पोहोचला होता. आता त्याच परिसरात, त्याच पद्धतीने पुन्हा उद्योग उभारला गेला असल्याची चर्चा रंगत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

४८ कोटींचा दंड, समपहरणाची नोटीस, शेजारी उभा राहणारा नवा स्टोन क्रशर, परवानग्यांवरील प्रश्न, महावितरणची वीज जोडणी आणि आर्थिक व्यवहार; या सर्व बाबींची महसूल, खनिकर्म, वन विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महावितरण आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्त चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी दिवसेंदिवस तीव्र होत आहे.

एकंदरीतच, गाजीपूरमध्ये कायद्याचे राज्य चालते की प्रभावशालींचे? या प्रश्नाचे उत्तर आता आरोप-प्रत्यारोपातून नव्हे, तर प्रशासनाच्या पारदर्शक आणि कायदेशीर कारवाईतूनच मिळू शकते अशी भावना सामान्य नागरिक व्यक्त करीत आहे.

#### महावितरणची भूमिका सर्वाधिक संशयाच्या भोवऱ्यात?

या प्रकरणातील सर्वात गंभीर प्रश्न महावितरणच्या भूमिकेबाबत उपस्थित होत आहे. स्टोन क्रशरसारख्या प्रदूषणकारी उद्योगाला वीज जोडणी देण्यापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची संमती, शासनाच्या आवश्यक परवानग्या आणि इतर कागदपत्रांची पडताळणी करणे अपेक्षित असते. मात्र, या प्रकरणात ती पडताळणी झाली होती का? की आवश्यक मंजुऱ्या न तपासताच थेट विद्युत पुरवठा देण्यात आला? हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. जर नियमबाह्य पद्धतीने वीज जोडणी देण्यात आली असेल, तर केवळ उद्योगच नव्हे तर संबंधित अधिकाऱ्यांची भूमिकाही चौकशीच्या कक्षेत येऊ शकते, अशी चर्चा स्थानिक स्तरावर सुरू आहे. तथापि, यासंदर्भात महावितरणची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

#### पुन्हा आदिवासी जमीन, पुन्हा भाडेपट्टा... योगायोग की ठराविक पद्धत?

स्थानिकांकडून व्यक्त होत असलेल्या माहितीनुसार, यापूर्वी आदिवासी शेतकरी विलास कालू चिमोटे यांच्या जमिनीवर कथितरीत्या ९९ वर्षांचा नोंदणीकृत भाडेपट्टा करून स्टोन क्रशर आणि डांबर हॉटमिक्स प्लांट उभारण्यात आला होता. त्या उद्योगाला जिल्हा उद्योग केंद्रामार्फत अनुदान मिळाल्याचीही चर्चा झाली होती. आता त्याच परिसरातील आदिवासी जमीनधारक अंबादास नागोराव पवार यांच्या गट क्रमांक ३७ मधील जमिनीवर बाँड किंवा भाडेपट्टा स्वरूपातील करार करून 'बालाजी स्टोन क्रशर' सुरू करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. जर ही माहिती खरी असेल, तर सर्वात मोठा प्रश्न असा की आदिवासी जमिनीवरील असा व्यवहार करण्यासाठी आवश्यक असलेली जिल्हाधिकाऱ्यांची अथवा शासनाची पूर्वमंजुरी घेण्यात आली होती का? हा प्रश्न आता प्रशासनाला टाळता येणार नाही. तर दुसरीकडे या जमिनीची थेट भूमी अभिलेख विभागाच्या मार्फत अधिकृत मोजणी करीत हे स्टोन क्रशर आदिवासी बांधवाच्याच जमिनीवर उभारण्यात आले असल्याचे प्रशासन सिद्ध करू शकते, आणि ते सिद्ध झाल्यास हा थेट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ३६ चा भंग ठरणार असून याप्रकरणी उचित कारवाई करणे ही संबंधित प्राधिकरणाची जबाबदारी असेल.

#### 'धनशक्ती'पुढे यंत्रणा हतबल?

गावात सध्या एकच चर्चा रंगली आहे की; शासनाच्या विविध यंत्रणा नियमांनुसार काम करत आहेत की प्रभावशाली व्यक्तींच्या दबावाखाली? महसूल, महावितरण, प्रदूषण नियंत्रण मंडळ, खनिकर्म विभाग आणि इतर संबंधित यंत्रणांनी सर्व नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली असेल, तर त्याबाबतची कागदपत्रे सार्वजनिक करण्यास कोणतीही अडचण नसावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

#### ४८ कोटींचा दंड... पण धाक कुठे?

इतक्या मोठ्या आर्थिक दंडानंतर संबंधितांवर कायद्याचा धाक बसेल, अशी अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्षात शेजारील गटात नव्या स्टोन क्रशरची उभारणी झाल्याचे चित्र समोर येत असल्याने शासनाच्या कारवाईचा प्रभाव नेमका किती, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महसूल विभागाने समपहरणाची नोटीस दिल्यानंतर पुढे काय झाले? संबंधित मालमत्ता जप्त करण्यात आली का? दंडाच्या वसुलीसाठी कोणती ठोस पावले उचलली? की संपूर्ण प्रक्रिया पुन्हा फाईलपुरतीच मर्यादित राहिली? याबाबत प्रशासनाकडून अधिकृत माहिती जाहीर झालेली नाही.

#### 'मनी ट्रेल' उघड झाला तर अनेक चेहरे समोर येणार?

गौण खनिजाचा पैसा नेमका कुठे जातो? उत्खनन, वाहतूक, ब्लास्टिंग, डिझेल, यंत्रसामग्री आणि विक्रीतील आर्थिक व्यवहार कोणाच्या माध्यमातून होतात? संबंधित खात्यांमध्ये पैशांचा प्रवाह कसा आहे? या सर्व व्यवहारांचा आर्थिक मागोवा घेतल्यास संपूर्ण साखळी उघड होऊ शकते, असे जाणकारांचे मत आहे. त्यामुळे केवळ महसूलच नव्हे तर आर्थिक गुन्हे अन्वेषणाच्या दृष्टीनेही या व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

#### सील केलेला क्रशर सुरू कसा झाला ?

सन २०२१ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी निमा अरोरा यांनी रात्रीच्या सुमारास गाजीपूर येथील गट नंबर ३८ वर धडक देत त्याठिकाणी असलेले 'साई स्टोन क्रशर' तत्काळ सील केले होते. त्याबाबत चांडक यांनी जिल्हाधिकारी यांना विनंती अर्ज केला होता. त्याठिकाणी कोणताही आश्रय न मिळाल्याने चांडक यांनी उच्च न्यायालय नागपूर खंडपीठात धाव घेतली होती मात्र सदर प्रकरणी उच्च न्यायालयाने कुठलाही आदेश पारित केला नसल्याची माहिती आहे, तरी मात्र काही काळातच सदर सील केलेले क्रशर पुन्हा पूर्ववत सुरू करण्यात आले. ते कोणाच्या आदेशाने सुरू करण्यात आले ? या प्रश्नाचे उत्तर अद्यापही गुलदस्त्यातच आहे.

## आमदार गजानन लवटे यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा होणार



**खल्लार/प्रतिनिधीः-** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे दर्यापूरचे कार्यसम्राट आमदार गजानन लवटे यांच्या वाढदिवसानिमित्त दर्यापूर येथे विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जनसेवेचा वारसा जपत वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमांनी साजरा करण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला आहे.

वाढदिवसानिमित्त सकाळी साडे आठ वाजता दर्यापूरचे ग्रामदैवत आशा मनिषा माता मंदिरात महाआरती होणार आहे. त्यानंतर सकाळी नऊ वाजता उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर येथे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना फळांचे वाटप करण्यात येईल.

याशिवाय सकाळी साडे नऊ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरपरिषद शाळा क्रमांक एक (पोलीस स्टेशनजवळ, दर्यापूर) येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार असून, सकाळी दहा वाजता निवासी मूकबधिर विद्यालय, सदानंद कॉलनी, दर्यापूर येथेही विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात येणार आहे.

या उपक्रमांचे आयोजन अंकुश पाटील कावडकर, जिल्हाप्रमुख युवासेना अमरावती यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून, नागरिकांनी या समाजोपयोगी कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## डॉ. नितीन धांडेच भाजपा शहराध्यक्षपदी कायम

### नितीन गुडधे पाटील यांच्या नियुक्तीला स्थगिती



**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय जनता पक्षाच्या अमरावती शहराध्यक्षपदाबाबत महत्त्वपूर्ण घडामोड घडली आहे. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी ३० जून २०२६ रोजी जारी केलेल्या अधिकृत पत्रानुसार, २९ जून २०२६ रोजी नितीन गुडधे पाटील यांची अमरावती शहराध्यक्षपदी करण्यात आलेली नियुक्ती स्थगित करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे शहर भाजपमधील संघटनात्मक स्थिती पूर्ववत राहिली असून, डॉ. नितीन धांडे हेच अमरावती शहराध्यक्ष म्हणून कामकाज पाहणार आहेत.

भाजपच्या या निर्णयामुळे शहरातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांमध्ये नव्या घडामोडींना वेग आला आहे.

## चांदूरबाजार तालुक्याला वादळी पावसाने झोडपले -शिरजगांव कसबा व करजगाव मंडळात अतिवृष्टी

### दोन व्यक्ती पुरात वाहून गेल्याने मृत, एकाचा मृतदेह सापडला,दुस-याचा शोध सुरू



**चांदूरबाजार/प्रतिनिधीः-** सोमवार दिनांक २९ जूनच्या रात्री ९.३० ते १० .३० दरम्यान, तालुक्याला जोरदार वादळी पावसाने अक्षरशः झोडपून काढले. यादरम्यान तालुक्यात सरासरी ५८ मी.मी.इतक्या पावसाची नोंद झाली.मात्र तालुक्यातील शिरजगांव कसबा व करजगाव,या दोन महसूल मंडळांना अतिवृष्टीचा जबरदस्त तडाखा बसला. अतिवृष्टीमुळे नाग नदी व नाल्याला आलेल्या पूरा मुळे, पुल ओलांडतांना दोन व्यक्ती रात्री ११ चे सुमारास वाहून गेल्या. एन.डी. आर.एफ.च्या पथकाने , तातडीने घटनास्थळी हजर होऊन शोध मोहीम सुरू केली. बातमी लिही पर्यंत एका व्यक्तीचा मृत देह शोधण्यात , एन.डी.आर. एफ.च्या पथकाला यश आले होते.दुस-या व्यक्तीच्या मृतदेहाची शोध मोहीम युध्दपातळीवर सुरू आहे.

अचानक व अनपेक्षित झालेल्या अतिवृष्टीमुळे, करजगाव व शिरजगांव कसबा परिसरातील नाग नदी व नाल्यांना मध्यरात्री दरम्यान पूर आला.या पूरात दोन व्यक्ती पूरात वाहून गेल्या मृत झाल्या,तर शिंदी खुर्द येथील ८ शेतकऱ्यांची व लाखनवाडी येथील दोन शेतकऱ्यांची नुकतीच पेरणी केलेली शेती ही खरडून गेली आहे. यांचा आर्थिक फटका या शेतकऱ्यांना बसला आहे. मृत झालेल्या दोन्हीं व्यक्ती तालुक्यातील पांढरी येथील रहिवासी आहेत.महसूल विभागा कडून प्राप्त माहितीनुसार मृत झालेल्यांमध्ये,रविंद्र रामभाऊ आवारे (वय ५३) व गोपाळ वासुदेव निर्वाण (वय ४०) यांचा समावेश आहे. रविंद्र आवारे यांचा मृतदेह सापडला आहे.तर दुसऱ्या व्यक्तीच्या मृत देहाची शोध मोहीम सुरू आहे.एन.डी.आर.एफ.टिम घटनास्थळी तळ ठोकून आहे.तसेच उप विभागीय अधिकारी बळवंत अरखराव व तहसीलदार योगोश गाडे , माहिती प्राप्त झाल्या पासून घटनास्थळी उपस्थित होते.

## वन्यप्राण्याच्या हल्ल्यात संजय मालधुरे यांचा मृत्यू

### शवविच्छेदन अहवालातून उलगडा



**अमरावती/प्रतिनिधीः-** लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिपगाव परिसरात २७ जून रोजी नाल्याजवळ आढळून आलेल्या शेतमजूर संजय प्रभाकर मालधुरे (वय ४५, रा. शिपगाव) यांच्या मृत्यूचे गूढ अखेर उलगडले आहे. मंगळवारी प्राप्त झालेल्या शवविच्छेदन (पीएम) अहवालानुसार त्यांचा मृत्यू वन्यप्राण्याच्या हल्ल्यात झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

शिपगाव येथील नाल्यालगत संजय मालधुरे यांचा रक्तबंबाळ अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. त्यांच्या शरीरावर गंभीर जखमांचे निशाण असल्याने सुरुवातीला हत्या झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत होती. घटनेची माहिती मिळताच लोणी पोलिसांसह फॉरेन्सिक तज्ज्ञांची टीम, डॉग स्कॉड तसेच ग्रामीण गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले होते. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आला होता. घटनेच्या दुसऱ्या दिवशी वनविभागाचे पथकही घटनास्थळी पोहोचले होते. वन्यप्राण्याच्या हल्ल्यामुळे मृत्यू झाल्याच्या संशयावरून वनविभागानेही स्वतंत्र पंचनामा केला होता. अखेर ३० जून रोजी प्राप्त झालेल्या शवविच्छेदन अहवालात संजय मालधुरे यांचा मृत्यू वन्यप्राण्याच्या हल्ल्यात झाल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे हत्येच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील कार्यवाही सुरू ठेवली आहे.

## पूर्णा नदीत विषारी पदार्थ मिसळल्याने मासे मृत

### ग्रामस्थांमध्ये खळबळ



**भातकुली/प्रतिनिधीः-** भातकुली तालुक्यातील खोलापूर येथे पूर्णा नदीच्या पाण्यात अज्ञात व्यक्तीने विषारी पदार्थ मिसळल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे नदीतील मोठ्या प्रमाणावर मासे मृतावस्थेत आढळून आले असून परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खोलापूर कसबा येथील काही युवक नेहमीप्रमाणे आपली जनावरे चराईसाठी नदीकाठी घेऊन गेले होते. जनावरांना पाणी पाजण्यासाठी ते नदीजवळ गेले असता, नदीच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात मृत मासे तरंगताना दिसून आले. पाण्यात काही संशयास्पद पदार्थ मिसळला असावा, अशी शंका आल्याने युवकांनी प्रसंगावधान राखत जनावरांना नदीचे पाणी पिऊ दिले नाही. त्यानंतर त्यांनी तातडीने जनावरे घरी नेऊन त्यांना सुरक्षित पाणी पाजले. तसेच या घटनेची माहिती गावातील नागरिकांना व परिसरातील रहिवाशांना दिली. युवकांनी गावात दवंडी देत कोणत्याही नागरिकाने आपली जनावरे नदीवर पाणी पाजण्यासाठी आणू नयेत, असे आवाहन केले. दरम्यान, पूर्णा नदीतील मोठ्या प्रमाणावरील मत्स्य मृत्यूमुळे पर्यावरणीय धोक्याची शक्यता व्यक्त केली जात असून ग्रामस्थांनी प्रशासनाकडे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. नदीच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेऊन दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### स्कूल व्हॅनवर झाड कोसळून

पडण्यामागील कारणांचा शोध संबंधित यंत्रणांकडून घेतला जात असून, या घटनेची नोंद करून पुढील तपास सुरू आहे.

### जून ठरला १२६ वर्षांतील सर्वात

तिथे सरासरी १७०.३ मिमी पावसाच्या तुलनेत केवळ ८४.४ मिमी पाऊस पडल्याने ५० टक्के पावसाची तूट नोंदवली गेली आहे. तसेच, वायव्य भारतात ३१ टक्के कमी पाऊस झाला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, येत्या दोन ते तीन दिवसांत मान्सून गुजरात, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशच्या आणखी काही भागांत, संपूर्ण दमण आणि दीव प्रदेशात, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि लडाखच्या उर्वरित भागांत, संपूर्ण जम्मू-काश्मीरमध्ये, हरियाणा, चंदीगड, दिल्ली आणि पंजाबच्या बहुतांश भागांत आणि राजस्थानच्या काही भागांत पुढे जाण्यासाठी परिस्थिती आता अनुकूल आहे.

### शिक्षेला स्थगिती नाहीच, जामीनही

आसारामसाठी मोठा धक्का मानली जात आहे.

राजस्थान उच्च न्यायालयाचा निर्णय काय होता?

२७ मे रोजी राजस्थान उच्च न्यायालयाने आसारामची दोषी ठरवण्याची कारवाई आणि जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली. मात्र, उच्च न्यायालयाने त्याला सामूहिक बलात्कार आणि पोक्सो कायद्यातील काही गंभीर कलमांखालील आरोपांतून निर्दोष मुक्त केले. न्यायालयाने भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२)(एफ) अंतर्गत त्याची दोषी ठरवण्याची कारवाई कायम ठेवली; हे कलम अल्पवयीन मुलीवरील बलात्काराशी संबंधित आहे. परिणामी, कनिष्ठ न्यायालयाने (ट्रायल कोर्टाने) सुनावलेली जन्मठेपेची शिक्षाही कायम राहिली.

आसारामवर कोणते आरोप कायम?

चुकीच्या पद्धतीने डांबून ठेवणे , मानवी तस्करी, गुन्हेगारी स्वरूपाची धमकी देणे, महिलेच्या विनयभंगाचा प्रयत्न करणे आणि लैंगिक अत्याचार यांसारख्या आरोपांखाली आसारामला दोषी ठरवण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. याव्यतिरिक्त, पोक्सो (इ्ध्ण्एध) कायद्याच्या कलम ७ व ८ आणि बाल न्याय (व्ल्नहग्त व्ल्ग्म) कायद्याच्या कलम २३ अन्वये त्याला दोषी ठरवण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. मात्र, गुन्हेगारी कट आणि सामूहिक बलात्कार यांसारख्या काही आरोपांतून न्यायालयाने त्याची निर्दोष मुक्तता केली. सह-आरोपी संचिता गुप्ता (उर्फ शिल्पी) आणि शरत चंद्र यांची उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

### जुलैमध्ये राज्यात कमी पाऊस,

सरासरीपेक्षा कमी पाऊस राहील. यात मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा या भागाचा समावेश आहे.

महाराष्ट्र आणि गुजरात मध्ये १ ते १० जुलैदरम्यान चांगला पाऊस राहील.

विदर्भात मात्र जुलैत सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे.

२ ते ५ जुलैदरम्यान महाराष्ट्रात मुसळधार पाऊस पडेल. कोकणला चार दिवस रेड अलर्ट दिला आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा भागांत हे चार दिवस मध्यम ते मुसळधार राहील.

२ ते ५ जुलैदरम्यान कोकणात रेड, तर उर्वरित भागात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

### विद्यार्थ्यांनी टाकला शाळेवर बहिष्कार

काढून विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्याचे ठरविले होते. परंतु पालक आणि विद्यार्थ्यांची भूमिका लक्षात घेता शिक्षकांच्याही आनंदावर विरजण पडले. प्रवेशोत्सवासाठी शासनाच्या सूचनेप्रमाणे एक कार्यकारी अभियंता शाळेला भेट देण्यासाठी आले होते. परंतु विद्यार्थी आणि पालकांची भूमिका लक्षात घेता त्यांनाही प्रवेशोत्सव न घेताच परत जावे लागले.

कशामुळे घेतला विद्यार्थ्यांनी हा निर्णय?

गडचिरोली तालुक्यातील हिरापूर परिसरात विमानतळ उभारण्याचा शासनाचा मानस आहे. त्यासाठी हिरापूर, गुरवळा, राखी, शिरपूर इत्यादी गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत करण्याची प्रक्रिया शासनाने सुरु केली होती. परंतु ४ जूनला हजारो स्त्री-पुरुष शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयापुढे ठिय्या आंदोलन केले.

त्यावेळी सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करुन १२ मे २०२६ च्या विमानतळ निर्मितीसंदर्भात कोणतीही प्रक्रिया केली जाणार नाही, असे लेखी आश्वासन दिले होते. परंतु या बाबीला महिनाही होत नाही;तोच शासनाने विमानतळासाठी वनजमिनीतून महसूल मिळविण्याच्या हेतूने सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा काढली आहे.

२ जुलैला ही निविदा उघडण्यात येणार आहे. याचा अर्थ पडद्यामागून जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया केली जात आहे. ही प्रक्रिया अन्यायकारक असल्याने विद्यार्थ्यांनी शाळेत न जाण्याचा निर्णय घेतल्याचे हिरापूर ग्रामपंचायतीचे उपसरपंच दिवाकर निसार यांनी सांगितले. हीच भूमिका अन्य गावकऱ्यांनी मांडली.

### टीसी काढायला आलेल्या

जखमी झालेल्या शिक्षकांना तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

ऑनलाईन खरेदी केला होता चाकू!

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. पोलीस तपासादरम्यान एक अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. या अल्पवयीन विद्यार्थ्याने शिक्षकावर हल्ला करण्यासाठी वापरलेला चाकू चक्क एका ऑनलाईन शॉपिंग साईटवरून खरेदी केला होता, अशी माहिती तपासात समोर आली आहे. यावरून विद्यार्थ्याने हा हल्ला पूर्वनियोजित कट रचून केल्याचा संशय व्यक्त होत आहे. पोलीस या प्रकरणी पुढील तपास करत आहेत.

### पहिल्या लग्नाची माहिती

आणि कुटुंबीयांनी दुसऱ्या पतीला व त्याच्या आईला दिली होती. या प्रकरणी तक्रार दाखल केल्यानंतर संबंधित महिलेविरुद्ध भादंवि कलम ३८४ (खंडणी), ४१७ (फसवणूक), ४९४ (द्विभार्यात्व/दुसरे लग्न करणे) आणि ५०६ (गुन्हेगारी धमकी) अंतर्गत गुन्हा दाखल झाला. ही कारवाई रद्द करण्यासाठी तिने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

हे वर्तन केवळ ब्लॅकमेलिंग, खंडणी आणि दबाव टाकण्यासाठीच

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांनी महिलेच्या आणि तिच्या नातेवाईकांच्या भूमिकेवर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले. ते म्हणाले, 'पहिला विवाह अबाधित असताना दुसरीकडे लग्न करायचे, त्यानंतर दुसऱ्या पतीकडे पोटगी मागण्याचा हक्क आहे, असा बचाव करणे पूर्णपणे अस्वीकार्य आहे. हे वर्तन केवळ ब्लॅकमेलिंग, खंडणी आणि दबाव टाकण्याचे तंत्र आहे.''महिलेने स्वतःच्या बेकायदेशीर कृत्यांची जाणीव असूनही कायदेशीर तरतुदींचा गैरवापर केला आहे. तिने कल्याणकारी कायद्याचा वापर पैसे उकळण्यासाठी एक शस्त्र म्हणून केला आहे. महिलेने दुसऱ्या पतीविरुद्ध आणि त्याच्या मित्राविरुद्ध ४९८-अ, बलात्कार (३७६) आणि एससी/एसटी (?ट्रॉसिटी) कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले होते. हे सर्व खटले सूडबुद्धीने आणि चुकीच्या पद्धतीने पैसे मिळवण्याच्या हेतूने प्रेरित होऊन दाखल करण्यात आले आहेत,' असे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

२५ लाख रुपयांची मागणी ही पोटगी नसून खंडणी

महिलेने स्वतः न्यायालयात मान्य केले होते की तिचे पहिले लग्न वैध असतानाच तिने दुसरे लग्न केले होते. त्यामुळे न्यायालयाने तिची २५ लाख रुपयांची मागणी ही पोटगी नसून खंडणी असल्याचे मानले. न्यायालयाने या महिलेविरुद्ध भादंवि कलम ३८४ (खंडणी), ४१७ (फसवणूक), ४९४ (द्विभार्यात्व/दुसरे लग्न करणे) आणि ५०६ (गुन्हेगारी धमकी) अंतर्गत दाखल असलेला एफआयआर रद्द करण्यास स्पष्ट नकार दिला. मात्र, न्यायालयाने दिलासा देत या महिलेच्या आई आणि भावाविरुद्धचा एफआयआर रद्द करण्याचा आदेश न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या एकलपीठाने दिला आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, १ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## भररस्त्यात नगरसेविकेच्या पतीची निर्घृण हत्या! धडक देऊन पाडले अन छाती-पोटावर सपासप वार

■ प्रतिनिधी | अकोला ■

**शहरातील कायदा-सुव्यवस्थेला हादरा देणारी थरारक घटना मंगळवारी दुपारी रेल्वे स्टेशन-अग्रसेन चौक मार्गावर घडली. जुने शहर परिसरातील नगरसेविका रफिया बी. याकुब खान यांचे पती याकुब खान युनुस खान यांच्यावर भरदिवसा जीवघेणा चाकूहल्ला करण्यात आला. छाती, पोट आणि मांडीवर सपासप वार करून आरोपींनी त्यांना रक्ताच्या थारोळ्यात सोडून पलायन करण्याचा प्रयत्न केला. गंभीर जखमी याकुब खान यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने या हल्ल्याचे रूपांतर खुनाच्या गुन्ह्यात झाले आहे. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून भररस्त्यात झालेल्या या रक्तरंजित हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

### रामदासपेठ पोलिसांची तात्काळ कारवाई; मुख्य आरोपी घटनास्थळावरूनच जेरबंद, साथीदार फरार





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याकुब खान हे इलेक्ट्रिक ओला दुचाकीवरून रेल्वे स्टेशनकडून अग्रसेन चौकाकडे जात होते. जिजाऊ हॉलसमोर विरुद्ध दिशेने आलेल्या वसीम अहमद उर्फ चांवडया गुलाम अयुब याने मुद्दाम त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे याकुब खान रस्त्यावर कोसळताच वसीमच्या मागे बसलेला साथीदार घटनास्थळावरून पसार झाला.

याच क्षणाचा फायदा घेत वसीम अहमदने जवळील धारदार चाकू बाहेर काढत याकुब खान यांच्यावर तुटून पडला. छाती, पोट आणि डाव्या मांडीवर त्याने सपासप वार केले. काही क्षणांतच संपूर्ण परिसरात आरडाओरडा सुरू झाला, तर रस्त्यावर रक्ताचा सडा पडला.

हल्ला करून आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असतानाच रामदासपेठ पोलिस ठाण्यातील पोलीस हवालदार प्रविण ढगेकर यांनी विलक्षण धाडस दाखवत आरोपीचा पाठलाग केला. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी आरोपीला काही अंतरावर गाठून जेरबंद केले. त्यामुळे मुख्य आरोपीला घटनास्थळावरूनच अटक करण्यात पोलिसांना यश आले.

दुसरीकडे, जखमी याकुब खान यांना तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढे आयकॉन हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले; मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. प्राथमिक तपासात मृत याकुब खान आणि आरोपी वसीम अहमद हे एकमेकांचे परिचित तसेच नातेवाईक असल्याची माहिती समोर आली आहे. दोघांमध्ये पूर्वीपासून वाद सुरू होता. याच वैमनस्यातून हा नियोजनबद्ध हल्ला झाल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. पोलिसांकडून या अनुषंगाने सर्व बाजूंनी तपास सुरू आहे.

या प्रकरणी इस्माईल खान यांच्या फिर्यादीवरून रामदासपेठ पोलिस ठाण्यात सुरुवातीला भारतीय न्याय संहितेतील कलम १०९(१) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र याकुब खान यांच्या मृत्यूनंतर गुन्ह्यात कलम १०३(१)(खून)ची भर घालण्यात आली आहे.

मुख्य आरोपी अटकेत असला तरी हल्ल्यानंतर घटनास्थळावरून पसार झालेल्या त्याच्या साथीदाराचा शोध घेण्यासाठी रामदासपेठ पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेची विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. आरोपीला आश्रय देणाऱ्यांचाही शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रामदासपेठ पोलीस ठाण्याचे निरीक्षक शिरीष खंडारे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक संदीप बालोद, सहायक पोलीस उपनिरीक्षक किरण गवई, पोलीस हवालदार प्रविण ढगेकर व इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

## पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी खासदारांविरोधात कठोर कारवाईची मागणी



■ प्रतिनिधी | कारंजा ■

पत्रकारांना खुलेआम जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप असलेल्या संजय दीना पाटील यांच्याविरोधात तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीमुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा राज्यभर चर्चेचा विषय ठरला आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना तहसीलदार, कारंजा यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पत्रकारांना दिली गेलेली कथित धमकी ही केवळ व्यक्तीगत बाब नसून लोकशाही व्यवस्थेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि स्वतंत्र पत्रकारितेवर थेट आघात आहे.

संघटनेने म्हटले आहे की, लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांना धमकावण्याच्या घटना वाढत असतील तर सत्य मांडण्याचे कार्य धोक्यात येऊ शकते. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून पत्रकार संरक्षण कायद्यासह लागू असलेल्या भारतीय कायद्यांनुसार संबंधितांवर तातडीने गुन्हा दाखल करण्यात यावा.

याशिवाय राज्यातील पत्रकारांना निर्भय, सुरक्षित आणि दबावमुक्त वातावरणात कार्य करता यावे यासाठी शासनाने कठोर भूमिका घ्यावी व दोषींना कायद्याचा धाक दाखवणारी कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनावर महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बंडूभाऊ इंगोले, तालुकाध्यक्ष आरीफ पोपटे आणि शहराध्यक्ष संदीप कुऱ्हे कीरण क्षार, महेद्र गुप्ता, विनोद गणवीर, बबलू शेख, यांच्या सह अखंख्य पदाधिकारी व सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असून, पत्रकारांच्या सन्मान व सुरक्षेसाठी संघटना लढा कायम ठेवणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

## संभाव्य चौकशी आधीच भांडे फुटण्याच्या भीतीने वन प्रशासनाकडून रोपे लागवडीचा खटाटोप

### कागदी मिश्र रोप वनातील हजारो झाडे 'भुता'ने चार वर्षात गिळले

■ प्रतिनिधी | मानोरा ■

गिरोली वन वर्तुळातील सावरगांव कान्होबा वन बीट मधील कक्ष क्र. १३८ मधील ३० हेक्टर मिश्र रोपवनात २०२१-०२२ मध्ये शासनाने लाखो रुपये खर्च मंजूर केलेल्या मात्र प्रशासनाने हे लक्षावधी रुपये कागदावर खर्च करून लावलेली एकही रोपे जगवली नसल्याचा कागदी रोपवन घोटाळा उघडकीस आल्याने संभाव्य कारवाईच्या भीतीने वन विभागाने आता घाईघाईने पुन्हा रोप लागवड सुरू केली आहे, असा खळबळजनक आरोप खापरदरी येथील सामाजिक कार्यकर्ते जगदीश शामराव राठोड यांनी केला आहे.



याबाबत राठोड यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी, मानोरा यांचेसह वरिष्ठांना लेखी निवेदन दिले आहे.

दि.२६ जून ०२६ रोजी पंचक्रोशीचे आराध्य दैवत श्री कानिफनाथ महाराजांच्या मंदिरात दर्शनासाठी ते गेले असता, मंदिराच्या पाठीमागे असलेल्या कक्ष क्र.१३८ मध्ये काही मजूर रोपे घेऊन जाताना दिसले. विचारणा केली असता, 'सरकारी उजाड रोपवनात रोपे लावण्यासाठी जातोय' असे मजुरांनी सांगितल्याचे राठोड यांनी निवेदनात नमूद केले आहे.

### ४ वर्षे रोपे वाढवण्यावर खर्च केलेला निधी गेला कुठे ?

सदर कक्षात २०२१-२२ मध्ये 'भरीव वनीकरण' योजनेअंतर्गत ३० हेक्टरवर मिश्र रोपवन करण्यात आले होते. यासाठी प्र.मा.क्र. ७० व ६० दि.२३.०९.०२२ नुसार मोठा निधी खर्च झाडे जगवण्यावर वन प्रशासनाकडून करण्यात आला.

मात्र ४ वर्षानंतर प्रत्यक्ष जागेवर एकही झाड जिवंत नसल्याचे आघाडीच्या सर्व वृत्तपत्रांनी पुराव्यासह उघडकीस आणले होते.

## वटसावित्री पौर्णिमेनिमित्त महिला वडाच्या झाडा समोर नतमस्तक



■ प्रतिनिधी | मानोरा ■

ज्येष्ठ पौर्णिमेला साजरा होणारा वटसावित्रीचा सण आज तालुक्यात मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि सुखी संसारासाठी सुवासिनी महिलांनी उपवास करून वडाच्या झाडाची पूजा केली.

पहाटेपासूनच शहर व तालुक्यातील विविध गावातील वडाच्या झाडाखाली महिलांची गर्दी जमली होती. नटून-थटून आलेल्या महिलांनी वडाच्या झाडाला सूताचे धागे गुंडाळून सात प्रदक्षिणा घातल्या. वडाच्या मुळाशी हळद-कुंकू वाहून, फुले, फळे अर्पण करून मनोभावे प्रार्थना केली. पतीव्रता सावित्रीने आपला पती सत्यवान याचे प्राण यमराजाकडून परत आणले, ती कथा आजच्या दिवशी सांगितली जाते. सावित्रीने वडाच्या झाडाखालीच तप करून सत्यवानाचे प्राण परत मिळवले, म्हणून वडाच्या झाडाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वडाचे झाड दीर्घायुषी असल्याने पतीच्या दीर्घायुष्याचे प्रतीक मानले जाते. महिलांनी आंबे, फणस, जांभळे या पाच फळांसह १६ प्रकारची पत्री, गहू, हरभरे वडाला अर्पण केले.

## वसंतराव नाईक जयंतीनिमित्त कार्यक्रम

**मानोरा :** हरितक्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त आज दि.१ जुलै रोजी शहरातील संत सेवालाल महाराज चौकात महामानवाचा अभिवादन सोहळा पार पडणार आहे. तरी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महानायक वसंतराव नाईक मित्र मंडळ मानोरा तालुक्याच्यावतीने करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम सकाळी ११ वाजता शहरातील संत सेवालाल महाराज चौकात आयोजित करण्यात आला असुन महानायक वसंतराव नाईक यांच्या सक्षमीकरणाच्या विचारातूनच यावेळी प्रयोगशील शेतकरी यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

## जानकी नगर, लाखाळा येथे महिला मंडळाकडून वटपौर्णिमा उत्साहात साजरी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जानकी नगर, लाखाळा येथील महिला मंडळाच्या वतीने वटपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. परिसरातील सर्व महिलांनी पारंपरिक वेशभूषेत वडाच्या वृक्षाची विधिवत पूजा करून अखंड सौभाग्याची प्रार्थना केली.

यावेळी 'आनंद उत्सव – वटपौर्णिमा' या उपक्रमांतर्गत पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. ॲड. सौ. भारती सोमाणी यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना, 'पर्यावरणाचे रक्षण ही काळाची गरज असून प्रत्येकाने झाडे लावणे, वृक्ष वाढवणे आणि त्यांचे संगोपन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे,' असे प्रतिपादन केले. झाडे लावा – वृक्ष वाढवा – वृक्ष जगवा' हा संदेश देत पर्यावरण संरक्षणाची जनजागृती करण्यात आली. जर आपल्याला ही परंपरा कायम ठेवायची असेल तर प्रत्येकाने झाडे लावणे जरुरी आहे त्यासोबतच वृक्षांचे संवर्धन करणे सुद्धा प्रत्येकाचे कर्तव्य आहे, तरच खऱ्या अर्थाने वटपौर्णिमा साजरी होईल.

## भर पावसात पडलेला वीज पोल उभा; लाईनमन विजय भालेराव यांची कर्तव्यदक्ष कामगिरी



■ प्रतिनिधी | रिसोड ■

सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे परिसरातील एक वीज पोल कोसळून वीजपुरवठा विस्कळीत झाला होता. मात्र प्रतिकूल हवामानाची पर्वा न करता महावितरणचे कर्तव्यदक्ष लाईनमन भालेराव यांनी सहकारी कर्मचाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि पडलेला वीज पोल सुरक्षितपणे पुन्हा उभा केला.

भर पावसात आवश्यक ती सर्व सुरक्षात्मक काळजी घेत त्यांनी दुरुस्तीचे काम जलदगतीने पूर्ण केले. परिणामी परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यास मोठी मदत झाली असून नागरिकांना दिलासा मिळाला. प्रतिकूल परिस्थितीतही जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तत्परतेचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. त्यांच्या या कर्तव्यदक्ष सेवेमुळे महावितरणच्या आपत्कालीन यंत्रणेची कार्यक्षमता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

> भर पावसात जीवाची पर्वा न करता महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने पडलेला वीज पोल उभा करून वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी केलेले काम कौतुकास्पद आहे. प्रतिकूल परिस्थितीतही नागरिकांना अखंडित सेवा देण्यासाठी तत्पर राहणाऱ्या लाईनमन भालेराव व त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. अशा कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यांमुळे नागरिकांचा महावितरणवरील विश्वास अधिक दृढ होत आहे.
>
> **भागवतराव जाधव**
> सामाजिक कार्यकर्ते

## आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्थेतर्फे ९३ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



■ प्रतिनिधी | कारंजा ■

आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्था, वाल्हई यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विद्याश्री शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या आव्हानात्मक परिस्थितीतील ९३ ग्रामीण होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम रविवार दिनांक २८ जून रोजी सकाळी ११ वाजता कारंजा येथील महेश भवन येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बंडूभाऊ इंगोले होते. प्रमुख पाहुणे म्हणून वनपरिक्षेत्राधिकारी गिरीश जातकर, संगणक अभियंता राहुल इंगोले, कारंजा वृत्त केसरीचे संपादक रामदास मिसाळ, दंतवैद्य डॉ. मनीष राऊत, मुख्याध्यापक धीरज उजवणे, विजय भड, संस्थेच्या सचिव मृणाली तोमर, संचालक प्रा. निर्मल ठाकूर तसेच कार्यक्रम समन्वयक नीता तोडकर, हेमंत पापडे उपस्थित होते. आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्था गेल्या बारा वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व उपक्रम राबवत आहे. विद्याश्री शिष्यवृत्ती योजना, सावित्रीबाई फुले पुस्तक पेढी, आदीशक्ती पुरस्कार आदी उपक्रमांद्वारे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य व आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

अध्यक्षीय भाषणात बंडूभाऊ इंगोले यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत, विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करून स्वावलंबी होईपर्यंत साथ देण्याची संस्थेची तळमळ प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

## वटपौर्णिमेनिमीत्त बहुगुणी वटवृक्षाचे वक्षारोपण

### राष्ट्रीय हरित सेना एसएमसी इंग्लिश स्कूलच्या चिमुकल्यांचा उपक्रम


■ प्रतिनिधी | वाशिम ■

शाळा परिसरात १७ वर्षीपासून वटवृक्षाचे वक्षारोपण वाशीम :जेष्ठ महिण्यात येणारा 'वटपौर्णिमा' हा सण नावाप्रमाणेच वटवृक्षाशी निगडीत आहे . वडाचे झाड दिर्घकाळ टिकणारे असून त्याला विपूल पर्णसंभार असतो. त्यामुळे वडाचे झाड हवा प्रदूषण नियंत्रणा बरोबरच ध्वनी प्रदूषण नियंत्रणाचे काम हि उत्तम रितीने करतात. तसेच त्याच्या घनदाट पालवीमुळे हि झाडे हवेतील तापमान कमी करून शितलता देतात. वडाच्या झाडाला वर्षभर पिकलेली फळे येत असल्यामुळे बऱ्याच प्राण्यांना व पक्षांना अन्न मिळते याची लाल चुटुक फळे खायला अक्षरशः शेकडो पक्षी याच्यावर तुटून पडतात तसेच बरेच प्राणी व पक्षी वडाच्या झाडाचा



निवार्यासाठी उपयोग करतात .अशाप्रकारे वटवृक्ष हा एक संपूर्ण परिसंस्थेचे उदाहरण आहे .ह्याच्या पारावर बसून पांथस्थ विश्रांती घेतात. खेड्यातील व्यापारी ह्याच्या सावलीत आपली दुकाने थाटात त्यावरूनच त्याला बनिया म्हणजेच 'बनियन ट्री' असे नांव पडले असावे .ह्या वृक्षाला फुटणार्या पारंब्या त्यांचे स्वतंत्र वृक्षात रुपांतर होऊन त्याला मिळणारे दीर्घायुष्य या गुणधर्मा मुळे त्याला 'अक्षय वृक्ष' असे म्हटले गेले आहे. आजच्या काळात बऱ्याच विकास कामांसाठी पूर्वीच्या काळी लावण्यात आलेल्या वडांच्या झाडांची तोड करण्यात आलेली आहे. वडाचे झाड हळूहळू वाढते तथापी आजकालच्या गतीमान जगांमध्ये बहुतेक जण लागवडीसाठी जलद वाढणाऱ्या व शोभीवंत वृक्ष प्रजातीची निवड करतात त्यामुळे पुरातन काळात जतन करण्यात आलेल्या या वृक्षांची संख्या खूप कमी झाली आहे .

## पर्यावरण संरक्षणाचा अनोखा संदेश



■ प्रतिनिधी | कारंजा ■

वटपौर्णिमेच्या धार्मिक परंपरेला पर्यावरण संवर्धनाची जोड देत कारंजा येथील प्रगती नगरमधील हनुमान मंदिर परिसरात आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्था, कारंजा शाखेच्या वतीने दि. २९ रोजी वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. यावेळी महिलांनी पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा देत समाजात वृक्षसंवर्धनाचा प्रभावी संदेश दिला. या उपक्रमात वटवृक्ष, पिंपळ, जांभूळ, सिताफळ, कडूलिंब, कडूबदाम, चिंच आदी देशी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली.

## वारकरी बांधवांच्या सुरक्षिततेसाठी भाजपा शहराचा पुढाकार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आषाढी वारीनिमित्त वाशिम शहरातून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करणाऱ्या विविध पालख्या व हजारो वारकरी बांधवांच्या सुरक्षित, शिस्तबद्ध आणि निर्विघ्न प्रवासासाठी भारतीय जनता पार्टी, वाशिम शहराच्या वतीने पुढाकार घेत वाशिम शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार मा. संजय चौधरी यांना निवेदन सादर करण्यात आले.

वारकरी ही महाराष्ट्राच्या संतपरंपरेची, श्रद्धेची आणि संस्कृतीची जिवंत परंपरा असून, त्यांच्या सेवेत सहभागी होणे हे प्रत्येक समाजघटकाचे कर्तव्य असल्याची भावना व्यक्त करत, पालखी मार्गावरील महत्त्वाच्या चौकांमध्ये पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण व आवश्यक सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी शहराध्यक्ष मनिष मंत्री, नगरसेवक गणेश खंडाळकर नगरसेविका सौ



जयश्री कपिल सारडा, कामगार जिल्हा अध्यक्ष रामा इंगळे, सरचिटणीस सुनील तापडिया, महिला मोर्चा अध्यक्षा सौ. हेमलता विसपुते, ओबीसी मोर्चा अध्यक्ष अमोल जाधव, पदाधिकारी गिरीश शर्मा व पवन किल्लेदार हे भारतीय जनता पार्टी, वाशिम शहराचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनाची सकारात्मक दखल घेत ठाणेदार संजय चौधरी यांनी वारकरी बांधवांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत आवश्यक त्या

### पोलीस प्रशासनाकडून आवश्यक बंदोबस्ताचे आश्वासन

ठिकाणी चौक बंदोबस्त व पोलीस संरक्षण उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही दिली. वारकरी बांधवांची सेवा हीच ईश्वरसेवा मानत भारतीय जनता पार्टी, वाशिम शहराचे पदाधिकारी व कार्यकर्ते समाजहिताच्या प्रत्येक कार्यात सदैव तत्पर असून, श्रद्धा, सेवा आणि सुरक्षा या त्रिसूत्रीला प्राधान्य देत कार्यरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

भाजपा वाशिम शहराच्या या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, वारकरी बांधवांच्या हितासाठी उचललेल्या या विधायक पावलाचे नागरिकांकडून कौतुक व्यक्त केले जात आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २१४ ■ बुधवार, १ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.



### विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ

## पहिल्याच पावसात पहिल्याच दिवशी जिल्हा परिषद शाळा जलमय

### विद्यार्थ्यांची पाण्यातूनच ज्ञानयात्रा, प्रशासन मात्र गाढ झोपेत

**आष्टी शहीद जनमाध्यम :** ग्रामीण भागातील शिक्षणाचा विकास, आधुनिक शाळा आणि विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार सुविधा अशा मोठमोठ्या घोषणा करणाऱ्या शासनाच्या दाव्यांना कारंजा (घा.) तालुक्यातील बोटोणा येथील जिल्हा परिषद शाळेने पहिल्याच पावसात चपराक लगावली आहे. शाळेच्या आवारात मोठ्या प्रमाणात पाणी साचून अक्षरशः तलावाचे स्वरूप निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून साचलेल्या पाण्यातून वाट काढत वर्गात जावे लागत आहे. ही परिस्थिती केवळ प्रशासनाच्या दुर्लक्षाची नव्हे, तर ग्रामीण विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू असल्याचे चित्र उभे करत आहे.

पहिल्याच पावसाने पहिल्याच दिवशी शाळेतील व्यवस्थेचे पितळ उघडे पाडले आहे. शाळेच्या परिसरात पाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीही प्रभावी व्यवस्था नसल्याने संपूर्ण आवार जलमय झाले आहे. चिखल, साचलेले घाण पाणी आणि दुर्गंधी यामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. लहान मुलांना शाळेत प्रवेश करण्यासाठी पाण्यातून चालत जावे लागत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.



विशेष म्हणजे, ग्रामीण शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन शासनाकडून सातत्याने दिले जाते. मात्र प्रत्यक्षात बोटोणा येथील शाळेची अवस्था पाहता विकासाच्या घोषणांचा फुगा फुटल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. शिक्षण विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेत पाहणी करून उपाययोजना केल्या असत्या तर आज विद्यार्थ्यांवर ही वेळ आली नसती, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

पालकांनी अनेकदा शाळेच्या समस्यांकडे संबंधित विभागाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र केवळ आश्वासनांची खैरात झाली, प्रत्यक्ष काम मात्र झाले नाही. परिणामी, प्रत्येक पावसाळ्यात विद्यार्थ्यांना याच हालअपेष्टा सहन कराव्या लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या मंदिरात जाण्यासाठी पाण्याच्या तळ्यातून वाट काढावी लागत असेल, तर विकास नेमका कुठे झाला असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. आता तरी शिक्षण विभाग, जिल्हा परिषद प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने पाहणी करून शाळेच्या आवारातील पाण्याचा निचरा, आवश्यक दुरुस्ती आणि कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा या प्रश्नावर तीव्र जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे,

## रिधोरा पंचधारा धरणात बुडून दोघांचा मृत्यू

### वर्ध्यातील चार मित्र फिरण्यासाठी गेले; मद्यधुंद अवस्थेत आंघोळीसाठी उतरल्याने दुर्घटना

**सेलू जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील रिधोरा येथील पंचधारा धरणात मंगळवारी दुपारी आंघोळीसाठी उतरलेल्या वर्धा शहरातील चार मित्रांपैकी दोघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या दुर्घटनेमुळे दोन्ही कुटुंबांवर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ओम वरठी (वय ३८, रा. सावजी नगर, वर्धा), राकेश (वय ३४, रा. आदिवासी कॉलनी, वर्धा), प्रवीण हिवसे (रा. गजानन नगर, वर्धा) आणि चंदू मेश्राम (रा. सावजी नगर, वर्धा) हे चौघे मित्र मंगळवारी दुपारी रिधोरा येथील पंचधारा धरण परिसरात फिरण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांनी मद्यप्राशन केल्यानंतर धरणाच्या पाण्यात आंघोळीसाठी प्रवेश केला. मात्र, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने ओम वरठी आणि राकेश हे दोघे खोल पाण्यात बुडाले.



दोघे बुडत असल्याचे लक्षात येताच सोबतच्या मित्रांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रयत्न निष्फळ ठरल्याने त्यांनी रिधोरा गावात धाव घेऊन ग्रामस्थांना माहिती दिली. ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली व पोलिसांनाही कळविण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच सेलू पोलीस ठाण्याचे ठाणेदार पंकज वाघोडे सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने शोधमोहीम राबविण्यात आली. काही वेळाने दोघांचे मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. या घटनेने मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून वर्धा शहरात शोककळा पसरली आहे. या प्रकरणी सेलू पोलीस पुढील तपास करीत आहेत. दरम्यान, पावसाळ्यात धरणे, तलाव व नदी परिसरात जाताना नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी तसेच मद्यधुंद अवस्थेत पाण्यात उतरणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## देवळीत भीषण अपघात; रात्रीची ड्युटी संपवून घरी परतणाऱ्या २४ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू

**देवळी जनमाध्यम :** देवळी शहरातील रामदास तडस आयटीआयसमोर मंगळवारी सकाळी साडेसातच्या सुमारास झालेल्या भीषण रस्ता अपघातात मयूर सुरेश भेंडारे (वय २४, रा. वायगाव (निपाणी) या युवकाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मयूर भेंडारे हे एमआयडीसी परिसरातील एका खासगी उद्योगात कार्यरत होते. रात्रीची ड्युटी संपवून ते दुचाकीने आपल्या गावी परतत असताना रामदासजी तडस आयटीआयसमोर त्यांच्या



वाहनाचा भीषण अपघात झाला. अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की, त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच नागरिक नरेश जोशी यांनी तत्परता दाखवत ११२ आपत्कालीन ॲम्बुलन्स सेवेला तसेच देवळी पोलीस ठाण्याला दूरध्वनीद्वारे माहिती दिली. त्यानंतर पोलीस व आपत्कालीन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पुढील तपास सुरू आहे. तरुण वयात झालेल्या मयूर यांच्या अकाली निधनामुळे भेंडारे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. वायगाव (निपाणी) व देवळी परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांनी या दुर्दैवी घटनेबद्दल तीव्र हळहळ व्यक्त केली आहे.

## स्थलांतरित कामगारांना दिलासा; वर्ध्यात १.५७ लाखांची थकीत मजुरी मिळाली

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरातील गांधी पुतळा परिसरात काम करणाऱ्या मध्य प्रदेशातील कटनी जिल्ह्यातील बिछिया गावच्या स्थलांतरित कामगारांना अखेर त्यांच्या हक्काची थकीत मजुरी मिळाली. महिला व बाल विकास विभाग, चाईल्ड हेल्पलाईन, पोलीस प्रशासन आणि कामगार विभाग यांच्या समन्वित प्रयत्नांतून संबंधित ठेकेदाराकडून सुमारे १ लाख ५७ हजारांची थकीत मजुरी अदा करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, गांधी पुतळा परिसरात काही स्थलांतरित कामगारांना नियमानुसार मजुरी मिळत नसल्याची माहिती महिला व बाल विकास विभागाच्या चाईल्ड हेल्पलाईन पथकाला मिळाली. त्यानंतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कामगारांशी संवाद साधून त्यांना वर्धा शहर पोलीस ठाण्यात नेले आणि संपूर्ण प्रकरणाची माहिती पोलिसांना दिली.

पोलिसांनी संबंधित ठेकेदाराशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून त्यांना पोलीस ठाण्यात हजर राहण्यास सांगितले. त्यानंतर कामगार अधिकारी, वर्धा यांना घटनेची माहिती देण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सरकारी कामगार कार्यालयात ठेकेदार व कामगारांची संयुक्त सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीनंतर संबंधित ठेकेदाराने सर्व कामगारांची सुमारे १ लाख ५७ हजारांची थकीत मजुरी अदा केली. विविध शासकीय यंत्रणांच्या समन्वयातून स्थलांतरित कामगारांना न्याय मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले. या कारवाईमुळे मजुरांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी प्रशासन सजग असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

## कार्यसम्राटांच्या मतदारसंघात रस्त्यांसाठी लढा
## माजी नगरसेविकेचा प्रशासनाला इशारा

**हिंगणघाट जनमाध्यम :** हिंगणघाट शहरातील बस स्टँड चौक ते झाशी राणी चौक हा अत्यंत वर्दळीचा मुख्य रस्ता सध्या खड्ड्यांच्या विळख्यात सापडला असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा संतप्त आरोप होत आहे. विकासाच्या घोषणा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या दाव्यांना या रस्त्यानेच चपराक दिल्याचे चित्र निर्माण झाले आहे. अखेर या गंभीर प्रश्नासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या नेत्या व माजी नगरसेविका सौ. शुभांगी सुनील डोंगरे यांना आंदोलनाचा इशारा द्यावा लागल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

बस स्टँड चौक ते झाशी राणी चौक हा शहरातील सर्वाधिक रहदारीचा मार्ग आहे. याच परिसरात अनेक नामांकित रुग्णालये, शाळा, महाविद्यालये आणि ट्युशन क्लासेस असल्याने दररोज हजारो नागरिक, विद्यार्थी, महिला व रुग्ण या मार्गाचा वापर करतात. मात्र रस्त्यावर पडलेल्या प्रचंड खड्ड्यांमुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर माजी नगरसेविका शुभांगी डोंगरे यांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत प्रशासनाला आठ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. या कालावधीत रस्त्याची तातडीने डागडुजी करून वाहतूक सुरळीत न केल्यास रस्त्यावर बसून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.



डोंगरे यांनी प्रशासनासह सत्ताधारी लोकप्रतिनिधींनाही थेट आव्हान देत, एकदा तरी या खड्डेमय आणि चिखलाने भरलेल्या रस्त्यावरून पायी चालून नागरिकांच्या वेदना अनुभवा, असे सुनावले आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

हिंगणघाटचे कार्यसम्राट म्हणून ओळखले जाणारे आमदार समीर कुणावार यांच्या विधानसभा मतदारसंघात एका माजी नगरसेविकेला रस्ता दुरुस्तीसाठी उपोषणाचा इशारा द्यावा लागतो, ही बाब प्रशासनाच्या अपयशाची आणि विकासाच्या दाव्यांवरील मोठी शोकांतिका असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

दरम्यान, या निवेदनाची प्रत बांधकाम विभागासह संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आली असून, आता प्रशासन आठ दिवसांत खड्डे बुजवते की आंदोलनाला सामोरे जाते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## स्मार्ट मीटरच्या तक्रारींचा भडका;
## नागरिकांची राष्ट्रवादीकडे धाव

**हिंगणघाट जनमाध्यम :** स्मार्ट मीटर बसविल्यानंतर वाढीव वीजबिल, वारंवार वीजपुरवठा खंडित होणे आणि विविध तांत्रिक अडचणींमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांची भेट घेऊन आपल्या समस्या मांडल्या. विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी स्मार्ट मीटरमुळे आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची खंत व्यक्त केली.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पूर्वीच्या मीटरच्या तुलनेत स्मार्ट मीटरमुळे वीजबिलात अनपेक्षित वाढ होत आहे. तसेच रिचार्ज संपताच वीजपुरवठा तत्काळ खंडित होणे, तांत्रिक बिघाड, मीटरच्या अचूकतेबाबत निर्माण झालेले प्रश्न आणि ग्राहकांना पुरेशी माहिती न मिळणे यामुळे सर्वसामान्य ग्राहकांमध्ये असंतोष वाढत आहे. शासनाने स्मार्ट मीटर योजनेतील त्रुटी दूर करून ग्राहकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करावे, वाढीव वीजबिलांची सखोल चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली.

यावेळी अतुल वांदिले यांनी इशारा देत सांगितले की, स्मार्ट मीटरच्या नावाखाली सर्वसामान्य जनतेची आर्थिक लूट सुरू असेल तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शांत बसणार नाही. शासन आणि महावितरणने आठ दिवसांच्या आत सर्व तक्रारींची दखल घेऊन ठोस निर्णय घ्यावा. अन्यथा संतप्त नागरिकांसह तीव्र आंदोलन छेडले जाईल. त्यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी शासन व महावितरण प्रशासनाची राहील.

## कामगार विभागात 'आयडी'चा काळाबाजार : सरकारी कामगार अधिकाऱ्याविरुद्ध उच्चस्तरीय चौकशीची मागणी

### दलालांमार्फत अर्ज मंजुरी, हजारो अर्जांतील अनियमिततेची चौकशीची मागणी

### लॉगिन आयडी कंत्राटी कर्मचाऱ्यांकडे दिल्याचा आरोप

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या नोंदणी, नूतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांच्या अर्जांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व कार्यालयीन अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी सरकारी कामगार अधिकारी सीमा शिंदे यांच्या कार्यकाळाची उच्चस्तरीय चौकशी करून त्यांना तातडीने निलंबित करण्याची मागणी करणारे निवेदन मुख्यमंत्री, कामगारमंत्री, गृहराज्यमंत्री, प्रधान सचिव आणि कामगार आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात आले आहे.

तक्रारीनुसार, नोंदणी अधिकाऱ्यांचा अधिकृत लॉगिन आयडी कंत्राटी कर्मचारी प्रदीप राठोड व इतर कर्मचाऱ्यांना वापरण्यास देण्यात आला. त्याद्वारे दलाल व मध्यस्थांकडून आलेल्या अर्जांना प्राधान्याने मंजुरी देण्यात आली, तर अनेक पात्र बांधकाम कामगारांचे अर्ज नामंजूर करण्यात आल्याचा आरोप आहे. अवघ्या १५ दिवसांत हजारो अर्ज मंजूर व नामंजूर झाल्याने संपूर्ण प्रक्रियेवर संशय व्यक्त करण्यात आला आहे.

तक्रारीत मागील १५ दिवसांतील सर्व अर्जांचे विशेष लेखापरीक्षण (स्पेशल ऑडिट), प्रणालीतील लॉग रेकॉर्ड, आयपी ॲड्रेस व सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. अधिकारी अनुपस्थित असताना अर्ज निकाली काढण्यात आले का, एकाच वेळी दोन किंवा अधिक लॉगिन आयडी वापरले गेले का, याचाही तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय बोगस ९० दिवसांच्या कामाच्या प्रमाणपत्रांना मंजुरी, डेटा एन्ट्री ऑपरेटरच्या चुकीच्या नोंदींमुळे हजारो अर्ज नामंजूर होणे, तसेच प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेतील प्रशिक्षण प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचाही संशय तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करून वर्ध्यातून बदली करावी तसेच दोषी आढळणाऱ्या अधिकारी, कर्मचारी व इतर संबंधितांविरुद्ध शिस्तभंगासह फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

### शेतकरी व शेती व्यवसायाला पाठबळ

राज्यातील सर्वच घटकांना दिलासा देण्यासाठी शासन विविध प्रकारच्या योजना आखून त्याची अंमलबजावणी करते. समाजातील प्रत्येकास विकासाच्या प्रक्रियेत पुढे जाण्याचा, स्वत:चा व कुटुंबाचा आर्थिक विकास साधून चांगले जीवनमान मिळविण्याचा अधिकार आहे. यासाठी शासनाचा कायमच पाठिंबा असतो आणि त्यामुळेच अव्याहतपणे कल्याणकारी उपक्रम राज्य शासनाकडून राबविण्यात येते. शेतकरी अन्नदाता आहे. विविध संकटांचा कायम सामना या अन्नदात्यास करावा लागतो. त्यामुळे त्यांना दिलासा देण्यासाठी राज्याने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर केली आहे. शेतकऱ्याला आर्थिक स्थैर्य देण्यासोबतच शाश्वत शेतीच्या दिशेने नेणारी ही योजना आहे.

महाराष्ट्रातील शेती आजही मोठ्या प्रमाणावर निसर्गावर अवलंबून आहे. विविध प्रकारचे नैसर्गिक संकट, नापिकी आणि कृषि निविष्ठांच्या वाढत्या दरामुळे शेतकरी सातत्याने आर्थिक संकटात सापडतो. अशा परिस्थितीत कर्ज हा शेतीचा अविभाज्य भाग बनतो. परंतु जेव्हा हे कर्ज परतफेडीच्या क्षमतेपलीकडे जाते, तेव्हा त्याचे रूप आर्थिक विवंचनेत बदलते. त्यामुळे शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी शासनाने यापूर्वीही विविध कर्जमुक्ती योजना राबवल्या. मात्र यावेळी शासनाने केवळ कर्जमुक्तीचा विचार न करता भविष्यात शेतकरी पुन्हा त्याच परिस्थितीत अडकणार नाही, यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे.

या योजनेचे वैशिष्ठ्य असे की, यापूर्वी अनेकदा असे होत असे की दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना कोणताही लाभ मिळत नसे. या योजनेत मात्र दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती शासनाकडून मिळणार आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना नव्याने कर्ज घेण्याचा आणि शेती उभी करण्याचा मार्ग खुला होणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान हे या योजनेचे अजून एक वैशिष्ठ्य आहे. वेळेवर कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन मिळणे आवश्यक असते. ही बाब लक्षात घेऊन शासनाने पन्नास हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. अनेक शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याने ते कर्जमुक्तीच्या चौकटीत बसत नसत. आता अशा शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे तातडीचा आर्थिक भार कमी होऊन त्यांना नियोजनबद्ध पद्धतीने कर्जमुक्तीचा लाभ घेता येणार आहे.

राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असून जवळपास ३६ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार आहे.

राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांमधील कर्जदारांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. ही योजना शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून मुक्त करण्यासोबतच त्यांना आत्मविश्वास आणि शेती व्यवसायाला भक्कमपणे पाठबळ देणारी ठरणार आहे.

**मंगेश वरकड**
जिल्हा माहिती अधिकारी
वर्धा

### कोर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय

आपणास याव्दारे सुचीत करण्यांत येते की, अर्जदार शेख कदीर शेख करीम, रा. सेन्ट्रल वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा. यांनी कलम १३(३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचा जन्म हिंगणघाट येथील असून अर्जदार नामे शेख कदीर शेख करीम यांची जन्म तारीख ०३/०६/१९७० ची नोंद नगरपरिषद कार्यालय हिंगणघाट यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ये घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज/ प्रकरण सादर केलेला आहे.

वर नमुद जन्म नोंदणीबाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे ८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण

दिनांक :-१४/०५/२०२६

**(योगेश शिंदे)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट**

### कोर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय

आपणास याव्दारे सुचीत करण्यांत येते की, अर्जदार शेख नाजिम शेख करीम, रा. सेन्ट्रल वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा. यांनी कलम १३ (३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचा जन्म हिंगणघाट येथील असून अर्जदार नामे शेख नाजिम शेख करीम यांची जन्म तारीख ०१/०८/१९८६ ची नोंद नगरपरिषद कार्यालय हिंगणघाट यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ध घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज / प्रकरण सादर केलेला आहे.

वर नमुद जन्म नोंदणीबाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे ८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :-

दिनांक :-१४/०५/२०२६

**(योगेश शिंदे)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## शेतकरी कर्जमाफी म्हणजे निव्वळ बनवाबनवी

### विजय वडेट्टीवारांचा सरकारवर घणाघात

**मुंबई/प्रतिनिधी-** राज्यातील शेतक-यांसाठी जाहीर करण्यात आलेली कर्जमाफी ही निव्वळ बनवाबनवी आणि फसवी असल्याचा घणाघाती आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. मंगळवारी (३० जून) विधानभवनात माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी प्रशासकीय अधिका-यांच्या गैरहजेरीवर प्रश्न केला. पत्रकारांशी बोलताना विजय वडेट्टीवार यांनी सरकारला घेरले. प्रशासकीय अधिकारी वारंवार गैरहजर राहत असल्याच्या मुद्यावर वडेट्टीवार संतापले. ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी वारंवार सांगूनही प्रशासन निर्ढावल्यासारखे वागत आहे. याचा अर्थ सरकारचा धाक आता प्रशासनावर राहिलेला नाही. या अधिका-यांची मग्रु री आणि मस्ती वाढली आहे. केवळ कारणे दाखवा नोटीस देउन काहीही होणार नाही. जर खरंच धाक निर्माण करायचा असेल, तर या लोकांची किमान दोन इन्क्रिमेंट (वेतनवाढ) रोखली पाहिजेत. तरच ही शिक्षा दिसेल आणि पुन्हा कोणी असे धाडस करणार नाही.



**सरकारकडून केवळ तारीख पे तारीख-** कर्जमाफीच्या आकड्यांवरू न सरकारला उघडे पाडताना ते म्हणाले, सरकारने साडेछत्तीस हजार कोटींची कर्जमाफी जाहीर केली, पण पुरवणी मागण्यांमध्ये फक्त २० हजार कोटींची तरतूद आहे. मग उरलेले साडेसोळा हजार कोटी कुठून आणणार? तुम्ही हा गॅप कसा भरू न काढणार? याचा अर्थ ही पूर्णपणे बनवाबनवी आहे. हे आकडे फुगवून सांगितले आहेत. शेतक-यांचा खरीप हंगाम सुरू झाला आहे. तो कर्जाची वाट बघतोय, पण सरकार केवळ तारीख पे तारीख देउन टाईमपास करत आहे. यावरू न या सरकारची दुटप्पी भूमिका दिसून येते, असा हल्लाबोल त्यांनी केला.

**अर्थसंकल्पातून शेतकरी गायब-** तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या पूर्वीच्या अर्थसंकल्पांची आठवण करून देत वडेट्टीवार म्हणाले, तुमच्या मूळ अर्थसंकल्पात कृषी विभागासाठी मोठी तरतूद होती. पण त्यातील फक्त ५टक्के निधी खर्च झाला आहे आणि आता पुन्हा पुरवणी मागण्या का आणल्या आहेत? हा फक्त आकड्यांचा खेळ आहे.

## सांगलीत खासगी ट्रॅव्हल्सला भीषण अपघात; 2 ठार, 15 हून अधिक प्रवासी जखमी

**सांगली / प्रतिनिधी-** सांगलीमध्ये भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. प्रवाशांनी खचाखच भरलेल्या खासगी ट्रॅव्हल्सला भीषण अपघात झाला. भरधाव बस रस्त्याच्या कडेला उलटली. या अपघातामध्ये दोघांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये बसचालकाचा समावेश आहे. अपघाताची ही घटना पलूसच्या घोगाव येथे घडली. या अपघातामध्ये बसमधील १५ प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी रु ग्णालयात दाखल करण्यात आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सांगलीच्या पलूस तालुक्यातील घोगाव येथे खासगी ट्रॅव्हल्स बसला भीषण अपघात झाला. भरधाव बसवरील चालकाचा ताबा सुटला आणि बस रस्त्याच्या कडेला उलटली. या अपघातामध्ये दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामध्ये १५ हून अधिक प्रवासी किरकोळ जखमी झाले. मृतांमध्ये बसचालक आणि क्लीनरचा समावेश आहे. कराड-तासगाव मार्गावर हा अपघात झाला. भरधाव बसवरील चालकाचा ताबा सुटल्याने रस्त्याच्या कडेला असणा-या झाडावर जाउन बस आदळी. ज्यामध्ये बसचालकासह क्लीनरचा जागीच मृत्यू झाला. कराड-तासगाव मार्गावरील रस्त्याचे काम अपूर्ण असून अरु ंद रस्त्यामुळे अचानक वेग कमी करावा लागल्याने हा अपघात झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.



## बिजेंद्र गुप्ता टीईटी पेपर लीक प्रकरणाचा मास्टरमाईंड

**मुंबई/पाटना** : महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा पेपर लीक प्रकरणात आता एक अत्यंत धक्कादायक आणि मोठी अपडेट समोर आली आहे. या संपूर्ण घोटाळ्याचे धागेदोरे थेट बिहारपर्यंत पोहोचले असून समस्तीपूरचा रहिवासी असलेला बिजेंद्र कुमार गुप्ता हा या पेपर लीक प्रकरणाचा मुख्य सूत्रधार असल्याची माहिती समोर येत आहे. भिवंडी पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत ३ आरोपींना अटक केली असून, मुख्य सूत्रधाराच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत.



भिवंडी पोलिसांच्या वरिष्ठ अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार, फरार आरोपी बिजेंद्र कुमार गुप्ता उर्फ बालेश्वर कुमार साह हा मूळचा बिहारच्या समस्तीपूरचा रहिवासी आहे. बिजेंद्र हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशातील अनेक राज्यांमध्ये पेपर लीक केल्याचे गंभीर आरोप आहेत. जुलै २०२३ मध्ये ओडिशामध्ये त्याच्यावर पेपर लीकप्रकरणी दोन गुन्हे दाखल झाले होते. याशिवाय अनेक राज्यांमध्ये तो व?न्टेड आहे. हे आरोपी पकडले जाउ नयेत म्हणून वेगवेगळ्या राज्यांत आपली खोटी नावे वापरू न वावरत असत.

**५ जणांवर गुन्हा, पोलिसांची पथके रवाना-** या प्रकरणात पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरमध्ये पाच आरोपींची नावे आहेत. यामध्ये राजीव श्री प्रयाग शाव, आकाश कुमार स्वराज कुमार, धीरज बलराज सिंह, कपिल दहिया (फरार) आणि बिजेंद्र कुमार गुप्ता यांचा समावेश आहे. सध्या फरार आरोपी कपिल दहिया आणि बिजेंद्र गुप्ता यांच्या अटकेसाठी पोलिसांची १० पथके तैनात करण्यात आली आहेत. भिवंडी पोलिसांचे पथक सध्या हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार आणि दिल्लीमध्ये तळ ठोकून असून आरोपींचा शोध घेत आहे.

## मराठी-हिंदी चित्रपटांमध्ये तगडी टक्कर; एकाच दिवशी रिलीज होणार 4 चित्रपट

**मुंबई :**जुलै महिन्यात पहिल्याच आठवड्यात मराठी आणि हिंदी चित्रपटांमध्ये तगडी टक्कर पाहायला मिळणार आहे. एकाच दिवशी म्हणजे ३ जुलै २०२६ ला (शुक्रवारी) २ मराठी आणि २ हिंदी चित्रपट रिलीज होत आहेत. कोणत्या चित्रपटाला अधिक गर्दी जमणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. आलिया भट्ट आणि शर्वरी वाघचा अल्फा चित्रपट ॲक्शन, स्पाय, थ्रिलर आहे. अल्फा हा यशराज फिल्म्सचा चित्रपट आहे. अल्फा चित्रपटात आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ ॲक्शन मोडमध्ये पाहायला मिळणार आहेत. अल्फा हा भारतातील पहिला महिलाप्रधान ॲक्शन चित्रपट आहे. चित्रपटात हतिक रोशन एका दमदार कॅमिओमध्ये दिसणार आहे. बेबी डू डाय डू हा क्राईम, ॲक्शन चित्रपट आहे. हा चित्रपट बेबी कर्माकर नावाच्या एका सामान्य कर्णबधिर-मूक एनजीओ कार्यकर्तीची कथा आहे. जी गुप्तपणे मुंबईत एक निर्दयी सुपारी किलर म्हणून काम करते. चित्रपटात हुमा कुरैशी मुख्य भूमिकेत झळकली आहे. मर्दिनी हा चित्रपट एका आईवर आहे, जी आपल्या मुलीसाठी कोणतेही धाडस करू शकते. ज्याला आई तारी, त्याला कोण मारी ही टॅगलाईन खूप प्रसिद्ध झाली. या चित्रपटात आईच्या भूमिकेत मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहेरे आणि मुलीच्या भूमिकेत बाल कलाकार मायरा वायकुळ झळकणार आहे. आउट ऑफ सिलॅबस : पुस्तकांच्या पलीकडे हा चित्रपट एमपीएससी (महाराष्ट्र लोकसेवा आयोग) परीक्षेची तयारी करणा-या तरु णांच्या संघर्षावर आधारित आहे. चित्रपटात अभिनेता अजिंक्य राउत, अभिनेत्री अद्वयी मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. नागबंधम : द सीक्रेट ट्रेजर हा साउथ चित्रपट आहे. हा चित्रपट तेलुगू आणि हिंदीत डब होणार आहे. हा पौराणिक कथा आणि इतिहासावर आधारित एक भव्य ॲक्शन-ॲडव्हेंचर चित्रपट आहे. ही कथा एका योद्ध्याभोवती फिरते.




# ‘ऑपरेशन टायगर’ नव्हे, ‘ऑपरेशन देवेंद्र फडणवीस’

**मुंबई/प्रतिनिधी-** शिवसेना ठाकरे गटाला आणखी एक मोठा धक्का बसला असून सचिन अहिर यांनी ठाकरे गटाला रामराम करत थेट शिंदे सेनेकडून उपसभापतिपदाचा अर्जही भरला आहे. त्यामुळे हा उद्धव ठाकरे यांच्यासह आदित्य ठाकरे यांनाही मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे. आदित्य ठाकरे म्हणाले, माझा भाजप आणि संघाच्या लोकांना सवाल आहे की, एवढे सगळे लोक तुम्ही डोक्यावर बसवून घेतले आहेत, त्यात अजून उपसभापतिपदावर बसवले आहे. का नाही कोणी भाजपचा तिथे बसलेला आहे? आज इतके वर्ष घरदार सोडून भाजपसाठी काम करणारे लोक आहेत, त्यांना का नाही बसवले? हे उपरे का बसवून घेतले? याचा भाजपने विचार केला पाहिजे. त्यामुळे मी पुन्हा सांगतो की हे ऑपरेशन टायगर नसून ऑपरेशन देवेंद्र फडणवीस आहे.गेले ४ दिवस आम्ही पाहत आहोत, ज्या लोकांना सगळं काही मिळतं तेच स्वतःच्या स्वार्थासाठी निघून जात आहेत. यात धक्का बसण्यासारखे काही नाही. वरळी, शिवडी हा आमचा बालेकिल्ला आहे आणि तिथे आमचे काम बोलते. पण एकच दुर्दैव आहे की ज्यांना आम्ही सगळे काही दिले, बरं ही एक व्यक्ती अशी आहे की आदित्य ठाकरे भेटत नाही, असं नव्हतं. परवा येताना आम्ही पुण्यातून सोबतच आलो. एवढे असूनही तुम्हाला अजून काय पाहिजे आहे, अजून किती ओरबाडणार आहात?

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, स्वतः आमदार आहेत, जी प्रभाग समिती आहे त्यांच्या मुलीला आम्ही एनजीओचा जो कोटा असतो त्यातून समिती दिली आहे.



कामगार सेनेत पद दिले होते, शिवसेनेत पद दिले होते. एवढे सगळे होउन देखील बीएससी तर आहेच, अजून तुम्हाला काय पाहिजे? आम्ही काही कमी दिलं का? रोज भेटत होतो? रोज काय करायचे होते तुमच्यासाठी? आरत्या करायच्या होत्या का? असा सवालही ठाकरे यांनी केला आहे.

**मंदिरे लुटणा-यांसोबत तुम्ही कसे बसू शकता?**

लोकशाहीचे काय होणार, संविधानाचे काय होणार, असे अनेक विचार आहेत. मला सचिन भाउ यांना देखील प्रश्न विचारायचा आहे की, जे आपली मंदिरे लुटत आहेत, उज्जैनमध्ये जमीन घोटाळा केला, अयोध्यामध्ये जमीन घोटाळा केला, अशी हिंदू मंदिरे लुटणा-यांसोबत तुम्ही कसे बसू शकता? संविधान बदलण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांच्यासोबत कसे बसू शकता? हे ऑपरेशन टायगर नसून ऑपरेशन देवेंद्र फडणवीस आहे, हे आम्हाला अभ्यास केल्यानंतर समजले आहे. पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, वरळीमध्ये जरी ते उभे राहिले तरी फरक नाही पडणार. मला सकाळीच त्यांनी मेसेज केला की विरोधात उभा नाही राहणार, पण या बोलायच्या गोष्टी असतात. महत्त्वाची गोष्ट हीच आहे की वाराणसीमध्ये सुद्धा एकाला तीन वेळेस मागे जावे लागले होते. आज मी परत एकदा विचारत आहे की ज्यांनी राम मंदिराच्या नावावर दंगली घडवल्या, आंदोलन करायला लावले, तेच आज राम मंदिर लुटत आहेत.

**संजय राउत यांचाही निशाणा-**उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे खासदार संजय राउत यांनीही सचिन अहिर यांच्या पक्ष सोडण्यावर टीका केली. संजय राउत यांनी एक्स या सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. त्या पोस्टमध्ये ते म्हणतात, आम्ही चार किरणांचीही आस का धरावी? जे कधीच नव्हते आमचे त्याची वाट का पहावी?, पक्षात येतानाच जे स्वार्थ आणि बेइमानीचा किडा घेउन येतात त्यांच्या जाण्याचे दुःख का करावे?

## ही बंडखोरी नसून सौदा अन् गद्दारी-अरविंद सावंतांचा संताप

**मुंबई/प्रतिनिधी-** आठ दिवसांपूर्वी शिवसेना ठाकरे गटातील सहा खासदारांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. चार वर्षांमध्ये पुन्हा त्याच दिवशी शिंदेंच्या शिवसेनेने ठाकरे गटाला मोठा धक्का दिला. शिंदेंच्या या धक्क्यातून ठाकरे सावरत नाहीत तोच आता पुन्हा एकदा शिंदेंनी ठाकरेंना धक्का देत ठाकरे गटातील विधान परिषदेतील आमदार सचिन अहिर यांना गळाला लावले आहे.



उपसभापतिपदाच्या निवडणुकीसाठी सचिन अहिर यांनी थेट शिंदेंच्या शिवसेनेतून अर्ज भरला आहे. अहिर यांनी अर्ज भरला त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि शिवसेनेतील अन्य नेते उपस्थित होते. परंतु, ही बंडखोरी नसून हा सौदा असल्याचा हल्लाबोल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी केला आहे.विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी शिवसेना शिंदे गटाकडून उपसभापतिपदाचा अर्ज भरल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत तीव्र नाराजी आणि सातत्याने घडणा-या या राजकीय घडामोडीबाबत संताप व्यक्त केला आहे. या राजकीय घडामोडीवर एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना खासदार अरविंद सावंत म्हणाले की, याला बंडखोरी म्हणतात की विकाउ म्हणतात.

हे विकाउ आमदार आहेत. तुम्ही देशाच्या संविधानाला मानता की नाही इथून सुरु वात आहे. ज्यांनी पक्ष सोडला ते आधी कायद्याने अपात्र व्हायला हवेत. विधानसभा अध्यक्ष याबाबत काही करतील असे वाटत नाही. तरीसुद्धा आता समाजाने याबाबत विचार करायची गरज आहे. माणसे कशी विकाउ निघत आहेत ती पाहा. विधान परिषदेची टर्म संपणार असल्याने मला निवडून आणा आणि उपसभापतिपद द्या हा सौदा आहे, ही गद्दारी आहे, असे म्हणत सावंतांनी संताप व्यक्तकेला आहे.

## 1 जुलैपासून एचएसआरपी नंबरप्लेट नसेल तर कारवाई होणार : परिवहन मंत्री

**मुंबई / प्रतिनिधी-**उद्या (१ जुलै) पासून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बंधनकारक असेल. याआधी पाच वेळा मुदतवाढ दिली असून पुन्हा मुदतवाढ मिळणार नाही, आता ठोस कारवाई केली जाणार, असे राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज (दि. ३०) स्पष्ट केले.

१ एप्रिल २०१९ नंतरच्या नव्या वाहनांना कंपनीकडून नंबर प्लेट मिळत होती. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत झालेल्या सर्व वाहनांना आता एचएसआरपी बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र शहरातील अनेक वाहने हे विना एचएसआरपी नंबरप्लेटशिवाय धावत आहेत. वारंवार मुदतवाढ देउनही एचएसआरपी नंबर प्लेटबाबत वाहनधारकांमध्ये उदासीनता दिसून येत असून, आज (दि. ३०) जून रोजी नंबरप्लेट बसविण्याची मुदत संपत आहे.परिवहन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार ३१ डिसेंबर २०१९ अखेर सुमारे १४ लाख ६७ हजार ७४२ वाहने नोंदणीकृत होती. या वाहनांना सुरक्षेच्या दृष्टीने एचएसआरपी नंबरप्लेट बसविणे बंधनकारक आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, नोंदणीकृत वाहनांपैकी १० जून २०२६ पर्यंत केवळ ६ लाख २८ हजार ६२४ वाहनमालकांनी एचएसआरपी बसविण्यासाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे. यामधील केवळ ५ लाख २६ हजार ७२० वाहनांवरच प्रत्यक्ष एचएसआरपी बसविण्यात आली आहे. सुमारे ८ लाख ३९ हजार वाहनांनी एचएसआरपीसाठी अद्याप नोंदणीच केली नाही.नोंदणी केलेल्या वाहनधारकांना अद्याप नंबरप्लेट बसवून घेतलेली नाही. शहरात अजूनही लाखो वाहने एचएसआरपी नंबरप्लेटविना रस्त्यावर धावत आहेत. अनेकदा मुदतवाढ देउनही निम्म्याहून अधिक वाहनचालकांनी ही प्रकिया पूर्ण केली नसल्याचे आकडेवारीवरू न निदर्शनास येत आहे.



## फुटबॉल विश्वचषकातून बलाढ्य जर्मनी आउट; पॅराग्वेने पेनल्टी शूटआउटमध्ये दिला धोबीपछाड

**बोस्टन /वृत्तसंस्था-**फुटबाल जगतात आज (दि. ३०) एक मोठा चमत्कार पाहायला मिळाला. बोस्टन स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अटीतटीच्या सामन्यात पॅराग्वेने चार वेळच्या विश्वविजेत्या जर्मनीचा पेनल्टी शूटआउटमध्ये ४-३ असा पराभव करत स्पर्धेतून बाहेरचा रस्ता दाखवला आहे. या ऐतिहासिक विजयासह पॅराग्वेने राउंड ऑफ १६ (अंतिम १६) मध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. पॅराग्वेचा हा फुटब?ल इतिहासातील जर्मनीविरु द्धचा सर्वांत मोठा विजय मानला जात आहे.सामन्याच्या सुरु वातीपासूनच दोन्ही संघांमध्ये जोरदार चुरस पाहायला मिळाली. पहिल्या हाफमध्ये पॅराग्वेच्या जुलिओ एनसिसो याने एक शानदार हेडर करत आपल्या संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. मात्र, दुस-या हाफमध्ये जर्मनीने जोरदार पुनरागमन केले. फ्लोरियन विर्ट्जच्या उत्कृष्ट क्रासवर काई हैवर्ट्जने सुरेख हेडर करत जर्मनीला १-१ अशी बरोबरी साधून दिली. निर्धारित ९० मिनिटांनंतर सामना अतिरिक्तवेळेत पोहोचला. १२ किमी/तास वेगाने धावणा-या खेळाडूंमध्ये प्रचंड थकवा दिसत असतानाच, जर्मनीच्या जोनाथन ताह याने गोल केला होता; मात्र फाउल झाल्यामुळे पंचांनी हा गोल रद्द केला. १२० मिनिटांचा खेळ संपल्यानंतरही धावसंख्या १-१ अशीच राहिल्याने सामना पेनल्टी शूटआउटमध्ये गेला.




**ऑरलँडो गिल सामन्याचा खरा हिरो**

पेनल्टी शूटआउटमध्ये पराग्वेचा गोलकीपर ऑरलँडो गिल सामन्याचा खरा हिरो ठरला. त्याने जर्मनीच्या दोन पेनल्टी उत्कृष्टपणे अडवून संघाचे विजेतेपद सुकर केले. त्यानंतर पॅराग्वेच्या जोसे कनाले याने निर्णायक पेनल्टी गोलमध्ये रूपांतरित करत पॅराग्वेच्या ऐतिहासिक विजयावर शिक्कामोर्तब केले.

**पेनल्टी शूटआउटमध्ये जर्मनीचा दबदबा-** पेनल्टी शूटआउटनंतर विजय हा जर्मनीने चार दशकांहून अधिक काळ विश्वचषकात एक रेकार्ड कायम ठेवला होता. मात्र यंदाच-या विश्-वचषकात हे रेकार्ड मोडित निघाले. या पराभवासह चार वेळच्या जागतिक विजेत्या जर्मनीला विश्वचषक इतिहासातील पहिल्याच पेनल्टी शूटआउटमध्ये पराभवाचा धक्का बसला आणि विश्वचषकातील सर्वांत प्रदीर्घ काळापासून असलेला एक ऐतिहासिक विक्रम मोडीत निघाला.

## बालभारतीचा ढिसाळ कारभार; चौथीच्या पुस्तकात गंभीर चुका

**पुणे/प्रतिनिधी-** राज्यभरातील शाळा सुरू झाल्या असून बालभारतीच्या ढिसाळ कारभाराचा आणखी एक धक्कादायक नमुना समोर आला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीसाठी नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात आला असून या नव्या पाठ्यपुस्तकांनुसार विद्यार्थ्यांचा अभ्यासही सुरू झाला आहे. मात्र, असे असतानाच चौथीच्या गणिताच्या नवीन पाठ्यपुस्तकात एक-दोन नव्हे, तर अनेक गंभीर चुका आढळल्या आहेत.

विशेष म्हणजे, मराठी आणि इंग्रजी दोन्ही माध्यमांच्या पुस्तकांमध्ये हा घोळ झाला आहे.

गणिताचे धडे देणा-या बालभारतीने थेट थोर भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या निधनाची तारीखच बदलण्याचा अक्षम्य पराक्रम केला आहे. गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचे निधन २६ एप्रिल १९२० रोजी झाले होते, मात्र नवीन पाठ्यपुस्तकात त्यांच्या निधनाची तारीख २७ एप्रिल १९२० अशी चुकीची छापण्यात आली आहे. केवळ इतिहासच नव्हे, तर गणिताच्या मूळ संकल्पना, लांबी-वजन आणि भागाकार या पाठातील आकड्यांमध्येही मोठी गडबड करण्यात आली आहे.



गणिताच्या मराठी माध्यमाच्या पाठ्यपुस्तकात पान क्रमांक ५५ वर स्वाध्याय शीर्षकाखाली ब गटात सहावा आकडा १००० ग्रॅमपेक्षा जास्त असा पर्याय दिला आहे, जो पूर्णपणे चुकीचा असून त्याऐवजी १००० किलोग्रॅमपेक्षा जास्त असा पर्याय हवा होता.

हाच गोंधळ इंग्रजी माध्यमाच्या पुस्तकातही पाहायला मिळत असून पान क्रमांक ७७ वर शेवटून पाचव्या ओळीत रु पये १.४०+९ = ४९ असे छापले आहे. मुळात, हे गणित ४०+९ = ४९ असे असायला हवे होते. अशा गंभीर चुकांमुळे बालभारतीचे बिनचूक पाठ्यपुस्तकांचे गणित पुरते बिघडले असून, लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ मांडला जात असल्याचे स्पष्ट होत आहे.

## बनावट अधिकारी बनून हॉटेलवर धाड; दोघांवर गुन्हा दाखल


**मुंबई/प्रतिनिधी-** अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार हातात घेतल्यापासून राज्यात भेसळ आणि गुटखा माफियांचे धाबे दणाणले आहेत. एकीकडे या धडक कारवायांचे सत्र सुरू असतानाच आता मुंबईत एक धक्कादायक बाब समोर आली असून दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर ही कारवाई बनावट एफडीए अधिकारी बनून हॉटेलवर धाड टाकल्याप्रकरणी करण्यात आली आहे.



तर या दोघांकडून तुकाराम मुंढे यांच्या नावाचा गैरफायदा घेत हाटेल चालकाला लुटण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील बोरिवली पश्चिमेकडे असलेल्या प्रसिद्ध आहार हाटेलवर दोघा संशयितांनी धाड टाकली. यावेळी या दोघांनी आम्ही अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी असल्याचे सांगत हाटेलची तपासणी सुरू केली. यावेळी या दोघांनी हाटेल मालकाकडे अन्न नमुने तपासण्याच्या नावाखाली दमदाटी करत कारवाईची थेट धमकी दिली.

यावेळी या दोघांनी हाटेल मालकाला कारवाईची भीती दाखवत बनावट ओळखपत्र दाखवत फसवणुकीचा प्रयत्न केला. यावेळी या दोघांच्या बोलण्यावरू न आणि वर्तनावरू न हाटेल मालकांना संशय आला आणि त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. या तक्रारीनंतर पोलिसांनी घटनास्थळाकडे धाव घेत तपास केला आणि दोघा बोगस अधिका-यांचा पर्दाफाश केला आहे. यानंतर विजय जाधव आणि स्वाती तुळसकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## राम मंदिरातील गैरव्यवहारावर पंतप्रधानांचे मौन का?



**मुंबई/प्रतिनिधी-**अयोध्येतील श्रीराम मंदिरातील देणग्या आणि हुंडीत जमा होणा-या निधीच्या कथित गैरव्यवहाराच्या आरोपांवरू न मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. या प्रकरणात विशेष तपास पथकाच्या प्राथमिक अहवालाचा उल्लेख करत, मंदिरातील देणगी, दागदागिने आणि आर्थिक व्यवहारांची पारदर्शक चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या सविस्तर भूमिकेत म्हटले आहे की, अयोध्येतील श्रीराम मंदिरात भक्तांकडून मोठ्या प्रमाणावर देणग्या, दागिने आणि इतर मौल्यवान वस्तू अर्पण केल्या जातात. मात्र, या सर्वांचा योग्य हिशेब ठेवला जात नसल्याचे आरोप समोर आले असून, या प्रकरणातील कथित गैरव्यवहाराबाबत केंद्र सरकारकडून कोणतीही ठोस भूमिका मांडली जात नसल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रकरणावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रातील वरिष्ठ नेत्यांनी अद्याप स्पष्ट भूमिका घेतलेली नसल्याचा दावा करत ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केला. राम मंदिराच्या उभारणीचे राजकीय श्रेय घेणा-यांनी मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहारावरही तितक्याच स्पष्टपणे बोलणे अपेक्षित असल्याचे त्यांनी म्हटले.

राम मंदिर हे संपूर्ण हिंदू समाजाचे राम मंदिर उभारणीसाठी देशभरातील लाखो रामभक्त, करसेवक, संत-महंत आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिल्याची आठवण करू न देत ठाकरे म्हणाले की, हे मंदिर कोणत्याही एका पक्षाचे किंवा संघटनेचे नसून संपूर्ण हिंदू समाजाच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. भक्तांनी मंदिरात अर्पण केलेला प्रत्येक रु पया हा त्यांच्या कष्टाचा आणि श्रद्धेचा असतो. अनेक महिलांनी आपल्या स्त्रीधनातूनही दागिने अर्पण केले असतील. त्यामुळे या निधीच्या वापराबाबत संपूर्ण पारदर्शकता असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.



**श्रद्धेला धक्का बसू नये-**राज ठाकरे यांनी आरोप केला की, मंदिरांतील देणग्यांबाबत वेळोवेळी प्रश्न उपस्थित होत असतात. त्यामुळे संबंधित विश्वस्त, व्यवस्थापन आणि जबाबदार अधिका-यांची निष्पक्ष चौकशी करू न सत्य जनतेसमोर आणणे गरजेचे आहे. श्रद्धेचा गैरवापर होउ नये आणि भक्तांचा विश्वास कायम राहावा, यासाठी कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

**मंदिरांच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आवश्यक-**देशातील अनेक मंदिरांच्या व्यवस्थापनावर यापूर्वीही प्रश्नचिन्हे उपस्थित झाले असल्याचा उल्लेख करत ठाकरे म्हणाले की, मंदिरातील आर्थिक व्यवहार पूर्णपणे पारदर्शक असावेत. श्रद्धाळूंनी दिलेल्या देणगीचा योग्य उपयोग होत आहे की नाही, याची नियमित तपासणी आणि लेखापरीक्षण होणे आवश्यक आहे.

**राजकीय संदर्भाचाही उल्लेख-**या प्रकरणाचा आगामी उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या राजकारणाशीही संबंध जोडला जाउ शकतो, अशी शक्यता व्यक्तकरत ठाकरे यांनी भाजपमधील अंतर्गत राजकारणावरही भाष्य केले. मात्र, या सर्व घडामोडींमध्ये सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रामभक्तांच्या श्रद्धेचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**निष्पक्ष चौकशीची मागणी-**राम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करू न दोषींवर कठोर कारवाई व्हावी, तसेच या प्रकरणात सत्य काय आहे, हे देशातील रामभक्तांसमोर स्पष्ट केले जावे, अशी मागणी राज ठाकरे यांनी केली आहे.

## अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत सभांचा दुष्काळ

# उपनगराध्यक्षांसह १७ नगरसेवकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अनगरपरिषदेचे नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांनी गेल्या अनेक दिवसांपासून एकही सर्वसाधारण सभा आयोजित केली नसल्याचा आरोप करत उपनगराध्यक्ष प्रियंका मालठाणे यांच्यासह १७ नगरसेवकांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात धाव घेतली आहे.

नगरपरिषद औद्योगिक नगरी नियम १९६५ च्या कलम ८१ नुसार नियमितपणे सभा घेणे बंधनकारक असताना देखील नगराध्यक्ष व मुख्याधिकारी जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यामुळे शहरातील महत्त्वाचे विकासकामे, नागरिकांचे प्रश्न आणि धोरणात्मक निर्णय रखडले असल्याची खंत नगरसेवकांनी व्यक्त केली.

उपनगराध्यक्ष प्रियंका मालठाणे यांच्या नेतृत्वाखाली १७ नगरसेवकांनी सोमवारी जिल्हाधिकारी यांना लेखी विनंती अर्ज सादर केला. अर्जात म्हटले आहे की,नगरपरिषदेच्या नियमानुसार दर महिन्याला किमान एक सर्वसाधारण सभा होणे आवश्यक आहे. मात्र नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सभा बोलावलेली नाही. सभेअभावी नाली बांधकाम, रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा योजना, स्वच्छता मोहीम आणि इतर नागरी सुविधांसंबंधीचे प्रस्ताव मंजूर होऊ शकलेले नाहीत. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.नगरपरिषद औद्योगिक नगरी नियम १९६५ च्या कलम ८१ नुसार नगरपरिषदेच्या कामकाजासाठी नियमित सभा घेणे अनिवार्य आहे. सभा न झाल्यास जिल्हाधिकारी यांना हस्तक्षेप करून सभा



आयोजित करण्याचे अधिकार आहेत. याच आधारावर नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने सभा लावण्याची मागणी केली आहे.'नागरिकांनी आम्हाला निवडून दिले आहे. त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सभा होणे गरजेचे आहे. परंतु जाणीवपूर्वक सभा टाळून विकासकामांना खीळ घातली जात आहे,'असे उपनगराध्यक्ष प्रियंका मालठाणे यांनी सांगितले.सध्या जिल्हाधिकारी कार्यालयाने हे निवेदन स्वीकारले असून संबंधितांवर काय कारवाई होते याकडे अंजनगाव सुर्जीतील नागरिकांचे लक्ष लागले आहे. नियमानुसार जिल्हाधिकारी नगराध्यक्षांना सभा बोलावण्याचे निर्देश देऊ शकतात. निर्देशानंतरही सभा न झाल्यास पुढील कायदेशीर कारवाईची शक्यता आहे.

> नगरपरिषद सत्ता स्थापन झाली तेव्हा पासून दोन सभा झाल्या आहेत तर तीसरी सभा विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू होती त्यामुळे ती सभा रद्द करण्यात आली होती. रद्द झालेली तीसरी सभा सात आठ दिवसांत होणार आहे. त्यामुळे शहरातील विविध प्रश्न या सभेच्या माध्यमातून सुटणार आहे.
>
> **अविनाश गायगोले नगराध्यक्ष**

## जेसीबीतून पुष्पवृष्टी करत विद्यार्थ्यांचे स्वागत

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**



जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता अधिकाधिक वाढावी, समाजामध्ये जिल्हा परिषद शाळांचे महत्त्व वृद्धिंगत व्हावे आणि पालकांनी आपल्या पाल्यांना जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेश द्यावा, या उद्देशाने शासनाच्या निर्देशानुसार दरवर्षी शाळा प्रवेशोत्सव साजरा केला जातो. त्यानुसार आज पंचायत समिती, चांदूर रेल्वे यांच्या वतीने जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, चांदूरवाडी येथे तालुकास्तरीय शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी इयत्ता पहिलीत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांच्या हस्ते गणवेश व मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांची गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. 'आम्ही शाळेला जाऊ, आम्ही शिकून मोठे होऊ', 'जिल्हा परिषद शाळा आमची शाळा', 'शिक्षण आमचा ध्यास, जिल्हा परिषद शाळा आमची खास' अशा घोषणांनी संपूर्ण गाव दुमदुमून गेले.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रथमच जेसीबीच्या साहाय्याने पुष्पवृष्टी करण्यात आली. शाळेच्या आवारात उभारलेल्या जेसीबीमधून गावकऱ्यांनी इयत्ता पहिलीतील नवागत विद्यार्थ्यांसह सर्व विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत केले.

यावेळी विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावतीचे उपायुक्त प्रवीण मानकर, उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे, गटविकास अधिकारी राणी माळवे, सहाय्यक गटविकास अधिकारी संजय खारकर, गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ, गटसमन्वयक मंगेश उल्हे, उपसरपंच सोनू शेख, विषयतज्ज्ञ निखिल दानापूरकर, विवेक राऊत, तसेच रेखा वडतकर, सचिन वावरकर, नंदकिशोर धरणे, अस्मिता गिरी, रूपाली थोरात, मोहम्मद अमीन, कल्पना वडकर, सपना शेळके, पूजा फिल्डर, अनिल वाडेकर, बापूलाल पानसे, नमुद्दीन काझी, प्रमोद सोनवणे, कौसर बानो, शकील अहमद, रीता वडकर (सरपंच), राहुल तांडेकर, प्रतिभा भगत, आबिदा बी, अजित शहा, रंजना ठाकरे, संजय विजय शिंदे यांच्यासह शिक्षक, पालक, ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाऊस पडल्यानंतरही कृउबा समितीत

# आंब्याची आवक कायम तर भाजीपाल्यात घट

**अमरावती/का.प्र.**

गेल्या आठवडया पासून पावसाने राज्यभर हजेरी लावली असल्याने विविध फळांसह भाजीपाल्यावर त्यांचा परिणाम झाला आहे. स्थानिक अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत विविध जातीच्या एक हजार क्विंटल आंब्याची आवक कायम आहे तर पावसामुळे भाजीपाल्याची आवक काही प्रमाणात घटली असून भाज्यांचे दर वधारले आहे.

कृउबा समितीत आंब्याच्या विविध जातींमध्ये बैंगनपल्लीला सर्वाधिक ४,००० ते ५,००० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. दुसरीकडे पावसामुळे भाजीपाल्याची आवक काहीशी घटल्याने अनेक भाज्यांच्या दरात सुधारणा झाल्याचे चित्र बाजारात दिसून आले.बाजार समितीत बैंगनपल्ली आंब्याची १२९ क्विंटल आवक झाली. या जातीला गुणवत्तेनुसार ४ ते ५ हजार रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. दशहरी आंब्याची १२७ क्विंटल आवक नोंदली गेली असून त्याचे व्यवहार ३,००० ते ४,००० रुपये दरम्यान झाले. लंगडा जातीची ११७ क्विंटल आवक झाली असून त्याला ३,५०० ते ४,५०० रुपये दर मिळाला.

याउलट नीलम आणि तोतापुरी या उशिरा येणाऱ्या जार्तीची आवक वाढली आहे. नीलमची २२४ क्विंटल, तर तोतापुरीची २२१ क्विंटल आवक झाली. या दोन्ही जातींचे व्यवहार १,५०० ते २,५०० रुपये प्रति क्विंटल दराने झाले. यापूर्वी बाजारात मोठ्या प्रमाणात येणारा केसर आंबा आता जवळपास बाजारातून गायब झाला असून त्याची आवक थांबली आहे.

बाजारात कैरीचीही नियमित आवक सुरू आहे. सध्या ३२९ क्विंटल कैरी बाजारात दाखल झाली असून तिचे व्यवहार २,००० ते ४,००० रुपये प्रति क्विंटल दराने होत आहेत.

भाजीपालयावर पावसाचा परिणाम स्पष्टपणे जाणवत आहे. आवक घटल्याने अनेक भाज्यांच्या दरात वाढ झाली आहे. आल्याची ८७ क्विंटल आवक झाली असून त्याला ९,००० ते १३,००० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. हिरवी मिरची ४,००० ते ५,००० रुपये, ढोबळी मिरची ३,००० ते ४,००० रुपये, कारली २,५०० ते ३,५०० रुपये, ढेमसा आणि बरबटी यांना ३,००० ते ४,००० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला.वांग्याची १२४ क्विंटल आवक झाली असून त्याचे व्यवहार ६०० ते १,२०० रुपये दराने झाले. भेंडीची ७५ क्विंटल आवक झाली असून दर ३,००० ते ३,६०० रुपये राहिले. कोथिंबीरची ७९ क्विंटल आवक झाली असून तिचे व्यवहार २,००० ते ३,००० रुपये दराने झाले. गाजरची ५३ क्विंटल आवक झाली असून आहे.त्याला २,००० ते ३,००० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. बाजारात लसुणाची आवक नसल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

फळबाजारात तायवान पपईची ८४ क्विंटल आवक झाली असून तिचे व्यवहार १,५०० ते २,००० रुपये प्रति क्विंटल दराने झाले. लिंबूची ४२ क्विंटल आवक झाली असून त्याला ३,००० ते ४,००० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. मक्याची सुमारे २१० पोती आवक झाली असून प्रती पोते ३,००० ते ६,००० रुपये दर मिळाल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

### जांभळाची विक्रमी आवक

हंगामी फळ असलेल्या जांभूळची बाजारातील आवक यंदा उच्चांकावर पोहोचली आहे. या आठवड्यात ३४२ क्विंटल जांभूळ बाजारात दाखल झाले. ग्राहकांकडून चांगली मागणी असल्याने त्याचे व्यवहार ३,००० ते ६,००० रुपये प्रति क्विंटल दराने होत असून व्यापाऱ्यांच्या मते पुढील काही दिवसही मागणी कायम राहण्याची शक्यता आहे.

# अचलपूर न.प.चा दलितवस्ती निधी अनियमिततेचा मुद्दा विधानपरिषदेत

## वि.प. सदस्य सुनील शिंदे यांनी मांडली लक्षवेधी

**अचलपूर/वार्ताहर**

नगरपरिषद अंतर्गत शासनाकडून प्राप्त झालेला करोडो रुपयांचा निधी दलित वस्तीऐवजी अन्य वस्त्यांमध्ये खर्च करण्यात आला आहे.या आशयाची तक्रार सामाजिक कार्यकर्ते किशोर मोहोड यांनी शासन, प्रशासनाकडे करून वारंवार पाठपुरावा केलाः मात्र याप्रकरणी दोषींवर अद्यापही कारवाई करण्यात आली नाही. त्या अनुषंगाने विधानपरिषद सदस्य सुनील शिंदे यांनी लक्षवेधी मांडून शासनाचे लक्ष वेधले आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार सूचना क्र. २७१ प्रमाणे त्यांनी लक्षवेधी मांडली. किशोर केशवराव मोहोड यांनी अचलपूर नगरपरिषदेत अनुसूचित जाती वस्ती विकास योजनेत प्राप्त अनुदानाच्या खर्चात अनियमितता व गैरव्यवहार झाल्याची तक्रार महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाकडे दाखल केलेली आहे . सदर तक्रारीची दखल घेऊन मानवी हक्क आयोगाने १२ फेब्रुवारी २०२५ रोजी नगरपरिषदेला आदेश पारित करून नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना याप्रकरणी कायदेशीर व दंडात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले असणे, मानवी हक्क आयोगाच्या आदेशानंतर नगरविकास विभागाच्या अप्पर सचिवांनी १८ नोव्हेंबर २०२५ रोजी नगर परिषद प्रशासनाला पत्र पाठवून ,सदर प्रकरणाचा सविस्तर अभिप्राय २८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत शासनाकडे सादर करण्याचे निर्देश दिले होते. तसेच विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील तरतुदींनुसार संबंधित दोषींवर दोषारोपपत्र तयार करून चौकशी प्रक्रिया तत्काळ सुरू करण्याचे स्पष्ट आदेश दिलेले असताना मानवी हक्क आयोगाच्या आणि शासनाच्या आदेशाला ६ महिने उलटूनही स्थानिक प्रशासनाने केराची टोपली दाखवल्यामुळे प्रशासकीय कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अनुसूचित जाती वस्तीच्या विकासासाठी असलेल्या निधीत झालेल्या अपहाराची चौकशी करण्यास प्रशासन जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येणे या गंभीर मुद्यांचा आ. शिंदे यांनी परामर्श घेतला आहे. या पुढे त्यांनी स्पष्टपणे तीव्र शब्दात नमूद केले की, या दिरंगाईमुळे स्थानिक दलित वस्तीतील सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाल्याने याबाबत शासनाने संबंधित अधिकाऱ्यांची तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व उपाययोजना बाबत माहिती विचारली .या लक्षवेधीमुळे नगर परिषद प्रशासनाचे धाबे दणाणले आहे.

> या गंभीर प्रकरणासाठी मी सातत्याने पाठपुरावा करीत असून शासनाने मात्र अद्यापही दखल घेतली नाही. या लक्षवेधीमुळे शासन दखल घेईल आणि संबंधितांवर योग्य ती कारवाई करेल.
>
> **-किशोर मोहोड, तक्रारकर्ता**

## अरूणोदय इंग्लिश स्कूल ॲन्ड ज्यू. कॉलेज येथे विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव



**अमरावती**-व्ही.एम.व्ही.परिसरातील अरुणोदय इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेज ऑफ सायन्स, हर्षराज कॉलनी येथे विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना आत घेवून पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.अरूणोदय शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष डॉ. वसंत लुंगे पाटील यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले.याप्रसंगी डॉ.लुंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर विद्यार्थ्यांचा तालीयोगा घेण्यात आला. मुलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण करण्यात आले. अरूणोदय शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. भारती वसंत लुंगे पाटील आणि अरुणोदय ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या प्राचार्या विशाखा नाफडे, उपप्राचार्या सीमा कुथे,शाळेच्या मुख्याध्यापिका शिल्पा पाजनकर, उपमुख्याध्यापिका निता काळमेघ, ज्योत्स्ना इंगोले, कार्यालयीन अधीक्षिका रेखा राऊत शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## अमरावती सीए शाखेचा भावी चार्टर्ड अकाउंटंट्सना

# एआयसह सक्षम करण्याच्या दिशेने कौतुकास्पद उपक्रम

**अमरावती/का.प्र.**

सीए शाखेने विकासा समितीअंतर्गत दोन दिवसीय एआय वर्कशॉप ३.० चे यशस्वीपणे आयोजन केले. या कार्यशाळेत मोठ्या संख्येने सीए विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) नवीनतम तांत्रिक घडामोडी, व्यावहारिक उपयोग आणि व्यावसायिक उपयोजनांची सखोल माहिती मिळवली. कार्यशाळेचा मुख्य उद्देश भावी चार्टर्ड अकाउंटंट्सना एआय आधारित आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे आणि त्यांना भविष्यातील व्यावसायिक गरजांसाठी तयार करणे हा होता.



कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी सहभागींना कृत्रिम बुद्धिमत्तेची ओळख, तिचा इतिहास व विकास, मशीन लर्निंग, डीप लर्निंग, प्रभावी प्रॉम्प्ट लेखन, सीए जीपीटीचा वापर, वित्तीय विवरणे व इतर वित्तीय अहवालांचे प्रारूपण, लेखांकन व खर्च विश्लेषण, एआय आधारित ऑडिट व कर आकारणी, जोखीम विश्लेषण तसेच एआयचा नैतिक वापर यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले. सोबतच सहभागींचे पहिल्या दिवसाचे मूल्यांकनही घेण्यात आले.उत्पादकता वाढवणारी एआय साधने, वाइब कोडिंग, गुगल ॲप स्क्रिप्ट, मॅक्रो व व्हीबीए स्क्रिप्ट, एआय आधारित वित्तीय अहवाल, डेटा व्हिज्युअलायझेशन, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने प्रभावी सादरीकरण तयार करणे, अभ्यास नियोजन, मॉक टेस्ट तसेच स्मार्ट फायनान्शियल रिव्ह्यू यांसारख्या विषयांवर व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपाला सहभागींनी प्रकल्प सादरीकरणे व उपयुक्त एआय आधारित अभ्यास सादर केले आणि सर्व सहभागींना प्रशंसापत्रे प्रदान करण्यात आली.

कार्यशाळेचे मार्गदर्शन प्रख्यात वक्ते सीए राघव मुंधडा (नागपूर), सीए श्रद्धा अग्रवाल (अमरावती) आणि सीए गुरजीत बग्गा (अमरावती) यांनी केले. तिन्ही तज्ज्ञांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा व्यावहारिक वापर, वित्तीय लेखांकन, कर आकारणी, ऑडिट तसेच भविष्यात चार्टर्ड अकाउंटंट्सचे बदलणारे कार्यक्षेत्र यावर अत्यंत सोप्या व प्रभावी पद्धतीने आपले विचार मांडले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान अभ्यासात व व्यावसायिक जीवनात आत्मसात करण्याची प्रेरणा मिळाली.सीए संदीप सुराणा (विकासा अध्यक्ष) यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे, कुशल मार्गदर्शनामुळे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या निरंतर बांधिलकीमुळे एआय वर्कशॉप ३.० चे यशस्वी आयोजन झाले.त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडले जाण्याची, व्यावहारिक ज्ञान मिळवण्याची आणि भविष्यातील व्यावसायिक आव्हानांसाठी स्वतःला तयार करण्याची उत्कृष्ट संधी मिळाली.

या कार्यक्रमाचे यशस्वी समन्वयन विकासा समितीने केले, ज्यामध्ये सीए संदीप सुराणा (विकासा अध्यक्ष), सीए दिव्या त्रिकोटी (व्यवस्थापन समिती सदस्य), खुशी राजवानी (उपाध्यक्ष), यश खत्री (सचिव), महक थरवानी (सहसचिव) आणि सेजल कापडी (खजिनदार) यांचा समावेश होता. समितीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांच्या उत्कृष्ट समन्वयामुळे, नियोजनबद्ध कार्यपद्धतीमुळे व समर्पित प्रयत्नांमुळे कार्यशाळेचे यशस्वी संचालन झाले आणि सहभागींना उच्च दर्जाचे शिक्षण व व्यावहारिक अनुभव मिळाला.सहभागींनी या कार्यशाळेला अत्यंत ज्ञानवर्धक व भविष्यातील व्यावसायिक गरजांना अनुसरून असल्याचे सांगितले आणि अशा प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियमित आयोजन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. एआय वर्कशॉप ३.० ने विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, नावीन्य व व्यावसायिक उत्कृष्टतेच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी नवी प्रेरणा दिली.

## संक्षिप्त

### राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत



**अचलपूर**-शहरातील सराफा लाईन येथील राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मध्ये विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी स्वागत करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचे सुद्धा वाटप करण्यात आले.राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्षकांनी आपल्या पहिलाच दिवस विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून अविस्मरणीय बनवला.एकीकडे नवे गणवेश,नवे दप्तर,नव्या वह्या,नवे शिक्षक आणि नवे मित्र यामुळे शाळेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.यावेळी राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक सर्वेश राठी यांनी पुढील वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी पालक वर्ग सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते.शाळेतील सर्व वर्गात विद्यार्थ्यांचा प्रवेशासाठी सजावट केल्याने विद्यार्थी भारावून गेले होते.यावेळी प्र.पर्यवेक्षिका स्वाती सवाई, शिक्षक प्रतिनिधी नेहा ठाकूर,प्र.पर्यवेक्षक प्रकाश भगत,सचिन घवळे,सांस्कृतिक सचिव दिलीप बोबडे, शिक्षकेत्तर प्रतिनिधी कैलाश गायकवाड समस्त राष्ट्रीय हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज चे समस्त शिक्षक - कर्मचारी वृंद उपस्थितीत होते.

### विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**अचलपूर**-मल्हारा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी अचलपूर चे तहसीलदार सुदर्शन शहारे यांच्या प्रमुख उपस्थितीतीत स्वागत करण्यात आले .यावेळी विद्यार्थ्यांना पुस्तके, वहीचे वाटप सुद्धा करण्यात आले.यावेळी तहसीलदार सुदर्शन शहारे,माजी सरपंच नारायण बोरकर,मुख्याध्यापिका शीला सोळंके,दादाराव मावस्कर,दीपक तायडे,रेखा भक्ते आदी उपस्थित होते.

### मणीबाईच्या दारी, शिक्षणाची वारी



**अमरावती** - दी गुजराती एज्युकेशन सोसायटी, अमरावती द्वारा संचालित मणीबाई गुजराती हायस्कूल, अंबापेठ अमरावती येथे 'मणीबाईच्या दारी, शिक्षणाची वारी' या आकर्षक संकल्पने अंतर्गत पर्यावरणपूरक प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे पूजन करून शिक्षणाच्या वारी मधून ज्ञानपूजनाचा संदेश देण्यात आला. नवागत विद्यार्थ्यांचे टाळ्यांच्या गजरात व पुष्पवर्षावाने स्वागत करण्यात आले.कार्यक्रमात उपस्थित स्वागताध्यक्ष सी.ए.डॉ.निलेश लाठीया,डॉ. नितीन सेठ,सुरेश राजा, तुषार श्रॉफ, भरत भायानी,योगेंद्र देसाई, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्याम नीळकरी या सर्व मान्यवरांचे मुख्याध्यापिका अंजली देव यांनी रोपटे भेट देऊन पर्यावरणपूरक पद्धतीने स्वागत केले. यावेळी मुख्याध्यापिका अंजली देव यांनी विद्यार्थी, पालक व उपस्थितांना संबोधित करत 'एक पेड माँ के नाम' या पर्यावरण संवर्धन उपक्रमाची सविस्तर माहिती दिली.प्रवेशोत्सवामध्ये उपमुख्याध्यापक अनिल पंजाबी, पर्यवेक्षक सरिता गायकवाड, अरविंद हिरपरा तसेच शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी संत व वारकरी यांची वेशभूषा परिधान करून आलेल्या नवागत विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. पर्यावरणपूरक प्रवेशोत्सव 'मणीबाईच्या दारी,शिक्षणाची वारी' उपस्थितांच्या कायम स्मरणात राहील, अशी भावना यावेळी पालकांनी व्यक्त केली.

## महावितरणच्या गलथान कारभाराविरोधात हल्लाबोल



**अमरावती/का.प्र.**

शहरातील बारस्कर ले-आऊट (केवल कॉलनी) येथील महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे आणि जीवघेण्या निष्काळजीपणामुळे संतप्त झालेल्या शेकडो नागरिकांनी थेट वीज विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयावर धडक दिली. नगरसेवक चंदू खेडकर यांच्या नेतृत्वात नागरिकांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. वेळीच उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

बारस्कर ले-आऊट भागात गेल्या कित्येक महिन्यांपासून वीज पुरवठा नेहमी खंडित होण्याचे सत्र सुरू आहे.या भागातील उच्च दाबाच्या विद्युत तारा अगदी माणसाच्या हाताला लागतील इतक्या खाली लोंबकळल्या आहेत. यामुळे येथे दोन मोठे जीवघेणे अपघात थोडक्यात टळले आहेत: नवसारी सब-स्टेशनला वारंवार तक्रार करूनही याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले.खासदार बळवंतराव वानखडे यांच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत विषय मांडून २४ फेब्रुवारी २०२५ रोजी १लाख ६८ हजार १२९ रुपये निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी फक्त दोन सिमेंटचे पोल आणले आणि नागरिकांनी खांब रस्त्यावरून बाजूला करून लाईन सरळ करण्याची मागणी करताच काम अर्धवट टाकून पळ काढला. तेव्हापासून आजतागायत अभियंता किंवा कर्मचारी फिरकलेच नाहीत, असा थेट आरोप नागरिकांनी केला आहे.

निवेदन देतेवेळी नगरसेवक चंदू खेडकर यांच्यासोबत गजानन उमाळे,साहेबराव भालेराव,सुधीर तायडे,राजेंद्र वसुकार,मनोज मोकळे,अनिकेत चराटे, लक्ष्मण तायडे,गणेश इंगोले,अजय रंगारी, अरविंद इंगोले,नितीन वसुकर,गजानन उमाळे,गणेश बोकडे, अक्षय रेवडकर,वृषभ रेवडकर, देशमुख, शुभम ढोके, कृष्णराव नागे,हेमंत नागे, नितीन वसुकर,ईश्वरदास चक्रे, प्रकाश इंगोले, धीरज मेश्राम आदी नागरिक उपस्थित होते.

# मराठी शाळेत हाल सोसते 'मराठी' मंथन

**यंदा दहावी बोर्ड परीक्षेत मराठी विषयात नापास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. ही बाब भूषणावह नक्कीच नाही. हे विद्यार्थी मराठीत नापास का झाले? याचा शोध घेऊन त्यावर वेळीच दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे.**

**या**वर्षी फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत प्रथम भाषा मराठी असलेल्या आणि प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १० लाख ८७ हजार ६९९ इतकी होती, तर पास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १० लाख ६ हजार ८९६ इतकी आहे. मराठी माध्यमाच्या शाळेत ८० हजार ८०३ विद्यार्थी नापास झाले आहेत. हे सर्व ८० हजार विद्यार्थी मराठी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी प्रामुख्याने खासगी अनुदानित, अंशतः अनुदानित सरकारी शाळेचे आहेत. ही बाब विचार करायला लावणारी आहे.

इतर माध्यमांच्या शाळेत शिकणारे विद्यार्थी मराठी भाषेची द्वितीय अथवा तृतीय भाषा म्हणून निवड करतात. अशा विद्यार्थ्यांची संख्या ४ लाख १३ हजार १९७ होती. त्यात पास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या ४ लाख १७५ इतकी आहे. याचा अर्थ येथे देखील मराठी विषयात नापास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १३ हजार ७४९ इतकी आहे. यातील इंग्रजी माध्यमातील साधारण ३ लाख ६५ हजार २०३ विद्यार्थी आहेत व उर्वरित विद्यार्थी उर्दू व इतर माध्यमांची आहे. एकूण मिळून राज्यात ९४ हजार ५४८ विद्यार्थी मराठीत नापास झाले आहेत. दोन्ही मिळून हा आकडा लाखाच्या जवळ जाणारा आहे. दोन्ही माध्यमाची तुलना केली तर, मराठी माध्यमातून प्रथम भाषा मराठी विषयात नापासांचे प्रमाण ७.४३ टक्के एवढे तर इतर माध्यमातून द्वितीय आणि तृतीय भाषा मराठी विषयात नापासांचे प्रमाण हे ३.०२ टक्के एवढे आहे. मराठी विषयात नापासांची ही मोठी संख्या पाहिली की मग दहावी बोर्ड परीक्षेतील प्रथम भाषा मराठी विषयाच्या कृतिपत्रिकेचे स्वरूप आणि उत्तीर्ण होण्याचे निकष ही समजावून घेतले की मग आपल्याला कारणांचा शोध घेण्यास मदत होईल.

८० गुणांची लेखी परीक्षा आणि २० गुण हे तोंडी व अंतर्गत मूल्यमापनासाठी अशी एकूण १०० गुणांची ही मराठी विषयाची परीक्षा असते. तोंडी व अंतर्गत मूल्यमापन हे शाळा स्तरावर केले जाते. हे २० पैकी २० गुण हे सहज हाताने देण्याची चांगली परंपरा राज्यात अनेक वर्षांपासून आहे. ते अंतर्गत मूल्यमापन अंतर्गतचे २० पैकी २० गुण, लेखीचे ८० पैकी १५ गुण असे मिळून १०० पैकी ३५ गुण मिळाले की विद्यार्थी पास होतो. मराठी नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांचा खरा संघर्ष हा त्या लेखी परीक्षेत ८० पैकी १५ गुण मिळविण्यासाठी असतो.

एखाद्या विषयात विद्यार्थ्याला उत्तीर्ण होण्यासाठी किमान गुण मिळाले नाही तर त्या विद्यार्थ्याला सवलतीच्या (ग्रेस) गुणांचा फायदा घेता येतो. त्यासाठी तिन्ही भाषा विषयांचा मिळून एक नियम आहे. तिन्ही भाषा विषयांच्या गुणांची बेरीज ही १०५ होत असेल आणि एखाद्या भाषा विषयात विद्यार्थी उत्तीर्ण होण्यासाठी किमान ३५ गुणांचा निकष पूर्ण करत नसेल आणि त्याला त्या भाषा विषयात २५ गुण मिळाले असतील तर त्याला ग्रेस गुणांचा फायदा मिळून तो विद्यार्थी त्या विषयात उत्तीर्ण होतो. उदाहरणार्थ 'अ' विद्यार्थ्याला हिंदी विषयात ४५ गुण, इंग्रजी विषयात ३५ आणि मराठी विषयात २५ गुण असतील तर तो 'अ' विद्यार्थी ग्रेस गुणांसह पास होतो. अशा स्थितीत विद्यार्थ्याला मराठीत लेखी परीक्षेत फक्त ५ ते ७ गुणांची आवश्यकता असते. थोडक्यात प्रथम भाषा मराठी विषयात वरील ८० हजार विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी ८० पैकी किमान १५ ते १८ गुण घेता आले नाहीत.



दहावी बोर्डाच्या प्रथम भाषा मराठी विषयाची कृतिपत्रिका एकूण पाच भागांत विभागलेली असते. विभाग १ गद्य, जो १२ गुणांसाठी असतो त्यात पठित उतारे, आकलन कृती आणि स्वमत यांचा समावेश असतो. दुसरा पद्य विभाग हा १६ गुणांसाठी असतो, त्यात कविता त्यावर आधारित आकलन कृती आणि रसग्रहण याबाबी असतात. तिसऱ्या विभागात स्थूल वाचन हा भाग ६ गुणांसाठी असतो. यात दिलेल्या तीनपैकी कोणत्याही दोन कृतींची उत्तरे लिहिणे अपेक्षित असते. चवथा विभाग हा भाषाभ्यास अर्थात व्याकरणावरील प्रश्न हे १६ गुणांसाठी असतात. व्यवहारातले बहुतेक प्रश्न हे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असतात. शेवटचा पाचवा विभाग हा उपयोजित लेखनाचा जो २४ गुणांसाठी असतो. त्यात पत्रलेखन, सारांश लेखन, जाहिरात, बातमी, कथालेखन आणि निबंध लेखन यांचा समावेश असतो.

**✍ डॉ. रुपेश मोरे**

या ८० गुणांच्या प्रश्नपत्रिकेत साधारण ५० टक्के म्हणजे ४० गुणांचे प्रश्न हे सोपे असतात. उर्वरित ५० टक्के ४० गुणांच्या प्रश्नांची काठिण्य पातळी ही तुलनेने अधिक असते. सोप्या असलेल्या ४० गुणांच्या प्रश्नांमध्ये २० ते २२ गुणांचे प्रश्न हे ज्या विद्यार्थ्याला किमान लिहिता - वाचता येते त्यांना सहज सोडविता येतात. असे असताना मराठी विषयात नापासांची संख्या हजारोंच्या घरात का जाते? याचे कारण म्हणजे दहावीपर्यंत शाळेत शिक्षण घेऊनही या विद्यार्थ्यांची वाचन - लेखन कौशल्य ही पुरेशी विकसित झालेली नसतात.

फेब्रुवारी २०२५, मध्ये राज्यातील सरकारी शाळांच्या संदर्भात 'असर'चा अहवाल प्रसिद्ध झाला होता. त्यात राज्यातील सरकारी शाळांमधील तिसरी ते पाचवीच्या पन्नास टक्के विद्यार्थ्यांना दुसरीचे पुस्तक ही वाचता येत नसल्याचे नमूद केले होते तर सहावी ते आठवीच्या तीस टक्के मुलांना दुसरीचे पुस्तक ही वाचता येत नसल्याचे निरीक्षण या अहवालात नोंदविले होते. प्राथमिक, उच्च प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावर प्रत्येक इयत्तेत कमी अधिक प्रमाणात लेखन वाचनात अडचणी असलेले विद्यार्थी असतात आणि हेच विद्यार्थी दहावीला नापासांच्या यादीत दिसतात. खरं तर प्राथमिक आणि उच्च प्राथमिक स्तरावरच या विद्यार्थ्यांसाठी एक कृती कार्यक्रम शाळांनी हाती घ्यायला हवा. जालिंदरनगर येथील वारे गुरुजींच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिल्या दोन महिन्यांत विद्यार्थी हा शिक्षकांच्या तसेच आपल्या वर्ग मित्रांच्या मदतीने लिहायला व वाचायला लागतात. पुढे हे विद्यार्थी स्वयं अध्ययनाकडे वळतात. जिल्हा परिषद शाळांचे हे मूलभूत साक्षरतेचे प्रयोग खासगी अनुदानित प्राथमिक आणि माध्यमिक शाळांनी राबवायला हवेत.

मूलभूत साक्षरतेत अडचणी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी जालना एज्युकेशन फाउंडेशन ही स्वयंसेवी संस्था 'पढो जालना' अभियानांतर्गत सरकारी शाळांमधील मुलांमध्ये वाचन, लेखन, गणित आणि मूलभूत साक्षरता वाढीस लावण्यासाठी काम करते. त्यांनी यासाठी विशेष कार्यपुस्तिका तयार केल्या आहेत. ते जिल्हा परिषद शाळांना प्रशिक्षणासह पुरवून विद्यार्थ्यांच्या मूलभूत साक्षरता विकसित करण्यासाठी काम करतात. अशा प्रयोगांचे राज्यात सार्वत्रिकीकरण व्हायला हवे.

'प्रथम' सारखी संस्था काही भागात प्राथमिक वर्गासाठी काम करते तसे प्रयोग उच्च प्राथमिक आणि माध्यमिक वर्गासाठी व्हायला हवे. दहावीला शाळांमधून प्रथम येणाऱ्या, चांगले गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची श्रेय शाळा घेतात पण नापास झालेल्या विद्यार्थ्यांची जबाबदारी कोणी घेताना दिसत नाही.

सरकारी आणि अनुदानित शाळांमध्ये अपवादात्मक कुटुंबातील मुले शिक्षण घेतात. त्यामुळे या शाळांमधील सर्वच विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या प्रवाहात राहण्यासाठी दहावीत उत्तीर्णांची संख्या वाढविण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम करण्याची गरज आहे.

मो.९०९६८८४८८
(लेखक शिक्षण क्षेत्राचे अभ्यासक आहेत.)

# पेपरफुटी'चे 'शुक्लकाष्ठ' थांबता थांबेना!

**वै**द्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची समजल्या जाणा-या 'नीट' परीक्षेचा ३ मे रोजी पेपर फुटला होता. त्यावेळी राज्यभर खळबळ उडाली होती. या कांडातील 'शिक्षणमाफियां'ना केव्हा आणि काय शिक्षा होईल, हे प्रशासन सांगू शकेल. 'नीट'चे प्रकरण दृष्टीआड जात नाही तोच, ३ दिवसांपूर्वी डी. एड. उत्तीर्ण प्राथमिक शिक्षकांसाठी अनिवार्य असलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेची (टीईटी) प्रश्नपत्रिका फुटल्याचे समोर आल्याने पुन्हा एकदा 'शिक्षण विभाग' आणि 'प्रशासना'च्या 'अब्रूची लक्तरे राज्याच्या वेशीवर टांगली' गेली. 'नीट'ची आधी रद्द झालेली फेरपरीक्षा २१ जून रोजी व्यवस्थित पार पडल्याने सरकारने समाधानाचा मोकळा श्वास घेतला खरा. पण, आठवडाभरातच पुन्हा एका परीक्षेचा पेपर फुटल्याने त्यांचा हा श्वास 'औट घटके'चा ठरला.

शिक्षण व्यवस्था ही देशाचे भवितव्य 'घडवत' असते, असे म्हटले जाते. पण, सध्या या व्यवस्थेचा भोंगळ कारभार पाहता, देशाचे भवितव्य 'सडवत' आहे का? अशी म्हणण्याची वेळ आली आहे. पुन्हा एकदा 'पेपरफुटी'चा लांच्छनास्पद प्रकार पुढे आल्याने, शिक्षण विभाग आतून भ्रष्टाचाराने किती पोखरला गेला आहे, हे अधोरेखित झाले आहे. प्रचंड मनस्ताप होत असल्याने विद्यार्थी वर्गात अत्यंत संतापाचे वातावरण पसरलेले आहे.

तर, विविध विद्यार्थी संघटना आक्रमक झाल्या आहेत. आता यांना युवकांच्या स्वाभिमानाच्या नैराश्यातून उदयास आलेल्या 'कॉक्रोज जनता पार्टी' नावाचे मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. त्यामुळे भविष्यात 'जेन-झी'च्या उद्रेकाचा मोठा स्फोट बघायला मिळाल्यास फारसे आश्चर्य वाटायला नको. शिक्षण विभाग आणि प्रशासनाने तातडीने भ्रष्टाचाराची लागलेली वाळवी नष्ट न केल्यास भविष्यात विद्यार्थीवर्ग त्यांचा पेपर फोडल्याशिवाय राहणार नाही, हे लक्षात घ्यावे.

या प्रकरणाच्या सखोल (?) चौकशीसाठी नित्यनियमाप्रमाणे 'एसआयटी'ची स्थापना करण्यात आली. हरियाणा, बिहार, आग्रा, दिल्ली, उत्तरप्रदेश आणि इतर राज्यांत या प्रकरणाचे धागेदोरे पोहचले असल्याचा पोलिसांना संशय आहे. आतापर्यंत ३ आरोपींना अटक करण्यात आली असून २ जण फरार आहेत. अटक झालेल्या आरोपींना ६ जुलैपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे. ठिकठिकाणी शिक्षक संघटनाही रस्त्यावर उतरून आंदोलने करत आहेत. शिक्षण राज्यमंत्री दादा भुसे यांच्या राजिनाम्याचीही मागणी होत आहे.

'नीट' परीक्षेच्यावेळी झालेल्या 'भोंगळ' कारभारामुळे राज्यात सुमारे ६ ते ७ निष्पाप विद्यार्थ्यांनी आपला जीव गमावला होता. इतकी गंभीर परिस्थिती उद्भवूनही, आपल्या 'कारभा-यांनी' यातून काहीच बोध घेतला नाही. पुन्हा 'येरे माझ्या मागल्या'चाच प्रकार घडला, याचे आश्चर्य वाटते.

**✍ प्रदीप व्ही खोलमकर**

घडू नये पण, या पेपरफुटीनेही उद्या काही बळी घेतले. तर, त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित होत आहे. या पेपरफुटीने एकट्या नाशिक जिल्ह्यात ४१ हजार भावी शिक्षकांना मनस्ताप सहन करावा लागला आहे. यावरून संपूर्ण राज्यातील संख्या किती असेल? याची कल्पनाच न केलेली बरी. एकिकडे विद्यार्थी 'कोमात' जात आहेत, तर दुसरीकडे आपले कारभारी अगदी 'जोमात' आहेत. कोणी 'ऑपरेशन टायगर', 'ऑपरेशन तुडवा' यात व्यस्त आहेत. तर काही एकमेकांना अश्लील शिविगाळ करत, एकमेकांचे 'वस्त्रहरण' करण्यात मश्गुल आहेत. 'कॉक्रोज जनता पार्टी' च्या हातात तर आता पुन्हा एकदा 'आयते कोलीत' मिळाले आहे. त्यांचे आंदोलन अधिक तीव्र होईल, हे सांगण्यासाठी कोण्या कुडमुड्या ज्योतिषाची गरज नसावी. या घटनेने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान पुन्हा वादात सापडून, त्यांच्या राजिनाम्याचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. 'पाषाणहृदयी' कारभा-यांना विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी, नशिबाशी आणि जिवाशी खेळण्याचे काहीच 'सोयरसुतक' वाटत नाही. तुम्ही रोज उठून कितीही बोंबा मारल्या तरी 'हाथी चलता है, कुत्ते भोकते है' या भूमिकेतून ते कधीच बाहेर पडणार नाहीत. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी आणि प्रसंगी जीवाशी खेळणा-या या 'कांडा'तील 'झारीच्या शुक्राचार्यां'च्या चेह-यावरील बुरखा लवकरात लवकर फाडणे, ही काळाची गरज आहे.

नाशिक.
मो.८७६७५९२९८०




# पेपरफुटीचे सत्र आणि बेजबाबदार शासन प्रशासन!

**म**हाराष्ट्रात शिक्षक पात्रता परीक्षा पेपरफुटीच्या सावटा खाली आली आहे. परीक्षा होण्याच्या अवघ्या काही तासांपूर्वी प्रश्नपत्रिका फुटल्याच्या संशयामुळे परीक्षा स्थगित करण्याची वेळ शासनावर आली. या निर्णयामुळे राज्यातील तब्बल ४ लाख २८ हजार १२२ परीक्षार्थ्यांच्या आशा-आकांक्षांवर पाणी फिरले. अनेक महिन्यांची मेहनत, आर्थिक खर्च, मानसिक तयारी आणि भविष्याची स्वप्ने एका क्षणात अनिश्चिततेच्या गर्तेत लोटली गेली.

प्रश्न केवळ पेपरफुटीचा नाही; प्रश्न आहे राज्यातील परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा. प्रत्येक वेळी पेपर फुटतो, परीक्षा रद्द होते, चौकशी समिती नेमली जाते, काही अटक होतात आणि काही दिवसांनी सर्व काही शांत होते. मात्र या संपूर्ण प्रक्रियेत सर्वाधिक नुकसान होते ते प्रामाणिक विद्यार्थ्यांचे. त्यामुळे आज प्रत्येक परीक्षार्थीचा एकच प्रश्न आहे 'आमच्या मेहनतीचे काय? जबाबदार कोण?' याचा कोण कधी विचार करेल?

लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही सरकारी यंत्रणेच्या कामकाजाची अंतिम जबाबदारी शासनाची असते. परीक्षा आयोजित करणारी संस्था, प्रशासन किंवा अधिकारी यांच्याकडून चूक झाली, तरी त्याचे राजकीय आणि नैतिक उत्तरदायित्व शासन टाळू शकत नाही. केवळ 'चौकशी सुरू आहे' किंवा 'दोषींवर कारवाई होईल' अशी भूमिका घेऊन सरकार जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही.

आधीच्या सरकारचे मंत्री भ्रष्टाचार, अपघात किंवा असे काही प्रकार घडले तर नैतिक जबाबदारी समजून न मागता राजीनामा द्यायचे. दुर्दैवाने आता महाराष्ट्रात एक वेगळीच परंपरा निर्माण होताना दिसते. एखादा घोटाळा झाला की चौकशी समिती नेमली जाते. काही काळ चर्चा रंगते. नंतर अहवाल येतो आणि बहुतेक वेळा संबंधित अधिकारी किंवा यंत्रणेला क्लीन चिट मिळते. त्यामुळे जनतेच्या मनात चौकशी समित्यांच्या निष्पक्षतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. चौकशी जर केवळ जनतेचा रोष शांत करण्यासाठी आणि वेळ मारून नेण्यासाठी केली जात असेल, तर ती न्यायप्रक्रिया नसून लोकशाहीची थट्टा ठरते.

पेपरफुटी ही एखाद्या व्यक्तीची चूक नसते; ती संपूर्ण व्यवस्थेच्या अपयशाची साक्ष असते. प्रश्नपत्रिका तयार होण्यापासून छपाई, वाहतूक, साठवणूक आणि परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचण्याची संपूर्ण साखळी शासनाच्या नियंत्रणाखाली असते. या प्रक्रियेत जर प्रश्नपत्रिका बाहेर येत असेल, तर त्यामागे केवळ काही दलाल नसून व्यवस्थेतील गंभीर त्रुटी किंवा संगनमत असल्याची शंका निर्माण होते. अशा वेळी सरकारने स्वतःची जबाबदारी स्वीकारणे अपेक्षित असते. अशा प्रकरणात जो खर्च होतो तो अप्रत्यक्षपणे सामान्य नागरिकांच्या प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष करातूनच होत असतो. परत परीक्षा घ्यायची म्हटली की सामान्य माणसाचा आणखी पैसा खर्च होणार आणि निवडक शासन/प्रशासनातील लोक मलाई खाणार.

अशा प्रकारामुळे आज महाराष्ट्रातील युवक प्रचंड अस्वस्थ आहेत. एका नोकरीसाठी लाखो उमेदवार स्पर्धा करत आहेत. त्यासाठी अनेक वर्षे तयारी, कोचिंग, प्रवास, राहण्याचा खर्च आणि कुटुंबाचा त्याग असतो. पेपरफुटीमुळे ही सर्व मेहनत एका क्षणात वाया जाते. मानसिक ताण, नैराश्य आणि भविष्याबद्दलची अनिश्चितता वाढते. या नुकसानीची भरपाई कोण करणार? याहून गंभीर बाब म्हणजे प्रत्येक वेळी दोषींवर कठोर कारवाईची भाषा केली जाते; पण काही महिन्यांनी तो विषय मागे पडतो. परिणामी पेपरफुटी करणाऱ्यांचे मनोबल वाढते आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील

**✍ प्रा. डॉ. प्रशांत विघे**

विश्वास कमी होत जातो. ही परिस्थिती लोकशाही आणि गुणवत्ताधारित भरती व्यवस्थेसाठी अत्यंत घातक आहे.

सरकारने या घटनेकडे केवळ प्रशासकीय त्रुटी म्हणून पाहू नये. हा सामाजिक आणि नैतिक प्रश्न आहे. गुणवंत विद्यार्थ्यांना न्याय मिळाला नाही, तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास कोसळेल. त्यामुळे केवळ चौकशी समिती नेमणे पुरेसे नाही. चौकशीचा अहवाल सार्वजनिक झाला पाहिजे, दोषींवर वेळबद्ध कारवाई झाली पाहिजे आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. तसेच, प्रत्येक पेपरफुटीनंतर परीक्षार्थ्यांना होणारा आर्थिक व मानसिक त्रास लक्षात घेऊन सरकारने त्यांच्यासाठी ठोस धोरण तयार केले पाहिजे. वारंवार परीक्षा पुढे ढकलणे हा उपाय नाही. सुरक्षित, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित परीक्षा प्रणाली उभारणे ही शासनाची घटनात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे.

आज महाराष्ट्रातील तरुणांना आश्वासनांची गरज नाही; त्यांना विश्वास हवा आहे. चौकशी समित्यांच्या अहवालांपेक्षा दोषींना झालेली कठोर शिक्षा महत्त्वाची आहे. कारण शिक्षा झाली तरच पुढील पेपरफुटी थांबेल. अन्यथा प्रत्येक वेळी चौकशी, क्लीन चिट आणि नवीन पेपरफुटी हेच चक्र सुरू राहील.

महाराष्ट्राची ओळख गुणवत्तेची, शिक्षणाची आणि प्रगत विचारांची आहे. त्या महाराष्ट्रात पेपरफुटी हा नित्याचा विषय बनणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. शासनाने या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारून दोषींवर कठोर कारवाई करावी, परीक्षा व्यवस्थेची संपूर्ण पुनर्रचना करावी आणि लाखो परीक्षार्थ्यांचा डळमळीत झालेला विश्वास पुन्हा प्रस्थापित करावा.

आमच्या मेहनतीला न्याय द्या! चौकशी समित्यांच्या नावाखाली वेळकाढूपणा नव्हे, तर दोषींना कठोर शिक्षा द्या! परीक्षार्थ्यांच्या भविष्याशी खेळ थांबवा; शासनाने आपली नैतिक जबाबदारी स्वीकारावी!

सिनेट सदस्य
संत गाडगेबाबा अमरावती
विद्यापीठ, अमरावती
मो.९३२६८७७७४९

राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त

# आमचे जीवन त्यांचेच दान, डॉक्टर आहेत धरतीवरील भगवान!

**ए**खाद्या व्यक्तीच्या आयुष्याच्या सुरुवातीपासून त्याच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक टप्प्यावर डॉक्टर त्याच्यासोबत असतो. मूल जन्माला आले की आईच्या पोटातून बाळाला जगात आणणारा डॉक्टरच असतो. त्यानंतर बाळाला रोगांपासून वाचवण्यासाठी आणि निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती आणि लसीकरण इत्यादीची जबाबदारी डॉक्टरांची आहे. शारीरिक, मानसिक समस्यांनी ग्रासलेल्या व्यक्तीच्या सर्व वेदना आणि रोग केवळ एक डॉक्टरच बरे करतो. ते जीवन परत आणतात आणि आजार बरे करतात त्यामुळे भारतात डॉक्टरांना देवाचा दर्जा दिला जातो. यात शंका नाही की डॉक्टर आपल्या जीवनात एक महत्त्वाची भूमिका बजावतात. मानवी जीवनचक्रातील पहिली आणि शेवटची घटना, प्रसूती रुग्णालयांपासून ते शवागारातील मृतदेहापर्यंत, या दोन्हींची काळजी डॉक्टरच घेतात. समाजात डॉक्टरांना सर्वात महत्त्वाचे व्यक्तिमत्व मानले जाते. ते जीवनरक्षक असतात. जेव्हा कोणी वेदना/आजाराने त्रस्त असते, तेव्हा मदतीचा हात पुढे करणारे पहिले व्यक्ती डॉक्टरच असतात. डॉक्टरांना सर्व रोगांबद्दल प्रचंड ज्ञान असते. समाजातील सर्वात महत्त्वाच्या पैलूची जबाबदारी डॉक्टर घेतात. वाढत्या आरोग्य समस्यांमुळे, आपल्या आजारांवर योग्य उपचारांसाठी डॉक्टरांना भेटणे आवश्यक आहे. डॉक्टर हे समाजातील सर्वात नम्र आणि आदरणीय व्यावसायिक आहेत. रुग्णाचा आजार ओळखणे आणि योग्य उपचार करणे हे त्यांच्या कामात समाविष्ट असते. त्याव्यतिरिक्त, डॉक्टरांना विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

डॉक्टरांचा दृष्टिकोन अत्यंत विनम्र असावा. त्यांची वागणूक त्यांच्या शब्दांतून आणि कृतीतून प्रतिबिंबित झाली पाहिजे. रुग्ण सहसा अस्वस्थ असतो आणि केवळ डॉक्टरांची काळजी आणि नम्रताच त्याला शांत होण्यास मदत करू शकते. रुग्ण नेहमीच विनम्र डॉक्टरांना प्राधान्य देतात. १ जुलैला डॉक्टर्स डे साजरा करण्यामागे एक खास कारण आहे. थोर वैद्य डॉ. बिधानचंद्र रॉय यांच्या जयंती व पुण्यतिथीच्या दिवशी त्यांच्या स्मरणार्थ आजारपणाशी लढणाऱ्या रुग्णांना नवसंजीवनी देणाऱ्या आणि वैद्यकीय क्षेत्रात निःस्वार्थ सेवा करणाऱ्या सर्व डॉक्टरांचे आभार/सन्मान करण्यासाठी या रोजी राष्ट्रीय डॉक्टर दिन साजरा करण्याची घोषणा करण्यात



**✍ मनोज निचत**

आली. जागतिक आरोग्य संघटनेने समर्थन दिलेल्या ७-स्टार डॉक्टरच्या संकल्पनेत काळजी प्रदाता, निर्णय घेणारा, संवादक, समुदाय नेता, व्यवस्थापक, आजीवन शिकणारा आणि संशोधक या भूमिकांचा समावेश आहे. तथापि, आरोग्यसेवा प्रणाली आणि शिक्षण क्षेत्राच्या बदलत्या मागण्यांमुळे, आठव्या भूमिकेला वाढती मान्यता मिळत आहे. 'शिक्षक'ही भूमिका जोडल्याने प्रत्येक डॉक्टरची सहकारी, कनिष्ठ विद्यार्थी आणि आंतर व्यावसायिक सहकाऱ्यांच्या शिक्षणात योगदान देण्याची शिकण्याची संस्कृती जोपासण्याची जबाबदारी मान्य होते.

प्रत्येक डॉक्टर शिकवतो. जाणूनबुजून असो वा नसो. 'डॉक्टर' हा शब्द लॅटिन 'डोसेरे' पासून आला आहे, ज्याचा अर्थ 'शिकवणे' असा आहे, जो वैद्यकशास्त्र आणि शिक्षण यांच्यातील आंतरिक संबंध अधोरेखित करतो. अनेक विद्यार्थी भविष्यात डॉक्टर बनण्याचे स्वप्न पाहतात. डॉक्टरांचे आयुष्य इतके सोपे नसते. एक चांगला डॉक्टर बनण्यासाठी खूप मेहनत आणि व्यवसायाप्रती समर्पण आवश्यक असते.

सैन्याशिवाय देश सुरक्षित राहू शकत नाही, तसेच डॉक्टरांच्या बाबतीतही आहे; आपण डॉक्टरांशिवाय आपल्या जीवनाची कल्पना करू शकत नाही. डॉक्टर हे एकमेव असे व्यक्तिमत्व आहेत ज्यांना सर्व रोग, त्यांची लक्षणे आणि त्यावरील उपाय यांची सखोल माहिती असते.

रुग्णाचे आरोग्य टिकून राहावे यासाठी डॉक्टर निस्वार्थपणे रात्रंदिवस सर्वोत्तम प्रयत्न करतात. सैनिकांप्रमाणेच डॉक्टरही क्वचितच सुट्टी घेतात. ते नेहमी इतर सर्व गोष्टींपेक्षा आपल्या रुग्णांना प्राधान्य देतात. सार्वजनिक धोरणाला आकार देणाऱ्या अनेक आवाजांपैकी डॉक्टर हा केवळ एक 'आवाज' आहे.

तथापि, त्यांना आदर आणि विश्वासाचे एक विशेष स्थान आहे, ज्याचा उपयोग ते सरकारला अशा आरोग्य धोरणांकडे प्रवृत्त करण्यासाठी करू शकतात, ज्यामुळे जनतेला खऱ्या अर्थाने फायदा होईल.

वेदनेतही स्मित हास्य उमलावे, तो आधार म्हणजे डॉक्टर असावे! रुग्णाचे दु:ख त्यांचेच व्हावे, सेवेचे व्रत मनापासून जोपासावे!! जीवनाच्या प्रत्येक संकटात आधार बनणाऱ्या देवदूतां (डॉक्टरां) ना डॉक्टर्स डे च्या मनःपूर्वक शुभेच्छा!

श्रीकृष्ण हार्ट अँड मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल मो.९८२३१२५२३३

# शंभर कोटींचा ओपन स्पेस गिळंकृत ?

# बसस्थानकालगत ट्रॅक्टर शोरूम, हॉटेलवर अतिक्रमणाचा आरोप ; जागा ताब्यात घ्या, अन्यथा आंदोलन

## नगरसेवक सागर भारुका यांचा पत्रकार परिषदेत इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील मुख्य बसस्थानकाला लागून असलेल्या तब्बल १४,९१० चौरस फूट महापालिकेच्या ओपन स्पेसवर अतिक्रमण करून व्यावसायिक बांधकाम उभारण्यात आल्याचा गंभीर आरोप शिवसेनेचे नगरसेवक सागर भारुका यांनी केला आहे.

खेळाच्या मैदानासाठी राखीव असलेल्या या जागेवर ट्रॅक्टरचे शोरूम व हॉटेल सुरू असल्याचा दावा करत त्यांनी महापालिका प्रशासन, नगरविकास विभाग आणि संबंधितांवर संगनमताचे आरोप केले. ही जागा तातडीने महापालिकेच्या ताब्यात घ्यावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा त्यांनी पत्रकार परिषदेत दिला.



सिव्हिल लाईन रोडवरील रुक्मिणी नगर येथील मौजे अकोला, शीट क्र. ५३, प्लॉट क्र. ६ मधील मंजूर लेआउटनुसार संबंधित जागा खेळाच्या मैदानासाठी राखीव असल्याचा दावा भारुका यांनी केला. या जागेवर सुबोध गोयनका आणि आशुतोष गोयनका यांनी ट्रॅक्टर शोरूम व हॉटेलचे पक्के बांधकाम करून सार्वजनिक जागेचा व्यावसायिक वापर सुरू केल्याचा आरोप त्यांनी केला. तत्कालीन जिल्हाधिकारी निमा अरोरा यांनी संबंधित जागा महापालिकेच्या नावे करून तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले होते. मात्र, त्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही. उलट महापालिका प्रशासनाने 'आरेखीय चूक'चा आधार घेत संबंधितांना दिलासा दिल्याचा आरोप भारुका यांनी केला.

सन १९६४ च्या मंजूर लेआउटमध्ये संबंधित जागेचा स्पष्ट उल्लेख 'ग्राउंड' असा आहे. महापालिकेच्या विकास आराखड्यातही ही जागा ग्रीन झोन म्हणून दर्शविण्यात आली आहे. नव्या विकास आराखड्यातही त्यात बदल झालेला नसताना व्यावसायिक बांधकाम कसे झाले, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावेळी नगरविकास विभागाचे अवर सचिव प्रसाद शिंदे यांच्यावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सार्वजनिक जागेचे संरक्षण करण्याऐवजी प्रशासनाने अतिक्रमणाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला.

महापालिकेने तातडीने जागा ताब्यात घेऊन अतिक्रमण हटवावे. अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा भारुका यांनी दिला. पत्रकार परिषदेला शिंदेसेनेचे जिल्हाप्रमुख मंगेश काळे उपस्थित होते.

### महापालिकेचा खुलासा : शासनाच्या आदेशानुसार कार्यवाही ; २०२५ चे आदेश रद्द करण्याची प्रक्रिया सुरू

नगरसेवक सागर भारुका यांच्या आरोपांनंतर अकोला महानगरपालिकेने अधिकृत खुलासा प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार, २००४ च्या विकास योजनेत संबंधित १,४१३.३३ चौ.मी. जागा 'मैदान' म्हणून दर्शविण्यात आली आहे. यापूर्वी १९६२ मध्ये मंजूर झालेल्या लेआउटमध्येही त्या जागेचा उल्लेख 'ग्राउंड' असा आहे. मात्र, संबंधित जागेची मालकी गोयनका यांच्या नावावर असल्याने २००९ मध्ये 'आरेखकीय चूक' दुरुस्तीचा प्रस्ताव संचालक, नगररचना, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यावर निर्णय न झाल्यानंतर ७ जानेवारी २०२५ रोजी शासनाने ही बाब 'ड्राफ्ट्समन एरर' मानून नियम २.५ नुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यानुसार २१ जानेवारी २०२५ रोजी महापालिकेने आरेखकीय चूक दुरुस्तीचे आदेश पारित केले.

यानंतर शासनाकडे प्राप्त झालेल्या निवेदनाच्या पार्श्वभूमीवर प्रकरणाची पुन्हा छाननी करण्यात आली. १६ जून २०२६ रोजी नगरविकास विभागाने २१ जानेवारी २०२५ रोजीचे आदेश रद्द करण्याचे निर्देश दिले असून, त्यानुसार संबंधित आदेश रद्द करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

## नागरिकांनी परिपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे -जिल्हाधिकारी



■ प्रतिनिधी | अकोला ■

मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण सुरू झाले असून, 'बीएलओं'कडून घरोघरी भेटी दिल्या जात आहेत. नागरिकांनी बीएलओ यांना परिपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले.

भारत निवडणूक आयोगातर्फे मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण सुरू करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिका-यांनी केले आहे. याअनुषंगाने सर्व विभागप्रमुखांची बैठक घेऊन जिल्हाधिका-यांनी कामकाजाचा आढावाही घेतला. जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेश परंडेकर आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात आजपासून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेट देत आहेत. यावेळी बीएलओ अधिकाऱ्यांकडून देण्यात येणाऱ्या गणनापत्रात नागरिकांनी आपली अचूक माहिती भरून फॉर्म त्यांच्याकडे जमा करावा.

हा फॉर्म जलद भरून होतो. त्यामुळे सर्वांनी मतदान केंद्रस्तरीय अधिका-यांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिका-यांनी यावेळी केले. मतदान केंद्रस्तरीय अधिका-यांकडून नागरिकांना आवश्यक माहिती दिली जाईल. त्याचप्रमाणे, आवश्यक माहिती व सहकार्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातही मदत कक्ष स्थापण्यात आला आहे.

# पाण्याविना उर्दू शाळा ; विद्यार्थ्यांची भटकंती

## खेट्रीतील जिल्हा परिषद शाळेचे दोन्ही हातपंप सहा महिन्यांपासून बंद

### आंदोलनाचा इशारा



'खेट्रीच्या जिल्हा परिषद उर्दू शाळेत दोन हातपंप बसविण्यात आले होते. मात्र गेल्या सहा महिन्यांपासून दोन्ही हातपंप बंद आहेत. त्वरित दुरुस्तीसाठी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. प्रशासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास विद्यार्थी व पालकांसह पंचायत समिती कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल.'

**सय्यद समीर,**
युवा सेना सस्ती सर्कल प्रमुख (उबाठा शिवसेना)

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या खेट्री येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेतील पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या ऐरणीवर आली आहे. शाळेतील दोन्ही हातपंप गेल्या अनेक महिन्यांपासून बंद असल्याने विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी शाळेबाहेर भटकंती करावी लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यासह शिक्षणावरही परिणाम होत असल्याची तक्रार पुढे आली आहे.

या पार्श्वभूमीवर युवा सेना (उबाठा शिवसेना) सस्ती सर्कल प्रमुख सय्यद समीर यांनी मंगळवारी (३० जून) पातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदन सादर करून दोन्ही हातपंप तातडीने दुरुस्त करण्याची मागणी केली. ३० जूनपासून शाळा सुरू झाली असून विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची नितांत गरज आहे. मात्र हातपंप बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना पाण्यासाठी शाळेबाहेर जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाने अद्याप कोणतीही दखल घेतली नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुविधांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने पालकांमध्येही नाराजीचे वातावरण आहे. सय्यद समीर यांनी दिलेल्या निवेदनात दोन्ही हातपंपांची त्वरित दुरुस्ती न झाल्यास विद्यार्थी व पालकांसह पंचायत समिती कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# पंढरपूर पायदळ वारीत 'मोबाईल पानेरीची' भक्तीमय सेवा

## अकोट संत नगरी प्रसाद मंडळाचा पाणीदार उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोट ■

पंढरपूरची आषाढी वारी म्हणजे केवळ एक प्रवास नव्हे, तर ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक पटलावरील एक अनुपम भक्ती चळवळ आहे. संतांनी सुरू ठेवलेला हा पायी वारीचा दैदिप्यमान वारसा आजही वारकरी बांधव तितक्याच श्रद्धा, भक्ती आणि निष्ठेने जपत आहेत. वारीच्या निमित्ताने सामाजिक ऐक्य, सद्भाव, बंधुभाव आणि समतेचे एक अलौकिक दर्शन अवघ्या जगाला घडते.

या पवित्र वारीमध्ये धर्म, जात, लिंग, उच्च-नीच किंवा श्रीमंत-गरीब अशा सर्वच भेदांच्या भिंती गळून पडतात. सावळ्या विठुरायाच्या दर्शनाची ओढ लागलेले लाखो भाविक कोणत्याही अपेक्षेशिवाय, केवळ निष्काम भावनेने यात सहभागी होतात. वारीचे हेच महात्म्य खरोखरच अद्वितीय आहे.



### तहानलेल्या विठ्ठल भक्तांची जलोपासना

देहभान विसरून पायी वारी करणाऱ्या या माऊलींची सेवा करण्यासाठी अनेक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि सेवाभावी व्यक्ती आनंदाने पुढे येतात. वैद्यकीय मदत, औषधोपचार, चहा-नाश्ता, शरबत, भोजन आणि निवासाची सोय करून वारीत आपले मोलाचे योगदान देतात. वारकऱ्यांच्या सेवेतच विठ्ठलाचे साक्षात दर्शन घडते, याच उदात्त भक्तीभावाने प्रेरित होऊन 'आकोट संत नगरी प्रसाद मंडळाने' गेल्या तीन वर्षांपासून वारकऱ्यांसाठी एक निस्वार्थी व 'पाणीदार' सेवाकार्य सुरू केले आहे. ?'मोबाईल श्रद्धामृत पानेरी'चा हा अनोखा उपक्रम सेवा क्षेत्रातील अग्रणी अनिल कोरपे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली, आकोट ते पंढरपूर वारी मार्गावर पायी चालणाऱ्या भक्तांना थंड आणि शुद्ध आर.ओ.चं पिण्याचे पाणी सहज उपलब्ध व्हावे, या सद्हेतूने 'श्रद्धामृत फिरती पानेरी' ही सेवा सुरू करण्यात आली आहे.

कडक आणि रणरणत्या उन्हात पायपीट करणाऱ्या वारकऱ्यांची तृष्णा भागवणारा पाण्याच्या गाडीचा हा उपक्रम अतिशय उपयुक्त व कौतुकास्पद ठरत आहे.

### ६५० कि.मी.चा सेवाप्रवास

गुरुमाऊली श्री संत वासुदेव महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होऊन, जवळपास एक महिना आणि ६५० किलोमीटरच्या प्रदीर्घ प्रवासात ही पानेरी अखंड कार्यरत असते. आपल्या स्वतःच्या दिंडीसह मार्गावरील इतर सर्व दिंड्यांमधील भाविकांसाठीही ही जलसेवा अत्यंत उपयुक्त ठरत आहे. या महान कार्याबद्दल आयोजक निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत. या संपूर्ण सेवायज्ञात जळगाव नहाटे येथील गुरुबंधू ह.भ.प. चंद्रकांत कोल्हे यांचे कष्टप्रद योगदान अत्यंत संस्मरणीय आहे. तसेच, आकोट संत नगरी सेवा मंडळाच्या शेकडो सदस्यांनी दिलेल्या आर्थिक मदतीतून हा स्तुत्य सेवा प्रकल्प अविरतपणे राबविला जात आहे. भक्ती आणि सेवेचा हा संगम खरोखरच वंदनीय आहे.


**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय अकोला, जि. अकोला.**

जा.क्र. वह/प्रस्तु-१/कावि/७१६/२०२६ — दिनांक २३/०६/२०२६

**मौजे सुकळी ता.जि. अकोला येथील गट क्र. ३३ क्षेत्र १.८८ हे. आर या शेतजमिनीचे ७/१२ मधील इतर अधिकारातील कुळाचे नाव कमी करणेबाबत.**

जाहीरनामा

सर्वत्र लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री. चंद्रलेखा नंदकिशोर निलखन रा. सुकळी ता.जि. अकोला यांनी मौजे सुकळी ता.जि. अकोला येथील गट क्र. ३३ क्षेत्र १.८८ हे. आर या शेतजमिनीचे ७/१२ मधील इतर अधिकारात असलेला उदेभान हरभाजी यांनी बाबुलाल पासून गट क्र. ३३ हा १९५७ साली निम्मे बटाईने केला म्हणून तो स प झाला हा शेरा कमी करणेबाबत या कार्यालयास अर्ज सादर केला आहे. अर्जदार यांनी या कार्यालयात प्रकरण सादर केल्यानुसार उपरोक्त प्रकरणात ज्यांना आक्षेप / हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी ०७ दिवसांचे आंत या कार्यालयात लेखी स्वरुपात आपले आक्षेप / हरकती सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेले आक्षेप / हरकत विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्का — **कुणाल झाल्टे**
**तहसिलदार** अकोला

जाहीर नोटीस

सर्व जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. मजिद खान लतीफ खान रा. अकोट, हे खालील तपशिलानुसार त्यांच्या मालकीची आणि ताब्यातील आरागिरणी (Sawmill) सर्व यंत्रसामग्री, परवाने (Licenses) आणि हक्कांसह श्री नदीम खान हमीद खान अकोट यांना कायमस्वरूपी विक्री/हस्तांतरित (Transfer) करीत आहेत.

१. आरागिरणीचा तपशील (Property Details) आरागिरणीचे नाव:- १. जुने नाव, अहेमद सॉमिल अकोट २. नविन नाव, शिबान सॉमिल अकोट परवाना क्रमांक (License No.) :- 102/22014 आय.डी.न. MH1135AMAK पत्ता/नगर भुमापन, शिट नं.८/प्लॉट नं.४/३ मौजे अकोट तालुका अकोट, जिल्हा अकोला, चतुःसीमा (Boundaries):- पूर्वेस :- जनता सॉमिल पश्चिमेस:- पोपटखेड रोड दक्षिणेस:- उसामा खान यांच्या प्लॉट उत्तरेस:- खलीक सॉमिल २. हरकती व आक्षेप (Objections):-

सदर आरागिरणीवर, तिच्या जागेवर दिलेल्या संमती नुसार, यंत्रसामग्रीवर किंवा वन विभागाच्या परवान्यावर (License) कोणाचाही कोणताही बोजा, गहाणखत, अन्नवस्त्र, वारसा हक्क, कोर्ट वाद किंवा इतर कोणताही कायदेशीर हक्क अथवा हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत (Within 15 Days) खालील पत्यावर आवश्यक त्या मूळ कागदपत्रांच्या पुराव्यासह लेखी हरकत नोंदवावी.

**टीप :-** मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास, सदर आरागिरणीवर कोणाचाही कोणताही हक्क किंवा आक्षेप नाही असे समजून हस्तांतरणाची पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतींची दखल घेतली जाणार नाही.

**सुमंत एस. सोळंके (भा.व.से)**
उपवनसंरक्षक, (प्रा) अकोला वनविभाग अकोला



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २०३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com



**Change In Name**
I have change my husband name From
**ZUBER AHEMAD GULAM SHABBIR**
-To-
**ZUBER AHMED GULAM SHABBIR** Address Chota Mominpura Balapur, Akola, Maharashtra - 444302 Passport No :- L9488950

**जाहीर नोटीस**

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९०२/२०२६ — प्रोसेस नं.७९५२/२०२६
चौ.ता. ०३/०८/२०२६ — दिनांक : २४/०६/२०२६

**अर्जदार :** १. दलिता मधुकर हिवराळे २. राजु मधुकर हिवराळे क. १ व २ रा. अनंत नगर, बाळापुर रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ३. वर्षा विजयकुमार कांबळे रा. एस. नं. २१४/डी / २, प्लॉट नं. ५४, सावित्रीबाई फुले नगर, डी मार्ट रोड, तरोडा बु, नांदेड, महाराष्ट्र ४. हर्षा प्रविण तायडे रा. सखाराम लंगडे नगर, अर्धापूर, नांदेड.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मधुकर नारायण हिवराळे
**पत्ता :-** रा. अनंत नगर, बाळापुर रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकर नारायण हिवराळे यांचे दि. ११/०७/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०६/ २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८६२/२०२६ — प्रोसेस नं.८०५३/२०२६
चौ.ता. २८/०७/२०२६ — दिनांक : २९/०६/२०२६

**अर्जदार :** १. नटवरलाल मदनलाल अहिर २. मनोज मदनलाल अहिर मो. नं. ९०२११६९७७८ क. १ व २ रा. पाण्याच्या टाकीजवळ, शिव नगर, बाळापुर रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ३. राखी गणेश अहिर रा. अनंत नगर, बाळापूर रोड, अकोला. ता. जि. अकोला. ४. दुर्गेश्वरी दिनेश लखनोवाले रा. ८–३–१३७६, सिद्धनाथ पुरी चौफाला, नांदेड, ता. जि. नांदेड.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मदनलाल रतनलाल अहिर
**पत्ता :-** रा. पाण्याच्या टाकीजवळ, शिव नगर, बाळापुर रोड, जुने शहर, अकोला.ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मदनलाल रतनलाल अहिर यांचे दि. १६/०४/२०२१ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**Change In Name**
I have Change My Name Form
**A. SAJID A. SADIK**
-TO-
**ABDUL SAJID ABDUL SADIK**
My residential Address in Pathanpura, junivasti TQ.Murtizapur Akola 444107

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला**

क्र. प्रस्तु.-२/कावि-११२४/२०२६ — दिनांक २४.०६.२०२६

जाहीरनामा

याव्दारे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक १२ सार्च, २०२५ नुसार जन्म-मृत्यु नोंदणी करीता अर्जदार सागर शहादेव इंगळे, रा. जुने शहर प्रताप चौक तेल्हारा यांची मुलगी नामे समर्था सागर इंगळे यांचा जन्म जिल्हा सर्वोचार रुग्णालय अकोला येथे दिनांक ०८.१०.२०२३ रोजी झाला असून यांच्या जन्माची नोंद उपनिबंधक जन्म-मृत्यु विभाग, शासकीय वैदयकिय महाविदयालय व सर्वोचार रुग्णालय, अकोला येथे नजर चुकीने करण्यात आली नाही. करिता अर्जदार यांनी जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश होणेबाबत उपनिबंधक जन्म-मृत्यु विभाग, शासकीय वैदयकिय महाविदयालय व सर्वोचार रुग्णालय, अकोला येथे विनंती अर्ज सादर केला आहे.

त्यानुसार, सागर शहादेव इंगळे, रा. जुने शहर प्रताप चौक तेल्हारा यांचा मुलगी नामे समर्था सागर इंगळे यांच्या जन्माची नोंद घेण्याकरिता कोणाला काही आक्षेप / हितसंबंध असतील त्यांनी आपले आक्षेप हरकत अर्ज हया कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दी पासुन सुट्टीचे दिवस वगळून पंधरा दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्थळ :- अकोला
दिनांक :-

शिक्का — **कुणाल झाल्टे**
**तहसिलदार** अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९११/२०२६ — प्रोसेस नं.८०५५/२०२६
चौ.ता. ०३/०८/२०२६ — दिनांक : २९/०६/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती गिता अर्जुन खंडारे रा. भरतपुर, ता. बाळापूर, जि. अकोला. २. नागेश अर्जुन खंडारे रा. चैतन्य नगर, चिखलपूरा, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** अनिल अर्जुन खंडारे चैतन्य नगर, चिखलपूरा, खरप रोड, अकोला. ता. जि. अकोला
**मयताचा पत्ता :-** मयत : अर्जुन झांगोजी खंडारे
**पत्ता :-** रा. भरतपूर, ता. बाळापूर, जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अर्जुन झांगोजी खंडारे यांचे दि. १८/१०/२०१९ रोजी भरतपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९१५/२०२६ — प्रोसेस नं.८०५७/२०२६
चौ.ता. ०३/०८/२०२६ — दिनांक : २९/०६/२०२६

**अर्जदार :** १. शोभा दिनकरराव उपाध्ये रा. उदय नगर, डाबकी रोड, स्वामी समर्थ केंद्राजवळ, अकोला. ता. जि. अकोला. २. रूपाली मंगेश खानझोडे रा. फ्लॅट नं. ८, दुसरा माळा, सुर्यदर्शन, को-ऑप. हाउसिंग सोसायटी, संदिप रेस्टॉरंट जवळ, प्लॉट नं. २७, सेक्टर १४, वाशी, नवी मुंबई. पिन कोड ४००७०३ ३. राहुल दिनकरराव उपाध्ये रा. फ्लॅट नं. ५१, बिल्डिंग नं. एम-४, राम मंदिराजवळ, नविन म्हाडा कॉलनी, वडगाव, कोल्हाटी, बजाज नगर, वडगाव, छत्रपती संभाजी नगर, औरंगाबाद ४३११३६ ४. पल्लवी दिनकर उपाध्ये रा. ह. मु. उदय नगर, डाबकी रोड, स्वामी समर्थ केंद्राजवळ, अकोला. ता जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दिनकरराव मधुकरराव उपाध्ये
**पत्ता :-** रा. उदय नगर, डाबकी रोड, स्वामी समर्थ केंद्राजवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दिनकरराव मधुकरराव उपाध्ये यांचे दि. १८/०३/२०२६ रोजी राहत्या घरी डाबकी रोड, उदय नगर, स्वामी समर्थ केंद्राजवळ, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८४४/२०२६ — प्रोसेस नं.७४१४/२०२६
चौ.ता. २७/०७/२०२६ — दिनांक : १०/०६/२०२६

**अर्जदार :** १. अलिमोनिसा तकदीर शाहर २. नझिर शाह तकदीर शाह ३. इकबाल शाह तकदीर शाह अर्जदार क्र. १ ते ३ रा. मॉर्डन स्कुल जवळ, गंगा नगर, गोवर्धन प्लाट, अकोला. ता. जि. अकोला. ४. अर्शिया परवीन असलम शाह रा.. गाझी प्लॉट, हिवरखेड रोड, अकोट. ५. मतीन शाह तकदीर शाह मो. नं. ९६३७८३४८६७ रा. इन्स्पेक्टर नगर, पातूर रोड, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : तकदीर शाह वजिर शाह
**पत्ता :-** रा. मॉर्डन स्कुल जवळ, गंगा नगर, गोवर्धन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तकदीर शाह वजिर शाह यांचे दि. ०१/०७/२०२५ रोजी राहते घरी मॉर्डन स्कुल जवळ, नगर, गोवर्धन प्लॉट, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# ऑपरेशन ऑल आऊट'चा वर्धा येथे गुन्हेगारांवर धडाका

## ६९.७७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी वर्धा पोलिसांनी राबविलेल्या 'ऑपरेशन ऑल आऊट' मोहिमेने गुन्हेगारी विश्वात मोठी खळबळ उडवून दिली आहे. पहाटेपासून रात्रीपर्यंत चाललेल्या या व्यापक धडक कारवाईत अवैध दारू व्यवसाय, अमली पदार्थांची तस्करी, जुगार, शस्त्रबंदी कायद्याचे उल्लंघन तसेच विविध प्रकारच्या गुन्हेगारीवर पोलिसांनी एकाच वेळी घाव घातला. या मोहिमेत तब्बल ६९ लाख ७७ हजार ९१८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ४१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली २८ जून रोजी जिल्हाभर ही



विशेष मोहीम राबविण्यात आली. जिल्ह्यातील सर्व १९ पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेने एकाच वेळी कारवाई करत गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर वचक निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

मोहिमेदरम्यान अवैध दारू विक्रीविरोधात मोठी कारवाई करण्यात आली. ४१ कारवायांमध्ये ५ लाख ३७ हजार ६५८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर अमली पदार्थविरोधी मोहिमेत हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीत १ किलो ७५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. या प्रकरणात ५ आरोपींना अटक करण्यात आली असून ३ लाख ९ हजार ८४५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

मोहिमेदरम्यान पोलिसांनी ५८ पाहिजे आरोपी आणि ८ फरार आरोपींचा शोध घेतला. सराईत गुन्हेगारांची तपासणी, हद्दपार गुन्हेगारांची पडताळणी तसेच एमपीडीए अंतर्गत सुटलेल्या २० गुन्हेगारांवर विशेष नजर ठेवण्यात आली. जुगारविरोधी कारवाईतही एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला, तर आर्म्स ॲक्ट अंतर्गत संशयितांची कसून तपासणी करण्यात आली.

जिल्हा वाहतूक शाखेनेही महत्त्वाच्या चौकांवर नाकाबंदी करून ड्रंक अँड ड्राइव्ह तसेच मोटार वाहन कायद्यांतर्गत व्यापक कारवाई केली. संपूर्ण मोहिमेत ४ उपविभागीय पोलीस अधिकारी, ११ ठाणेदार, स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी तसेच २४२ पोलीस अंमलदार, असे एकूण ४२ अधिकारी आणि २४२ कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.

या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारांचे धाबे दणाणले असून भविष्यातही अशाच पद्धतीने सातत्याने विशेष मोहिमा राबवून गुन्हेगारीचे कंबरडे मोडले जाईल, असा स्पष्ट इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे. अवैध धंदे, अमली पदार्थांची विक्री किंवा कोणतेही संशयास्पद कृत्य आढळल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहनही पोलीस अधीक्षकांनी केले आहे.

# एक वृक्ष, एक संकल्पः पुंडलिक धामात हरित अभियानाला बळ

**हिंगणघाट/जनमाध्यम**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत श्री मयुरेश सेवा प्रतिष्ठानच्या वतीने पिंपळगाव (मा.) येथील पुंडलिक धाम परिसरात वृक्षारोपण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला ग्रामस्थांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत हरित चळवळीला बळ दिले.

कार्यक्रमाची सुरुवात ह.भ.प. मयूर महाराज दरणे व ह.भ.प. शंकर महाराज घुसे यांच्या हस्ते वटवृक्षाचे रोप लावून झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा. सुरेश वाघमारे होते. यावेळी सरपंच पुरुषोत्तम वरटकर, माजी नगरसेवक मनोज वरघणे, रामदास इटणकर, हेमंत महाराज



तेजने, प्रवीण हराड, मधुकर तांबेकर, अनिल दरणे, रमेश चरडे, किशोर ढाले, अखिलेश जुवारे, अनिकेत दरणे, अभिनव हेडाऊ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पुंडलिक धाम येथे उभारण्यात येत असलेल्या मंदिर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. प्रा. सुरेश बाळपांडे यांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे या संतवचनाचा उल्लेख करत वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगितले. मंदिरासाठी योगदान देणाऱ्या दात्यांचा राधाकृष्णाची मूर्ती, शाल व वृक्षाचे रोप देऊन सन्मान करण्यात आला.

ह.भ.प. मयूर महाराज दरणे यांनी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाला महिला, युवक आणि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. रामदास इटणकर यांनी आभार मानले.

## संक्षिप्त

### वटपोर्णिमेला वटवृक्ष लागवडीचा संदेश

**वर्धा-** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वर्धा शहर व



जिल्हा शाखेच्या वतीने वटपोर्णिमेनिमित्त वटवृक्षाची पूजा करण्याऐवजी वटवृक्षाचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. शहर शाखेच्या प्रधान सचिव कल्पना सातव फुसाटे यांच्या पुढाकाराने सिंदी (मेघे) येथील संविधान चौकातील ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेत वटवृक्षाची लागवड करण्यात आली. समितीच्या पदाधिकाऱ्यांनी वटसावित्रीसारख्या पारंपरिक सणांकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची गरज व्यक्त करत श्रद्धेला विरोध नसून समाजहिताचे पर्याय स्वीकारण्याचे आवाहन केले. वटवृक्ष हा दीर्घायुषी, पर्यावरणपूरक व जैवविविधतेसाठी उपयुक्त असल्याने प्रत्येक महिलेने किमान एक वटवृक्ष लावावा, असा संदेश यावेळी देण्यात आला. उपक्रमात राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, राज्य पदाधिकारी सारिका डेहनकर, शाखा उपाध्यक्ष मनीष फुसाटे, जिल्हा पदाधिकारी रजनी सुरकार, विविध उपक्रम विभागाचे प्रमुख सुनील ढाले, कार्यकर्त्या रिंकू घोडेस्वार तसेच भास्कर इथापे यांची प्रमुख उपस्थिती होती. पर्यावरण संवर्धनासह सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांनी स्वागत केले.

# जांब नदीच्या पहिल्याच पुरात पर्यायी रस्ता वाहून गेला

## कंत्राटदाराच्या नियोजनशून्य कारभाराने आष्टी तालुक्याचा संपर्क तुटला

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी ते कारंजा घाट मार्गावरील बोरखेडीजवळ जांब नदीवर सुरू असलेल्या नवीन पुलाच्या बांधकामातील नियोजनाचा फज्जा पहिल्याच पावसात उडाला. वाहतूक सुरू ठेवण्यासाठी नदीपात्रातून तयार करण्यात आलेला पर्यायी रस्ता जांब नदीच्या पहिल्याच पुरात वाहून गेल्याने सोमवारी दिवसभर वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. परिणामी आष्टी तालुक्याचा संपर्क काही काळासाठी तुटला असून नागरिकांना तब्बल २५ किलोमीटरचा वळसा घालून प्रवास करावा लागला.

रविवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे जांब नदीला मोठा पूर आला. पुराच्या पाण्यासोबत आलेली झाडे कचरा आणि इतर अडथळे तात्पुरत्या रस्त्यालगत अडकल्याने पाण्याचा प्रवाह रोखला गेला. पाण्याचा दबाव वाढताच पर्यायी रस्ता अक्षरशः वाहून गेला. त्यामुळे एसटी बससह खासगी वाहने आणि दुचाकींची वाहतूक पूर्णपणे बंद पडली.

या घटनेचा सर्वाधिक फटका शाळकरी विद्यार्थी शेतकरी कामगार आणि रोजंदारीसाठी ये जा करणाऱ्या नागरिकांना बसला. अनेकांना नियोजित कामे रद्द करावी लागली तर काहींना मोठा वळसा घालून गंतव्यस्थानी पोहोचावे लागले.

पुराच्या पाण्याने बांधकामस्थळी उभारलेल्या मजुरांच्या झोपड्यांमध्येही शिरकाव केला.

अचानक आलेल्या पुरामुळे मजुरांची एकच धावपळ उडाली. बोरखेडी ग्रामस्थांनी तत्परता दाखवत सर्व मजुरांची सुखरूप सुटका केली.

दरम्यान पर्यायी रस्ता तयार करताना पुराचा धोका लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. कंत्राटदाराच्या निष्काळजी आणि नियोजनशून्य कारभारामुळे सर्वसामान्यांना वेठीस धरले जात असल्याची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वाहून गेलेला पर्यायी रस्ता तातडीने दुरुस्त करून वाहतूक पूर्ववत करावी अशी मागणी जोर धरत असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.



# नाकाबंदी तोडून दारूतस्कर फरार

## पोलिसांनी ७.४९ लाखांचा मुद्देमाल जप्त




**हिंगणघाट/जनमाध्यम**

अवैध दारू तस्करीविरोधात हिंगणघाट पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने सोमवारी धडक कारवाई करत ७ लाख ४८ हजार ८००रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वर्ध्याकडून हिंगणघाटकडे बलेनो कारमधून गावठी मोहा दारूची वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार नांदगाव चौकात नाकाबंदी करण्यात आली.

एमएच-३२-एएक्स-०२७१ क्रमांकाची संशयित बलेनो कार येताच पोलिसांनी चालकाला थांबण्याचा इशारा दिला. मात्र चालकाने नाकाबंदी तोडून भरधाव वेगाने संत कबीर वॉर्डाच्या दिशेने पलायन केले. पोलिसांनी पाठलाग सुरू केला असता समता बौद्ध विहाराजवळील गल्लीत कार बेवारस अवस्थेत आढळली. चालक अंधाराचा फायदा घेत पसार झाला. वाहनाची झडती घेतली असता १४ मोठ्या व दोन लहान प्लास्टिकच्या डब्यांमध्ये एकूण ३०० लिटर गावठी मोहा दारू आढळून आली. दारू, प्लास्टिक डबे आणि बलेनो कार असा एकूण ७ लाख ४८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

या प्रकरणी हिंगणघाट पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायदा व मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपीचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशील कुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अनिल राऊत यांच्या नेतृत्वात गुन्हे शोध पथकाने केली.

# सात जन्म हाच नवरा मिळो, महिलांचे वटपूजन



**हिंगणघाट/जनमाध्यम**

वटपौर्णिमेच्या निमित्ताने हिंगणघाट शहरात विवाहित महिलांनी पारंपरिक उत्साहात वडाची पूजा करून अखंड सौभाग्याचे व्रत पाळले. टिळक चौकातील तहसील कार्यालयासमोरील वटवृक्ष तसेच मोहता मिलसमोरील शनी मंदिरामागील वटवृक्ष परिसरात सकाळपासूनच महिलांची मोठी गर्दी झाली होती. नव्या साड्या, पारंपरिक दागिने आणि पूजा साहित्याने सजलेल्या महिलांनी वटवृक्षाला सुताचे धागे गुंडाळत विधीवत पूजा केली. पतीला दीर्घायुष्य लाभावे, कुटुंबात सुख-समृद्धी नांदावी आणि अखंड सौभाग्य लाभावे, अशी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. अनेक महिलांनी सात जन्म हाच नवरा मिळो अशी श्रद्धेने प्रार्थना केली, तर काहींनी जन्मोजन्मी हाच जीवनसाथी लाभो अशी भावना व्यक्त केली. शहरातील विविध मंदिरांमध्येही वटपौर्णिमेनिमित्त धार्मिक वातावरण अनुभवायला मिळाले. पूजा-अर्चना,ओवाळणी आणि व्रतकथांचे श्रवण करत महिलांनी परंपरा आणि संस्कृतीचे जतन केले. वटपौर्णिमेच्या निमित्ताने शहरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

# बदलत्या हवामानाशी जुळवून घ्या, तज्ज्ञांचा शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेतीचा मंत्र

## एल निनो, अनियमित पाऊस आणि पीक नियोजनावर शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद

**पवनूर (वर्धा)/जनमाध्यम**

अनिश्चित हवामान, पावसाचे बदलते स्वरूप आणि वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीऐवजी वैज्ञानिक शेतीचा अवलंब करण्याची गरज असल्याचे मत प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूरच्या तज्ज्ञांनी व्यक्त केले. ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत बजाज कृषी महाविद्यालय, पिपरी यांच्या वतीने पवनूर येथे आयोजित शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद कार्यक्रमात हवामान बदल आणि पीक नियोजनावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

शिक्षा मंडळाचे सभापती संजय भार्गव यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात प्रादेशिक हवामान केंद्रातील आर. बालासुब्रमण्यम, सी. एस. चिंचोळे आणि रिंकू हडके यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.



भारतीय हवामान विभागाच्या संकेतस्थळ आणि मोबाईल ॲपच्या माध्यमातून स्थानिक हवामानाचा अचूक अंदाज, कृषी हवामान सल्ला आणि नैसर्गिक आपत्तीपूर्व सूचना उपलब्ध होत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

आर. बालासुब्रमण्यम यांनी वर्धा जिल्ह्यात सरासरी ८४० मिलीमीटर पाऊस होत असला तरी त्याचे वितरण दिवसेंदिवस अनियमित होत असल्याचे सांगितले. कमी कालावधीत अतिवृष्टी आणि नंतर दीर्घ खंड पडण्याची शक्यता वाढत असल्याने जलसंधारण, पाण्याचा कार्यक्षम वापर, पीक विविधीकरण आणि कमी पाण्यात येणाऱ्या वाणांचा अवलंब करण्याचा सल्ला त्यांनी दिला.

एल निनोच्या परिणामांमुळे शेती नियोजनात बदल करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

संवाद सत्रात शेतकऱ्यांनी पेरणीची योग्य वेळ, सप्टेंबर आणि ऑक्टोबरमधील पावसाचे बदलते स्वरूप, तापमानातील चढउतार आणि एल निनोच्या परिणामांबाबत विविध प्रश्न उपस्थित केले. संजय भार्गव यांनीही हवामानातील टोकाच्या घटनांवर चिंता व्यक्त करत तज्ज्ञांशी सविस्तर चर्चा केली.डॉ. स्नेहल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाला राजेंद्र खर्चे, डॉ. कविता चोपडे, आकाश लेवाडे, सरपंच रमेश कारनकर तसेच रावे कार्यक्रमातील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# वटपौर्णिमेला वडाचे रोप लावत पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## आधार फाउंडेशनचा दहा वर्षांचा हरित संकल्प कायम

**हिंगणघाट/जनमाध्यम**

वटपौर्णिमेच्या निमित्ताने केवळ वडाच्या वृक्षाची पूजा न करता त्याचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा उपक्रम आधार फाउंडेशनच्या वतीने उत्साहात पार पडला. गेल्या दहा वर्षांपासून सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबविणाऱ्या संस्थेने यंदाही वडाचे रोप लावून पर्यावरण रक्षणाचा संकल्प अधिक दृढ केला.



कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून पोलीस उपनिरीक्षक कुमुदिनी पठारे तसेच समाजसेविका छायाताई सातपुते आणि वंदना कामडी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी कार्यकारी अध्यक्षा माधुरी विहीरकर यांनी संस्थेच्या विविध सामाजिक शैक्षणिक आणि पर्यावरणविषयक उपक्रमांचा आढावा घेत पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करून त्याचे संगोपन करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

पोलीस उपनिरीक्षक कुमुदिनी पठारे यांनी पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे जतन करण्याची जबाबदारी स्वीकारावी असे आवाहन केले. समाजसेविका छायाताई सातपुते यांनी वटपौर्णिमेच्या परंपरेसोबत पर्यावरण संरक्षणाची जाणीवही महिलांनी जोपासावी असे मत व्यक्त केले. वंदना कामडी यांनी अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचत असल्याचे सांगत अशा उपक्रमांचे सातत्य राखण्याची अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती धार्मिक यांनी केले तर वीरश्री मुडे यांनी आभार मानले. या उपक्रमात महिला कार्यकर्त्या सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वडाच्या वृक्षाचे संगोपन करण्याचा संकल्प केला. पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# कबीरांची दृष्टी समग्रतेशी सुसंगत आहे-प्रो.पुरनचंद टंडन

**वर्धा/ जनमाध्यम**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात कबीरदासांच्या जयंतीनिमित्त, सोमवार, २९ जून रोजी 'कबीरदासांचे समग्र योगदान' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना दिल्ली विश्वविद्यालयाचे ज्येष्ठ प्रोफेसर पुरनचंद टंडन म्हणाले की, कबीरदासांनी सामाजिक दुष्प्रवृत्ती आणि अंधश्रद्धांवर हल्ला चढवला. त्यांची दृष्टी एक समग्र आणि सर्वांगीण दृष्टिकोन दर्शवते.



महादेवी वर्मा सभागृहात आयोजित व्याख्यानादरम्यान कबीरांच्या समग्र योगदानावर ऑनलाइन प्रकाश टाकताना, प्रो. टंडन म्हणाले की, कबीर एक शुद्ध अद्वैत साधक होते. त्यांचे विचार आत्मसमर्पण आणि आत्ममग्नतेने वैशिष्ट्यपूर्ण होते, ज्याचा उपयोग त्यांनी आपल्या दोह्यांद्वारे समाजाला जागृत करण्यासाठी केला. कबीरांची कविता चिंतन, प्रेम साधना आणि शुद्ध चेतनेने ओतप्रोत आहे.त्यांचे जीवन ललित कला, वास्तुकला, चित्रकला आणि गायन यांसारख्या कलांनी समृद्ध होते.

त्यांच्या जीवनावर आधारित नाटके, कविता, कथा, कादंबऱ्या आणि मालिका लिहिल्या गेल्या आहेत, ज्यातून त्यांचे समृद्ध तत्त्वज्ञान प्रकाशात आले आहे.कबीर पंथाच्या माध्यमातून त्यांच्या विचारांचा प्रसार केला जात आहे आणि अनेक विश्वविद्यालयामध्ये कबीर केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.प्रोफेसर टंडन यांनी कबीरांच्या स्तोत्रांवर आणि तांत्रिक परिभाषेवरही सविस्तर चर्चा केली.

आपल्या स्वागतपर भाषणात आणि प्रास्ताविकेत हिंदी साहित्य विभागाचे प्रमुख प्रोफेसर अवधेश कुमार यांनी कबीरदासांच्या एकूण योगदानावर सविस्तर भाष्य केले आणि त्यांच्या दोहे व साखींचे सविस्तर विश्लेषण सादर केले. ते म्हणाले की, कबीर हे सामान्य अर्थाने समाजसुधारक नाहीत, तर ते एक साधक आहेत ज्यांनी आध्यात्मिक संघर्ष केला. ते सर्व मानवजातीच्या एकतेचे प्रतीक आहेत. कार्यक्रमाचे संचालन हिंदी साहित्य विभागाचे सहायक प्रोफेसर डॉ. रुपेश कुमार सिंह यांनी केले तर सहायक प्रोफेसर डॉ. कोमल कुमार परदेशी यांनी आभार मानले. कबीर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि विश्वविद्यालयाचे गीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली.

राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी डॉ. अशोकनाथ त्रिपाठी, डॉ. सूर्यप्रकाश पांडे, डॉ. जगदीश नारायण तिवारी, डॉ. संदीप सपकाळे, डॉ. मीरा निचले, डॉ. शैलेश कदम इत्यादींसह मोठ्या संख्येने शोधार्थी व विद्यार्थी उपस्थित होते.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २१४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# विदर्भाच्या राजकारणातील ठाम आवाज...अरुणभाऊ अडसड!

'माणसाचं मोठेपण पदावरून ठरत नाही; ते ठरतं त्याने आयुष्यभर जपलेल्या विचारांवर, केलेल्या संघर्षावर आणि घडवलेल्या कार्यकर्त्यांवर.'

अशाच विचारांचा वारसा जपणारे, भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेसाठी आयुष्य अर्पण करणारे, कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सदैव खंबीरपणे उभे राहणारे, विदर्भातील ज्येष्ठ नेतृत्व, आमचे प्रेरणास्थान आदरणीय अरुणभाऊ अडसड यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक अभिष्टचिंतन!

राजकारणात अनेक नेते येतात-जात राहतात; परंतु काळाच्या कसोटीवर टिकणारे नेते तेच असतात ज्यांनी सत्ता असो वा नसो, विचारांची साथ कधी सोडलेली नसते. अरुणभाऊंचा संपूर्ण राजकीय प्रवास हा अशाच पक्षनिष्ठेचा, संघर्षाचा आणि कार्यकर्त्यांवरील अपार प्रेमाचा प्रवास आहे. ज्या काळात भारतीय जनता पक्षाची ताकद ग्रामीण भागात मर्यादित होती, त्या काळात गावोगावी जाऊन पक्षाची विचारधारा पोहोचवणे, कार्यकर्त्यांची फळी उभी करणे, संघटन मजबूत करणे आणि विचारांवर विश्वास ठेवणाऱ्या हजारो युवकांना पक्षाशी जोडणे, हे कार्य आदरणीय भाऊंनी सातत्याने केले. आज उभे असलेले अनेक कार्यकर्ते त्यांच्या प्रेरणेतून राजकारणात आले आहेत.

आदरणीय भाऊंनी नेहमी एकच गोष्ट शिकवली—'परिस्थिती कितीही कठीण असली तरी संघर्ष सोडायचा नाही.' विजयात संयम आणि पराभवात धैर्य हे त्यांचे वैशिष्ट्य राहिले आहे. म्हणूनच अनेक चढ-उतार आले, अनेक संकटे आली; पण त्यांच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास आणि कार्यकर्त्यांवरील विश्वास कधी डळमळला नाही.

कार्यकर्त्यांना त्यांनी कधी केवळ पक्षाचे सैनिक मानले नाही, तर कुटुंबातील सदस्य मानले. प्रत्येकाच्या अडचणीत धावून जाणे, योग्य मार्गदर्शन करणे, नव्या पिढीला संधी देणे आणि संघटनाला प्राधान्य देणे ही त्यांची कार्यशैली आजही अनेकांसाठी आदर्श आहे.

राजकारण हे केवळ निवडणुकीपुरते नसते; ते समाजाशी जोडलेली जबाबदारी असते. ही जबाबदारी अरुणभाऊंनी आयुष्यभर प्रामाणिकपणे पार पाडली. म्हणूनच त्यांच्याबद्दलचा आदर हा केवळ पक्षापुरता मर्यादित नसून समाजातील विविध घटकांच्या मनात आहे.

एखाद्या व्यक्तीच्या जीवनात संघर्ष हा काही दिवसांचा किंवा काही प्रसंगांचा भाग असतो; पण काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात ज्यांचे संपूर्ण आयुष्यच संघर्षाने व्यापलेले असते. आदरणीय अरुणभाऊ अडसड यांचे जीवन हे अशाच संघर्षमय प्रवासाचे उत्तुंग उदाहरण आहे. त्यांनी प्रत्येक अडचणीकडे संधी म्हणून पाहिले आणि प्रत्येक संकटातून नवी ऊर्जा मिळवत समाजकारणाची वाट अधिक भक्कम केली. सामान्य कार्यकर्त्यापासून ते विदर्भातील ज्येष्ठ नेतृत्वापर्यंतचा त्यांचा प्रवास सहज नव्हता. त्या प्रवासात असंख्य संकटे, विरोध, अपयश आणि कठीण प्रसंग आले. पण त्यांनी कधीही विचारांची साथ सोडली नाही. 'सत्य आणि विचारांचा मार्ग कठीण असतो; पण तोच शेवटी समाजाला दिशा देतो,' या विश्वासावर ते ठाम राहिले.

आज भारतीय जनता पक्ष देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून उभा आहे; परंतु या यशामागे हजारो निष्ठावान कार्यकर्त्यांचे योगदान आहे. विदर्भात आणि विशेषतः धामणगाव रेल्वे परिसरात पक्षाची मुळे रुजविण्यासाठी आदरणीय अरुणभाऊंनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

ज्या काळात पक्षाकडे सत्ता नव्हती, साधने नव्हती आणि अनेक ठिकाणी पक्षाचे नावसुद्धा फारसे परिचित नव्हते, त्या काळात त्यांनी गावोगावी जाऊन विचारांची मशाल पेटती ठेवली. प्रत्येक गावात कार्यकर्ते तयार करणे, शाखा उभ्या करणे,



युवकांना राष्ट्रहिताच्या विचारांशी जोडणे आणि संघटन मजबूत करणे, हे त्यांचे अखंड ध्येय होते.

आज अनेक ज्येष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्ते अभिमानाने सांगतात की, त्यांच्या राजकीय प्रवासाची पहिली प्रेरणा त्यांना अरुणभाऊंकडूनच मिळाली.

राजकारणात अनेक नेत्यांची कार्यालये मोठी असतात; पण अरुणभाऊंचे सर्वात मोठे कार्यालय म्हणजे जनतेचे मन.

त्यांच्या घरी येणारा प्रत्येक कार्यकर्ता हा पाहुणा नसून कुटुंबातील सदस्य असतो. कोणत्याही वेळेला, कोणत्याही अडचणीसाठी आलेल्या व्यक्तीला त्यांनी कधीही रिकाम्या हाताने किंवा निराश मनाने परत पाठविले नाही. एखाद्या कार्यकर्त्याच्या घरात दुःख असो, एखाद्या शेतकऱ्यावर संकट आलेले असो, एखाद्या विद्यार्थ्याला मार्गदर्शन हवे असो किंवा समाजातील एखाद्या गरजू कुटुंबाला मदतीची आवश्यकता असो—अरुणभाऊंची उपस्थिती हा त्या कुटुंबासाठी मोठा आधार ठरली आहे.

मोठेपणा हा माणसाच्या पदात नसतो; तो त्याच्या स्वभावात असतो. अनेक दशकांचा राजकीय अनुभव, असंख्य कार्यकर्त्यांचा विश्वास आणि समाजातील मानाचे स्थान मिळूनही अरुणभाऊंनी कधीही साधेपणा सोडला नाही. त्यांचा नम्र स्वभाव, प्रत्येकाशी आपुलकीने संवाद साधण्याची पद्धत आणि सर्वसामान्य माणसाच्या भावना समजून घेण्याची संवेदनशीलता हीच त्यांच्या लोकप्रियतेची खरी कारणे आहेत.

आजच्या काळात राजकारणाकडे अनेकजण केवळ पद आणि प्रतिष्ठेच्या दृष्टीने पाहतात; पण अरुणभाऊंचे संपूर्ण आयुष्य तरुणांना वेगळा संदेश देते. ध्येय निश्चित करा, विचारांवर विश्वास ठेवा, संकटांना सामोरे जा, कार्यकर्त्यांवर प्रेम करा आणि समाजासाठी निस्वार्थ भावनेने काम करा—ही शिकवण त्यांनी आपल्या कृतीतून दिली आहे. त्यांच्या सहवासात घडलेले अनेक युवक आज विविध क्षेत्रात नेतृत्व करत आहेत. हा त्यांच्या आयुष्याचा सर्वात मोठा ठेवा आहे.

विश्वास हा एका दिवसात मिळत नाही; तो वर्षानुवर्षांच्या निस्वार्थ सेवेतून कमवावा लागतो.

अरुणभाऊंनी तो विश्वास कमावला आहे. म्हणूनच आजही एखादा प्रश्न निर्माण झाला की, 'भाऊंकडे जाऊया,' हा शब्द सामान्य माणसाच्या तोंडून सहजपणे बाहेर पडतो.

हीच त्यांची खरी कमाई आहे. पदे येतात आणि जातात, सत्ता बदलते; पण जनतेच्या मनातील स्थान कायम राहते. अरुणभाऊंनी हे स्थान आपल्या कार्याने आणि माणुसकीने मिळवले आहे.

आदरणीय अरुणभाऊ अडसड हे केवळ एका मतदारसंघाचे किंवा एका पक्षाचे नेते नाहीत; ते एका विचाराचे प्रतिनिधित्व करतात. संघर्ष, संघटन, सेवा, निष्ठा आणि माणुसकी या मूल्यांचा त्यांनी आयुष्यभर जपलेला वारसा पुढील पिढ्यांसाठी दीपस्तंभ ठरणारा आहे.

त्यांचे जीवन हे प्रत्येक कार्यकर्त्यासाठी प्रेरणेचे विद्यापीठ आहे. त्यांच्याकडून शिकण्यासारखे म्हणजे केवळ राजकारण नाही, तर माणुसकी, संयम, त्याग आणि समाजासाठी जगण्याची वृत्ती आहे.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त परमेश्वराकडे एकच प्रार्थना- त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अखंड कार्यशक्ती लाभो. त्यांचा अनुभव, मार्गदर्शन आणि आशीर्वाद आम्हा सर्व कार्यकर्त्यांना सदैव लाभत राहो.

भाऊ, आपण शतायुषी व्हा... आपल्या विचारांचा दीप असाच तेजाने प्रज्वलित राहो...

वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा भाऊ!

**— वैभव मीनाक्षी सुभाषराव देशमुख**
मो. क्र.९६६५७९६१२४
जुना धामणगाव, ता. धामणगाव रेल्वे, जि. अमरावती
(हजारो कार्यकर्त्यांपैकी एक कार्यकर्ता)

# ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी

कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकट करण्याचा दिलासादायक निर्णय घेतला आहे. राज्यातील शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याच्या ऐतिहासिक निर्णयाविषयी माहिती देणारा हा लेख.

भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या व राज्याच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. शेती व शेतकरी हे दोन्ही घटक राज्याच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ह्या एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

**कर्जमुक्ती योजना काय आहे ?-** सन २०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर सन २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही.

याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**एकवेळ समझोता योजना :-** १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत कालावधी दिला जाणार आहे.

**प्रोत्साहनपर लाभ :**

नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षातील अल्पमुदत पीक




कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.

तसेच, २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात पूर्णतः परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा ५ हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

**नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा :**

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ मधील योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्वाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुर्नगठन/फेरपुर्नगठन थकीत हप्त्याची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत रक्कम रु. ५० हजार पर्यंत असल्यास पूर्ण कर्जमुक्ती, आणि रु. ५० हजारांपेक्षा जास्त असल्यास एकवेळ समझोता (ध्ऊए) योजनेचा लाभ मिळणार आणि रक्कम भरण्याची मुदत ३१ मार्च २०२७ असणार आहे.

**योजनेचे निकष :**

पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती.

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू.३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश. ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश. जमीन धारणेची अट नाही. पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती.

२ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ.शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे.

राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जाना लागू.

**कोण पात्र असणार नाहीत :** विद्यमान किंवा माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा व राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीचे विद्यमान किंवा माजी सदस्य.

केंद्र किंवा राज्य शासनातील असे अधिकारी व कर्मचारी, ज्यांचे एकत्रित मासिक वेतन रु.२५ हजार पेक्षा अधिक आहे.

राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ इ.) तसेच अनुदानित संस्थांतील रु. २५,००० पेक्षा अधिक मासिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारी.

शेतीव्यतिरिक्तच्या उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती, निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे २५ हजार पेक्षा अधिकमासिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (मात्र माजी सैनिकांना हा अपवाद लागू राहील).

कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड तसेच सहकारी दूध संघ यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व रु. २५ हजार पेक्षा अधिक एकत्रित वेतन असलेले कर्मचारी. मात्र, सहकारी साखर कारखान्यांतील हंगामी कामगार या अपात्रतेतून वगळण्यात आले असून ते योजनेसाठी पात्र राहतील.

या कर्जमुक्ती योजनेची संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शक असून या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांचे वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार आहे.

**-विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**


## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३२१/२०२६ ने.ता.०७.०८.२०२६

अर्जदार :
१. **श्रीमती निर्मलाबाई रामदासपंत शिरभाते**, वय ७५ वर्षे, धंदा - घरकाम
२. **राजेंद्र रामदासपंत शिरभाते**, वय ४४ वर्षे, व्यवसाय - नोकरी
३. **संतोष रामदासपंत शिरभाते**, वय ४२ वर्षे, व्यवसाय - नोकरी
४. **शामराव गोविंदराव शिरभाते (मय्यत)**
४अ) **प्रमिला शामराव शिरभाते**, वय ७८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
४ब) **प्रशांत शामराव शिरभाते**, वय ४१ वर्षे, व्यवसाय - नोकरी
अर्जदार क्र.१ ते ३ रा.करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
ह.मु.स्वामी विवेकानंद नगर, नेटसमर्थ, हॉस्पिटल,सिडको, नाशिक, ता.जि.नाशिक,
अर्जदार क्र.४ अ) व ४ ब) रा.करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक रामदासपंत गोविंदराव शिरभाते** यांचा **मृत्यू दि.२४/०९/२००६** रोजी तसेच **मृतक शामरावजी गोविंदराव शिरभाते** यांचा **मृत्यू दि.१५.०१.२०२६** रोजी **रा.खेल चौधर करजंगाव, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती** येथे झालेला आहे. तसेच **मृतक गोविंदसा मोतीसा शिरभाते** हे **दि.२५/०७/१९८९** रोजी रा.करजगांव, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे मय्यत झाले आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३२१/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.३०.०६.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॅाट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २९३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज - १२०७/२०२६**
**श्रीमती सलमा अधिक एक विरुध्द निरंक**
**पुढील तारीख १०.०८.२०२६**

अर्जदार :
1) **Salma Nahid Ahesanuddin Shekh,** Age 55 yrs., Occu.- Nil Ahesanuddin, Near Dharam Kata, Zamzam Nagar, Amravati, Amravati (M.S.)- 444601
2) **Adnanuddin Ahesanuddin,** Age 25 yrs., Occu.- Student, S/o. Ahesanuddin Near dharam Kata, Zamzam Nagar, Amravati, Amravati (M.S.)- 444601

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत अहेसानुददीन सैफुदीन शेख** हे **दि.०७.०२.२०२५** रोजी अमरावती,ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार सलमा अधिक एक विरुध्द निरंक** यांनी रा.वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती सलमा अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २९.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय (व-स्तर),**
**अमरावती**

## तहसीलदार भातकुली यांचे कार्यालय

संपर्क कार्यालय - ०७२१-२३८९००१ email : tah.bhatkuli@gmail.com
क्र.कलि/प्रस्तु-१/काvि-५३८/२०२६ दि.१३.०४.२०२६

**अर्जदार - अब्दुल राजीक अब्दुल गफ्फार, रा.खोलापूर, ता.भातकुली, जि.अमरावती**

## जाहीरनामा

**या** जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार अब्दुल राजीक अब्दुल गफ्फार, रा.खोलापूर, ता.भातकुली, जि.अमरावती यांनी मौजा बोरखडी खु., ता.भातकुली येथील गट नं.५३ क्षेत्र २.०४ हे.आर, भोगवटदार वर्ग-१ या शेतजमिनीच्या ७/१२ मध्ये इतर अधिकारामध्ये कुळ म्हणून अर्जदार यांचे वडीलांचे नांव असून अर्जदार यांनी अर्जात नमुद करुन कुळ खरेदी प्रमाणपत्र मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | मौजा | शेत स.नं./ गट नं. | क्षेत्रफळ | आकारणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | बोरखडी खु. | ५ | २.०४ हे.आर | ११.३५ | |

त्यामुळे अर्जदाराने दिलेल्या अर्जावरुन जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे. करीता सदर प्रकरणामध्ये ज्या कोणालाअर्जदार यांच्या वरील प्रमाणे न मुद विनंतीवर काही हरकती वा आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत आपला आक्षेप अर्ज लेखी स्वरुपात आवश्यक पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अर्ज स्विकारण्यात येणार नाही तथा त्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच प्रकरणात कोणालाही काही म्हणावयाचे नाही असे गृहित धरुन प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यात येईल.

शिक्का
**स्वा/-**
**तहसीलदार, भातकुली**

## जाहीर सुचना

माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, खालील वर्णित मिळकत ही माझे पक्षकाराची वडिलोपार्जित मिळकत आहे.

**मालमत्तेचे वर्णन -** सब रजि.नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण विभाग जि.प.अमरावतीचे कक्षेतील व ग्रामपंचायत नांदुरा बु.चे हद्दीतील मौजे नांदुरा बु., ता.जि.अमरावती येथील शेत भूमापन क्र.२५, भो.वर्ग-१, एकुण क्षेत्रफळ १ हे.२६ आर, आ.रु.६.६५ पैसे शेत सालीम कोरडवाहू यातील झाडाझुडपांसह याची चतुःसिमा-
पुर्वेस - शांताराम गोविंदराव किरकटे यांचे शेत
पश्चिमेस - शांताराम गोविंदराव किरकटे यांचे शेत
उत्तरेस - पुरुषोत्तम गोविंदराव टेकाडे
दक्षिणेस - वहीवाटीचा रस्ता

सदर मिळकतीची सरस व निरस मानाने वाटणी झालेली नाही. सदर मिळकतीत माझे पक्षकाराचा हक्क व अधिकार आजही कायम आहे. परंतु माझे पक्षकारास असे निदर्शनास आले आहे की, श्री.ओंकार विठु टेकाडे हे काही व्यक्तिंशी संगनमत करुन खोटे कागदपत्र बनवित आहे तसेच सदर अवैध कागदपत्राद्वारे अवैधरित्या फायदा घेण्यासाठी व माझे पक्षकाराचे हक्क डावलण्यासाठी सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्नात आहे.

त्यामुळे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, कोणीही स्वतःची दिशाभूल करुन किंवा संगनमताने माझे पक्षकाराचे मालकी हक्कास व ताब्यास कोणत्याही तऱ्हेचा अडथळा व त्रयस्थ अधिकार निर्माण करण्याचे प्रयत्न करु नये. माझे पक्षकाराचे संमतीशिवाय झालेल्या कोणत्याही स्वरुपाच्या व्यवहारात सामील प्रत्येक व्यक्ती संयुक्तरित्या व वेगवेगळ्यारित्या फौजदारी कृत्यासाठी तसेच होणाऱ्या नुकसानीस जबाबदार राहतील, याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक ३०.०६.२०२६**

स्वाक्षरी/-
**(ॲड.महेश पी.गुप्ता)**
ॲडव्होकेट/नोटरी
रा.रतनगंज, अमरदिप कुंकू कारखाना जवळ, अमरावती
ता.जि.अमरावती
मो.९८८१४८३८५६

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज - ८६४/२०२६**
**सारिका व इतर विरुध्द निरंक**
**पुढील तारीख २४.०६.२०२६**

**अर्जदार :** **Sarika Rajesh Chavhan,** Age 39 yrs., Occu.- Household R/o. Amravati Akoli Road, New Town Rathi Nagar, Badnera -Amdapur, Badnera, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत निर्मला राजेश चव्हाण** हे **दि.२९.०३.२०२५** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार सारिका विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सारिका विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २४.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय (व-स्तर),**
**अमरावती**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११५५/२०२६
**दिपा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१९.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Smt.Deepa @ Dipali Ashish Aundhkar @ Dipali Manohar Kale Age 39 Yrs. Occu.: Household
2. Anandi Ashish Aundhkar, Age 09 Yrs. Occu.: Education
3. Smt.Rekha Gulab @ Gulabrao Aundhkar, Age 62 Yrs. Occu.: Household
Both R/o Yogayog Colony, Behind T.B.Hospital, Sundarlal Square, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **आशिष गुलाबराव औधकर** हे दिनांक 12.04.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **दिपा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **दिपा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११८५/२०२६
**देवकाबाई व चार -वि- निरंक**
पुढील ता.०३.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Devkabai Dipakrao Khadse, Age 60 Yrs. Occu.: Household
2. Bandu Dipakrao Khadse, Age 41 Yrs. Occu.: Service R/o Near Santoshi Mata Temple, Amba Colony, Amravati.
3. Nilesh Dipakrao Khadse, Age 39 Yrs. Occu.: Labourer
4. Niteshkumar Dipakrao Khadse, Age 39 Yrs. Occu.: Labourer
5. Yogesh Dipakrao Khadse, Age 37 Yrs. Occu.: Labourer
1 & 3 to 5 R/o Gandhi Ashram, Near Gadgadeshwar Temple, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Dipak Zabuji Khadse हे दिनांक 03.04.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Devkabai Dipakrao Khadse + 4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Devkabai Dipakrao Khadse + 4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# राज्यात वणव्यामुळे दुर्मिळ वनस्पती व वन्यजीवांचे नुकसान-आ.संजय खोडके

## तेंदूपत्ता संकलनाच्या काळात काही असामाजिक तत्वांकडून जंगलांना आग लावण्याचे प्रकार

**अमरावती/का.प्र.**
राज्यातील सुमारे १२ हजार ००३ हेक्टर वनक्षेत्र आगीच्या विळख्यात सापडले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे. वणव्याच्या घटनेमुळे वनसंपदा तसेच वन्यजीवांचे मोठे नुकसान झाले आहे. तेंदूपत्ता संकलनाच्या काळात काही असामाजिक तत्वांकडून जंगलांना जाणीवपूर्वक आग लावून वनसंपत्तीला हानी पोहोचविली जात असून शासनाने ठोस उपाययोजनांची मागणी विधानपरिषद आमदार संजय खोडके यांनी राज्यविधीमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात लावून धरली.

आ. संजय खोडके यांनी सांगितले कि,राज्यातील १६ हजार ००८ वणव्याच्या घटनेमुळे वनसंपदेला मोठा फटका बसला असून सुमारे १२ हजार ००३ हेक्टर वनक्षेत्र आगीच्या विळख्यात सापडले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, जंगलात पेटणारा वणवा हि नैसर्गिक घटना नसून जंगलांमध्ये मानवनिर्मित वणव्याच्या घटनेत वाढ होत आहे.जंगलातील वणवा पसरत जात असल्याने हजारो वृक्ष, दुर्मिळ वनस्पती तसेच शेकडो वन्यजीवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने जंगलातील वनसंपदा, अधिवास व जैवविविधता धोक्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांच्या शेती-पिकां चे व शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची बाब सुद्धा आ. संजय खोडके यांनी सभागृहाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच वन परिक्षेत्रात तेंदूपत्ता संकलनाच्या काळात वणवा पेटत असल्याने मजुरांना सुद्धा रोजगारासाठी स्थानांतर वाढले आहे. वनसंरक्षण संदर्भात प्रादेशिक वन विभाग आणि वन्यजीव विभाग असे दोन भाग आहे. त्यामुळे या दोन्ही विभागांमध्ये समन्वय निर्माण करून वणव्याच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य होणार असल्याचे सांगून दोन्ही विभागांनी संयुक्तपणे काम करून वणव्याच्या घटना रोखण्यासाठी विशेष कृती आराखडा तयार करावा,अशी मागणीही त्यांनी केली. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागतील वनक्षेत्रात वाढत्या वणवा व नुकसानीच्या घटनाबाबत शासन गंभीर नसल्याचा बाबत सुद्धा आ.खोडके यांनी नाराजी व्यक्त केली.



त्यामुळे राज्यातील जंगलभागातील वणवा आटोक्यात आणण्यासाठी कुठल्या उपाययोजना करण्यात आल्या? वारंवार लागणाऱ्या वणव्यांमुळे होणारे पर्यावरणीय व वन्यजीवांचे नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली? तसेच जंगलातील वणव्यास जबाबदार आणि जाणीवपूर्वक वणवे लावणाऱ्या असामाजिक तत्वांवर कारवाई करणार का? असा प्रश्न आ.संजय खोडके यांनी उपस्थित करून याबाबत शासनाने खुलासा करण्याची मागणी सभागृहातून करण्यात आली.

यावर उत्तर देतांना राज्याचे वन मंत्री नामदार गणेश नाईक यांनी सांगितले कि, वनक्षेत्रबाधित जंगलात आगीच्या घटना आटोक्यात आणण्यासाठी विभागीय स्तरावर कंट्रोल रुम स्थापन करून आगीबाबतची माहिती वनकर्मचाऱ्यांपर्यंत पोहचवण्यात येऊन आगीवर नियंत्रण मिळवण्याची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत संबधित अधिकाऱ्यांना सुचना निर्गमित करण्यात येईल. तसेच जंगलातील वणवा जाणीव पूर्वक पेटविण्यात आल्याचे तथ्य समोर आल्यास संबधितांवर भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ कायदे/नियमांतर्गत थेट कारवाई व कठोर शिक्षा करणार असल्याचे सुद्धा मंत्रिमहोदयांनी सभागृहासमक्ष स्पष्ट केले.


गेल्या वर्षभरात राज्यातील वन परिक्षेत्रातील वणव्यामुळे झालेल्या जीवित अथवा वित्त हानी तसेच शेतीच्या नुकसानप्रकरणी संबधित पंचनामे व अहवालावरून कृषी विभाग व आपत्ती विभागाकडून आर्थिक मदत देण्याबाबत सुद्धा शासन सकारात्मक आहे.

वनविभाग जंगलातील आगीच्या घटना रोखण्यासाठी ड्रोन, सॅटेलाइट देखरेख, ग्रामस्तरीय वनरक्षक दल व जनजागृती कार्यक्रम नियोजित करण्यात येत असून आगीची माहिती

तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स बेस कॅमेरांचा वापर करुन आग लागलेले क्षेत्र तात्काळ उघडकीस आणून आगीवरती नियंत्रण मिळविण्यात येईल.

तसेच वनपरिक्षेत्र स्तरावर जनजागृती व वनवणवा प्रतिबंधात्मक भितीपत्रके तयार करुन प्रचार प्रसिध्दी, जळीत क्षेत्रात फायर वॉचरची नेमणूक करण्यात येऊन आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती वनमंत्री ना. गणेश नाईक यांनी सभागृहात दिली.

## संक्षिप्त



### पूर्णा नदीला पूर ...

**कालच्या दमदार पावसानंतर दुथडी भरून वाहणारी पूर्णा नदी; परिसराला लाभलेले निसर्गसौंदय.**
**छायाचित्र : किशोर मोकलकर,** आसेगाव पूर्णा



### ठाणेदारांची गोरक्षण संस्थेला भेट

**दर्यापूर**-तालुक्यातील तथा दर्यापूर पोलीस स्टेशन हद्दीत समावेश असलेल्या माहुली (धांडे ) येथील गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळाला ठाणेदार अजित राठोड यांनी सदिच्छा भेट देऊन संपूर्ण पाहणी तथा शासकीय सुचनेतील मार्गदर्शना अंतर्गत कामकाजाबाबत संपूर्ण माहिती घेतली.संस्थेचे संस्थापक संचालक प्रा गजानन भारसाकळे यांनी चर्चेदरम्यान या संस्या स्थळावरील शेतीपूरक खत व गोमय उत्पादने निर्मिती तथा अन्य संशोधन कार्य याविषयी आजवर प्राप्त यशाची माहिती याबाबत वार्तालाप केला.राठोड यांनी संस्था स्थळावरील स्वच्छता तथा पर्यावरण पूरक वातावरणाचा आवर्जून उल्लेख करून भविष्यातील अधिक कार्यास्तव शुभेच्छाही प्रदान केल्या . गोरक्षण स्थळाला आवर्जून भेट दिल्या बद्दल संस्थेनी ठाणेदार राठोड यांचे हस्ते गोपूजन घेऊन त्यांचा संस्थेच्या वतीने यथोचित सत्कार केला.यावेळी जेष्ठ पत्रकार एस जी मोरे तथा सेवा निवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी डॉ दिपक उफाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी संस्था व्यवस्थापक बाळासाहेब भारसाकळे,आशिष ठाकरे तथा दैनंदीन गोसेवक संतोष गवई,श्रीकृष्ण पोटे, ज्ञानेश्वर गवई, स्वराज इंगळे व अंकुश घरडे यांचे सहकार्य लाभले.



### कस्तुराबाई जैन विद्यालयाचा प्रवेशोत्सव

**शिराळा**-येथील महाराष्ट्र शिक्षण समिती व्दारा संचालित कस्तुराबाई जैन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय शिराळा येथे विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्सहात साजरा करण्यात आला.विद्यालयात प्रथम येणाऱ्या वर्ग ५ वी च्या विद्यार्थ्यांचे सर्व शिक्षक व विद्यार्थीनी पुष्पगुच्छ व मिठाई देवुन स्वागत केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तके व स्कुल बॅगचे वाटप करण्यात आले.विद्यालयाचे मुख्याध्यापिक एस.आर देशमुख यांनी सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी पालक भरत गभणे, उमेश जिभकाटे, हेमंत नागदिवे, सतिश घोंगडे विद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## वैशाली पखाले यांचे निधन



**तिवसा**-आनंदवाडी वॉर्ड नं. ३ तिवसा येथील रहिवासी वैशाली राहुल पखाले (वय ३८) यांचे दीर्घकाळ कॅन्सरच्या आजाराशी धैर्याने झुंज दिल्यानंतर रविवारी २८ जून रोजी निधन झाले.वैशाली पखाले या गेल्या काही काळापासून कॅन्सरच्या आजारावर उपचार घेत होत्या. विविध ठिकाणी त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू असतानाही अखेर त्यांची प्रकृती खालावली आणि उपचारादरम्यान त्यांची नागपूर येथील खाजगी रुग्णालयात प्राणज्योत मालवली.स्वभावाने शांत, मनमिळावू आणि कुटुंबवत्सल असलेल्या वैशाली पखाले यांनी प्रतिकूल परिस्थितीतही कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. त्यांच्या पश्चात पती,एक मुलगा,एक मुलगी तसेच इतर आप्तपरिवार आहे.निधनामुळे कुटुंबीयांसह नातेवाईक,मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे.त्यांच्यावर २९जून रोजी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# अवैध रेती वाहतुकीवर डीबी पथकाची कारवाई; ३५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अचलपूर/वार्ताहर**
परतवाडा पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाने अवैध रेती वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत १६ चाकी ट्रकसह सुमारे ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून ट्रक मालक फरार आहे.

पोलीस अधीक्षक (अमरावती ग्रामीण) यांनी अवैध धंदे, रेती चोरी व अवैध रेती वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिल्यानुसार २८ जून रोजी रात्री डीबी पथक गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार एमएच १२ यूएम ०००३क्रमांकाचा १६ चाकी ट्रक अवैधरित्या रेती घेऊन मुघलाईपुरा, गुलजार कॉलनी, परतवाडा येथे येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने सापळा रचला.ट्रक अडवून तपासणी केली असता त्यामध्ये१० ब्रास पिवळी रेती आढळून आली. चालकाकडे रेतीची रॉयल्टी अथवा वाहतूक परवाना नसल्याने रेतीची अवैध



वाहतूक सुरू असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी ट्रकमधील रेती व ट्रक असा एकूण ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी चालक मोहम्मद इम्तीयाज मोहम्मद युसुफ (वय ४९, रा. गुलजार कॉलनी, परतवाडा) व सहचालक गजानन गोंडुजी शेळके (रा. मोगरदा, ता. धारणी) यांना अटक करण्यात आली. ट्रक मालक शोएब खान अख्तर खान (रा. टिचर कॉलनी, परतवाडा) हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे.याप्रकरणी परतवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४३९/२०२६अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम३०३(२), ३(५)तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियमाच्या कलम ९ व १५अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.


ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकर यांच्या मार्गदर्शनाखाली परतवाडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुरेश म्हस्वे, सपोनि सलीम शेख तसेच डीबी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

# श्री.साईबाबा विद्यालयात प्रवेश सोहळा

**अमरावती** - श्री आयुर्वेद एवं शिक्षण विकास मंडळ, अमरावती द्वारा संचालित श्री साईबाबा विद्यालय, साईनगर, अमरावती येथे ३० जुन रोजी शालेय सत्राच्या पहील्या दिवशी शाळेत प्रवेश घेतलेल्या वर्ग ५ वी च्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात फुलांचा वर्षाव, पुष्पगुच्छ, टिळक व टोपी देऊन स्वागत करण्यात आले. तसेच वर्ग ६ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यांनी वेलकम डॉन्स सादर केला व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक राजेश टावरी तसेच पर्यवेक्षक आशिष पसारकर यांच्या हस्ते शालेय पुस्तकांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी पालक वर्ग, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते. तसेच सर्व ५ ते ८ च्या विद्यार्थ्यांना खिचडी व गोड पदार्थाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक यांनी स्वच्छता व पर्यावरणाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले व शालेय नियमाची माहिती व २०२५-२६ मध्ये विद्यालयाच्या दहावीच्या निकालाबाबत अवगत केले व सर्व दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच सर्व विद्यार्थ्यांना नवीन सत्राच्या शुभेच्छा देण्यात आल्या.



## सरकी लागवडीला वेग...!



**चांदूरबाजार तालुक्यातील जवळा शहापूर येथे शेतकरी खरीप हंगामासाठी जोमाने सरकी (कापूस) लागवडीच्या कामात व्यस्त असून, वेळेत पेरणी पूर्ण करण्यासाठी शेतात दिवसरात्र मेहनत घेत आहेत. चांगल्या उत्पादनाच्या आशेने शेतकऱ्यांनी लागवडीच्या कामाला सुरुवात केली आहे.**
**छायाचित्र : संतोष शेंडे,** टाकरखेड़ा शंभू

## आता निलगायीची मानवी वस्तीतही उपस्थिती

**चांदूरबाजार तालुक्यातील बऱ्हाणपूर येथील प्रफुल रमेशराव इंगळे यांच्या घरात तसेच परिसरातील गल्लीमध्ये एक ते दोन रोही आढळले.**



# फिनले मीलचा मुद्दा विधानपरिषदेत आ.बच्चू कडू आणि आ.प्रवीण तायडे यांनी विधानसभा सभागृहात गाजविला

**अचलपूर/वार्ताहर**
कोरोना काळापासून बंद असलेल्या फिनले मील मुळे कामगारांवर विविध समस्यांचे डोंगर कोसळले आहे. यामुळे कामगाराच्या विविध समस्या आणि बंद फिनले मील पूर्वरत सुरू करण्याची मागणी विधानपरिषद आ. बच्चू कडू यांनी पावसाळी अधिवेशनात विधानपरिषद सभागृहात केली आहे.तर विधानसभा सभागृहात अचलपूर मतदार संघाचे आ.प्रवीण तायडे यांनी सुद्धा बंद फिनले मील पूर्वरत सुरू केल्याने शेतकरी वर्गाला लाभ होणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

यामुळे पावसाळी अधिवेशनात दोन्ही सभागृहात महायुतीचे आमदार म्हणून विधानपरिषद आ. बच्चू कडू आणि भाजपा पक्षाचे विधानसभा आ.प्रवीण तायडे यांनी बंद फिनले मील संदर्भात कामगाराच्या भवितव्याचा दृष्टीने मांडलेल्या प्रश्नांवर केंद्र व राज्य शासनाने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी कामगार वर्गात होत आहे.

राज्य शासनाच्या मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी



अधिवेशनात अचलपूर मतदारसंघाचे आ. प्रवीण तावडे यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत अचलपूरला स्वतंत्र जिल्हयाचा दर्जा देण्याची मागणी सभागृहात लावून धरली.तर विधान परिषदेत आ.बच्चू कंडूनी ग्रामीण भागातील नागरिकांच्या व शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लक्ष वेधले. यामुळे अचलपूर मतदारसंघाला आता दोन आमदार मिळाले असून दोघांनी पावसाळी अधिवेशनात अचलपुर जिल्हा निर्मिती,बंद फिनले मील पूर्वरत सुरू करणे, आरोग्य, रोजगार निर्मिती, शेती संदर्भात समस्यांचा पाढा वाचला. सोबतच अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात १०० बेड चे डायलिसिस व ट्रॉमा सेंटर सुरू करण्याची मागणी रुग्णालयात हृदय रोग,मेंदू रोग, अस्थिरोग तज्ञ नेमणुकीसह सुपर स्पेशालिटी विभाग सुरू करणे,अचलपूर तालुका कृषी कार्यालयात रिक्त पदे भरणे सोबतच कृषी कार्यालयाच्या नवीन इमरतीच्या प्रस्तावाला मान्यता देण्याची मागणी आ.प्रवीण तायडे यांनी केली आहे. विधानपरिषद आ.बच्चू कडू यांनी बंद फिनले मील मुळे कामगाराच्या होत असलेल्या आत्महत्यांचे गंभीर मुद्दा मांडला आणि विदर्भाचे कामगार मंत्री असताना ही ६-६ महिने पगार नाही,कामगार उपाशी आहे हे विदर्भाचे कामगार मंत्री असताना ही होत असल्याने हे शासनासाठी दुर्दैवी आहे. कामगाराच्या आत्महत्या होतात राज्याचे कामगार मंत्री भेट देत नाही यावर शासनाने लक्ष देण्याची मागणी विधानपरिषद आ. बच्चू कडू यांनी केली.तसेच ग्रामीण भागात विजेचा लपंडाव कसा होतो ते स्पष्ट करतांना म्हणाले की, दिवसातून चार-पाच वेळा वीज येते, जाते एखादे ट्रान्सफार्मर जळाले की नागरिक मला फोन करून माहिती देतात की, आमची डीपी दुरुस्त करून द्या, विद्युत विभाग दुरुस्त करीत नाही. कर्जमाफी व विविध समस्यांवरही त्यांनी लक्ष वेधले.

## रावळगाव-इसेगाव पांदण रस्त्याची दुरवस्था

# पेरणीच्या तोंडावर शेतकऱ्यांची मोठी गैरसोय

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
रावळगाव ते इसेगाव या पांदण रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून पेरणीच्या तोंडावर शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यामधील वाघाडी नाल्यावर सिमेंट पूल नसल्याने पावसाच्या पाण्याने रस्ता वाहून गेला आहे. त्यामुळे शेतमालाची वाहतूक तसेच सोयाबीन पेरणी यंत्र शेतात नेणे अशक्य झाले आहे.या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडे वारंवार निवेदने देऊनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. परिणामी पावसाळ्यात शेतकऱ्यांची गैरसोय अधिकच वाढली आहे.

पेरणीचा हंगाम सुरू झाल्याने रावळगाव–इसेगाव पांदन रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून वाघाडी नाल्यावर कायमस्वरूपी पूल उभारून रस्ता करण्यात यावा, अशी मागणी परिसरातील शेतकरी वर्गातून होत आहे. पावसाळ्यात वाघाडी नाल्याला पाणी आल्याने अनेक शेतकऱ्यांचा शेताशी संपर्क तुटतो. त्यामुळे शेतीची अवजारे, बियाणे, खत तसेच शेतमालाची ने-आण करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पूल नसल्यामुळे पावसाळ्यात जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागते. त्यामुळे संबंधित प्रशासनाने पांदन रस्त्याची तातडीने गंभीर दखल घेण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

सदर रस्त्याबाबत लोकप्रतिनिधी तथा सबंधित विभागाला याबाबत वारंवार निवेदन सादर करून सुद्धा याकडे दुर्लक्ष करीत आहे.
**अंकुश राऊत,** शेतकरी, रावळगाव



## वृक्षारोपणाने वटपौर्णिमा साजरी-कीर्ती इमले

**चांदूर रेल्वे** - येथील प्रभाग क्रमांक ३ च्या नगरसेविका कीर्ती राहुल इमले यांनी 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत प्रभागातील महिला मंडळाच्या सहकार्याने वटपौर्णिमेच्या निमित्ताने वृक्षारोपण करून पर्यावरणपूरक वटपौर्णिमा साजरी केली.वटपौर्णिमा हा आपल्या संस्कृतीतील महत्त्वाचा सण आहे. वडाचे झाड दीर्घायुष्य, स्थैर्य आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. यावेळी बोलताना नगरसेविका कीर्ती राहुल इमले म्हणाल्या, 'हा केवळ कार्यक्रम नसून पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा संकल्प आहे.या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करिता काँग्रेसचे गटनेते अनिस सौदागर, नगरसेविका निलोफर शेख व हर्षल वाघ यांच्या उपस्थितीत होते.कार्यक्रमाला स्थानिक नागरिक अनिता कडू, अर्चना मोरे, प्रतिभा कारमोरे, कविता अग्रवाल, वैशाली धोटे, जोशना जिचकर, वैशाली कावलकर, मंगला राऊत, संध्या साबळे, जया राऊत, संगीता सूर्यवंशी, वैशाली कुंभारे, पद्मा अर्जापुरे, प्रिया शिंगांजोडे, नेहा शर्मा तसेच नगरपरिषदेचे पाणीपुरवठा अभियंता आशिष कुऱ्हाडे, वरिष्ठ लिपिक जितू करसे, मनिष कनोजे, पंकज इंगळे, सुनील दांडेकर यांच्यासह परिसरातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.










































































● जाहीरात संकलन : प्रदीप भुसारी, तालुका प्रतिनिधी दै.जनमाध्यम मोबा.९९२३४१९९९० ● माऊली फ्लेक्स प्रिंटींग सौरभ भुसारी मोबा. ८४८२८८३८०३